पुणे, शनिवार, ५ एप्रिल २०२५ | RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 127 | वर्ष ४ थे, अंक १२७ | किंमत ₹ ६ | पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News





सत्ताधारी-विरोधक भिडले

P३

पुण्यात गोल्फची राष्ट्रीय ऑक्सफर्ड प्रीमियर लीग

१२



# संतप्त पडसाद




## नेमके काय घडले

● रुग्णालय प्रशासनाने दहा लाख रुपये अनामत रक्कम भरण्याची मागणी केली. तनिशा भिसे यांच्यासोबत असणाऱ्या नातेवाईकांनी आम्ही अडीच लाख रुपये आत्ता भरतो आणि उर्वरित पैसे लगेच भरले जातील असे सांगितले मात्र प्रशासन ऐकायला तयार नव्हतं. काही वेळानंतर पती सुशांत भिसे हे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक असल्याने त्यांनी मंत्रालयातून संबंधित रुग्णालय प्रशासनाला फोन केला. मात्र तरीही मंगेशकर रुग्णालयाचे प्रशासन हलायला तयार नव्हते. अशा परिस्थितीत तनिषा भिसे यांना दुसऱ्या रुग्णालयात तातडीने हलवले गेले. त्यातच त्यांनी दोन जुळ्या बाळांना जन्म दिला. मात्र तनिषा यांचा करुण अंत झाला. रुग्णालयाच्या प्रशासनाने कदाचित थोडासा मानवीय दृष्टिकोन दाखवला असता तर आज तनिषा भिसे आपल्या जुळ्या बाळांना मातृत्व देण्यासाठी हयात राहिल्या असत्या.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भाजपाचे विधानपरिषद आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत भिसे यांच्या गर्भवती पत्नी तनिषा भिसे यांना दीनानाथ रुग्णालयाकडून वेळेवर उपचार न मिळाल्याने त्यांचा मृत्यु झाला. या गंभीर प्रकरणाची राज्य सरकारनेही गंभीर दखल घेतली असून, रुग्णालय प्रशासनावर कारवाई करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. एकीकडे राज्य शासनाने ही भूमिका घेतली असतानाच, शहरातील राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि संस्थांनी रस्त्यावर उतरत रुग्णालय प्रशासनाच्या विरोधात तीव्र निदर्शने केली. नागरिकांनी या आंदोलनात उस्फूर्त सहभाग घेत रुग्णालय प्रशासनाचा तीव्र निषेध केला, रुग्णालयाच्या बाहेर प्रक्षुब्ध जमाव जमल्याने त्यांना पांगविण्यासाठी हजारो पोलीस



रस्त्यावर उतरले होते. त्यामुळे रुग्णालय परिसराला अक्षरश: छावणीचे स्वरूप आले होते.

या दुर्दैवी घटनेची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबतची संपूर्ण माहिती घेतली आहे. आरोग्य विभागाने तातडीने, पारदर्शक आणि निष्पक्षपणे चौकशी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. रुग्णालय प्रशासनाने माध्यमांसमोर त्यांचे म्हणणे मांडले असले, तरी शासन या प्रकरणाचा सर्व संबंधित घटकांची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करेल. या घटनेबाबत आंदोलन करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि संघटनांच्या भावना शासनाने समजून घेतल्या आहेत. चौकशीच्या निष्कर्षानुसार दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. तसेच अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. सर्व नागरिकांनी

» पान ७ वर



"दीनानाथ रुग्णालयातील घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. ह्या चौकशीत जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. राज्यातील कुठल्याही रुग्णालयात ह्या पुढे अशी दुर्दैवी घटना घडणार नाही ह्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील"

**— माधुरी मिसाळ,** राज्यमंत्री वैद्यकीय शिक्षण

## दीनानाथ रुग्णालयाचा खुलासा

● पैशाची तजवीज न झाल्यास, आम्ही रुग्णाला ससूनमध्ये भरती होण्याचा सल्ला दिला होता. जेणेकरून आईची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया व होणाऱ्या अपुऱ्या वाढीच्या गर्भाची शुश्रूषा ससून येथील एनआयसीयू मध्ये व्यवस्थित होईल. दरम्यानच्या काळात एका नर्सने रुग्ण/नातेवाईक आपली बॅग उचलून चालत गेल्याचे सांगितले. थोड्या वेळाने रुग्णाच्या नातेवाईकांकडून काहीच हालचाल न झाल्याने डॉ. घैसास यांनी रुग्णाच्या पतीला फोन केला, तो त्यांनी उचलला नाही. त्यामुळे २८ मार्च च्या दुपारनंतर रुग्णाचे काय झाले याबद्दल डॉ. घैसास व रुग्णालय प्रशासन यांना काहीच कल्पना नव्हती, असा खुलासा रुग्णालयाने केला आहे.

# मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गर्भवती महिलेच्या मृत्यूनंतर पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी पुणे धर्मादाय



सहआयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

धर्मादाय सहआयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेत या चौकशी समितीत उपसचिव यमुना जाधव, सह कक्षप्रमुख तथा कक्ष अधिकारी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय यांचे प्रतिनिधी, सर जे. जे. रुग्णालय समूह, मुंबईचे अधीक्षक हे सदस्य असतील. तर विधि व न्याय विभागाचे उपसचिव सदस्य सचिव असतील.त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाच्या

» पान ७ वर

# ब्लॅक फ्रायडे!

# 'ट्रम्प टॅरिफ'ने अमेरिकेसह भारतीय बाजारात हाहाकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मोठ्या प्रमाणात शुल्क आकारण्याच्या घोषणांमुळे जागतिक मंदीची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर कमकुवत जागतिक संकेतांदरम्यान आयटी शेअर्सची दाणादाण उडाली. परिणामी, शुक्रवारी भारतीय बेंचमार्क निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये मोठी घसरण झाली. शुक्रवारी सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स ८०० अंकांनी घसरून ७५,५०० च्या खाली आला. तर निफ्टी ५० निर्देशांक ३०० अंकांच्या घसरणीसह २२,९५० जवळ व्यवहार करत आहे.

बीएसई सेन्सेक्स ९३०.६७



### 'ट्रम्प टॅरिफ'चा बाजारात इफेक्ट

● दरम्यान, ट्रम्प यांच्या टॅरिफ घोषणांचे तीव पडसाद बाजारात उमटले आहेत. यामुळे संभाव्य जागतिक व्यापार युद्ध आणि मंदीची चिंता व्यक्त निर्माण झाली आहे. परिणामी, अमेरिकेतील शेअर बाजार काल गडगडला. येथील शेअर बाजाराने २०२० नंतरचा एका दिवसातील सर्वात मोठा तोटा नोंदवला. एस अँड पी ५०० निर्देशांक ४.८ टक्के, नॅस्डॅक कंपोझिट जवळपास ६ टक्के घसरला. डाऊ जोन्स इंडस्ट्रियल ॲव्हरेज सुमारे ४ टक्के खाली आला. यामुळे येथील बाजार मुल्याचे २.४ ट्रिलियन डॉलर्सचे नुकसान झाले.

» पान ७ वर

### बाजार कोसळण्याची प्रमुख कारणे

● जागतिक व्यापार युद्धाची भीती - अमेरिकेने लावलेल्या आयात शुल्कामुळे जगभरात व्यापार युद्धाची भीती निर्माण झाली आहे. चीन आणि कॅनडाने प्रतिउपाय घेण्याचे आश्वासन दिले आहे, ज्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंता वाढली आहे.

**नकारात्मक जागतिक संकेत**

● एका रात्रीत, अमेरिकन शेअर बाजारात २०२० नंतरची सर्वात मोठी घसरण दिसून आली, गुंतवणूकदारांचे जवळजवळ २.५ ट्रिलियन डॉलर संपत्ती नष्ट झाली.

**क्षेत्रीय घसरण**

● एनएसईवरील सर्व १३ प्रमुख क्षेत्रीय निर्देशांक लाल रंगात व्यवहार करत होते. अमेरिकेतील टेक शेअर्समधील कमकुवतपणा लक्षात घेता, आयटी शेअर्सच्या दरातही घसरण झाली.

**संस्थागत गुंतवणूकदारांची विक्री**

● विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या भावनांना धक्का बसला असून, गुरुवारी त्यांनी २,८०६ कोटी रुपयांचे समभाग विकले, तर देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी २२१.४७ कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले.

» पान ७ वर

# काँग्रेसचे वक्फ विधेयकाला सर्वोच्च आव्हान!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वक्फ दुरुस्ती विधेयकाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची तयारी सुरू झाली आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांच्यानंतर आता काँग्रेसने शुक्रवारी (दि. ४) म्हटले आहे की, ते संसदेत मंजूर झालेल्या वक्फ (दुरुस्ती) विधेयक, २०२४ च्या घटनात्मकतेला लवकरच सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहेत. शुक्रवारी सकाळी संसदेने या विधेयकाला मंजुरी दिली. प्रथम ते लोकसभेने आणि नंतर राज्यसभेने मंजूर केले.

यापूर्वी स्टॅलिन यांनी वक्फ विधेयकाबाबत न्यायालयात जाण्याची घोषणा केली होती.




तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एमके स्टॅलिन यांनी गुरुवारी (दि. ३) सांगितले होते की, त्यांचा पक्ष या विधेयकाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करेल. लोकसभेत विधेयक मंजूर झाल्याच्या निषेधार्थ स्टॅलिन काळी पट्टी घालून विधानसभेत पोहोचले. यावेळी त्यांनी म्हटले होते की, भारतातील मोठ्या संख्येने पक्षांच्या विरोधाला न जुमानता काही मित्रपक्षांच्या आदेशानुसार रात्री २ वाजता घटनादुरुस्ती स्वीकारणे हा संविधानाच्या रचनेवर हल्ला आहे.

'एक्स' वरील एका पोस्टमध्ये, एआयसीसीचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले, "काँग्रेस लवकरच वक्फ (दुरुस्ती) विधेयक, २०२४ च्या घटनात्मक वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देईल." ते म्हणाला, आम्हाला पूर्ण विश्वास आहे. भारतीय संविधानात नमूद केलेल्या तत्त्वांवर, तरतुदींवर आणि पद्धतींवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून होणाऱ्या सर्व हल्ल्यांना आम्ही विरोध करत राहू.

सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणांची यादी काँग्रेसने केली.जयराम रमेश म्हणाले की, काँग्रेसने

» पान ७ वर

# नवीन महाबळेश्वरमधील ६७ गावे 'इको सेन्सिटिव्ह'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणाच्या शेजारीच कोयना बॅकवॉटरला लागून असलेल्या नवीन महाबळेश्वर गिरिस्थान प्रकल्पात नव्याने २९४ गावांचा समावेश करण्याला राज्य सरकारने नुकतीच मान्यता दिली. त्यातील ६७ गावे ही केंद्र सरकारच्या इको सेन्सिटिव्ह झोन सूचीतील आहेत. तर आतापर्यंत या गिरिस्थान प्रकल्पात ५२९ गावे समाविष्ट केली असून यातील २३७ गावे ही इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये मोडत असल्याचे समोर आले आहे. त्याचबरोबर सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमधील गावांचाही यात समावेश आहे.

राज्य सरकारने नव्याने

» पान ७ वर

# मनोजकुमार काळाच्या पडद्याआड

## वयाच्या ८७ व्या वर्षी घेतला शेवटचा श्वास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** 'भारत कुमार' या टोपणनावासाठी आणि देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जाणारे भारतीय अभिनेते आणि चित्रपट दिग्दर्शक मनोज कुमार यांचं वयाच्या ८७ व्या वर्षी कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात निधन झालं आहे. प्रदीर्घ काळापासून मनोज कुमार आजारी होते. प्रकृती अस्वास्थामुळे काही दिवसांपूर्वीच त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलेलं. त्यांच्या निधनामुळे सिनेसृष्टीसह संपूर्ण देशात शोककळा पसरली आहे.

हिंदी चित्रपटातील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना १९९२ मध्ये पद्मश्री आणि २०१५ मधे दादासाहेब फाळके पुरस्कारानं

### मनोजकुमार यांचा अल्पपरिचय

● मनोजकुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी एबटाबाद (पाकिस्तान) या ठिकाणी झाला. मनोजकुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी गोस्वामी असे होते. चित्रपटसृष्टीच्या प्रेमासाठी त्यांनी आपल्या नावात बदल केला होता. पण त्यांना खरी ओळख 'भारत कुमार' या नावाने मिळाली. हरिकिशन गिरी गोस्वामी यांचे कुटुंब फाळणीनंतर भारतात आले आणि दिल्लीत स्थायिक झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. अशोक कुमार, दिलीप कुमार आणि कामिनी कौशल यांच्या चित्रपटांमुळे ते खूप प्रभावित झाले. यामुळे त्यांनी आपले हरिकिशन हे नाव बदलत मनोज कुमार असे केले.

सन्मानित करण्यात आलं होतं. मुख्य भूमिका असलेला त्यांचा पहिला चित्रपट राजा खोसला यांचा १९६४ मधला मिस्ट्री थ्रिलर असलेला 'वो कौन थी?' सुपरहिट ठरला. या चित्रपटातील 'लग जा गले' आणि 'नैना बरसे रिमझिम' ही गाणी प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली. ही दोन्ही गाजलेली गाणी लता मंगेशकर यांनी गायली होती.

हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक उत्तम चित्रपट देणारे बॉलिवूडचे सुपरस्टार मनोज कुमार यांनी आपल्या चित्रपटांमधून लोकांना



पडद्यावर देशभक्तीची खोल भावना अनुभवायला लावली. मनोज कुमार हे हिंदी चित्रपटांमध्ये देशभक्त अभिनेत्याचा चेहरा म्हणून ओळखले जायचे. असं म्हटलं जातं की, भगतसिंग यांच्यावर या अभिनेत्याचा खूप प्रभाव आहे आणि त्यांनी 'शहीद' सारख्या देशभक्तीपर चित्रपटांमध्ये काम केलं आणि अनेकांसाठी प्रेरणास्थान बनले.

मनोज कुमार यांनी कॉलेजच्या काळात अनेक

» पान ७ वर

# भारतकुमार हे नाव खऱ्या अर्थाने सार्थ केले-फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक मनोजकुमार यांच्या निधनाने भारतीय सिनेसृष्टीतील एका महान व्यक्तिमत्व आपल्यातून हरपले आहे. चित्रपटांच्या माध्यमातून राष्ट्रभक्ती आणि भारतीय समाजजीवन जनमानसावर बिंबवणाऱ्या या अष्टपैलू आणि भारतकुमार हे नाव खऱ्या अर्थाने सार्थकी लावणाऱ्या कलाकाराला मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

'शहीद' मध्ये भगतसिंग साकारून मनोजकुमार हे देशाला सुपरिचित झाले. त्यानंतर शेतीसारखा विषय त्यांनी चित्रपटातून हाताळला आणि 'मेरे देश की धरती' सारखे गीत आजही प्रत्येक स्वातंत्र्यदिनाला त्याच अभिमानाने ऐकले जाते. त्यांच्या 'पुरब और पश्चिम' सारख्या

» पान ७ वर

# अल्पसंख्याकांच्या सुरक्षेबाबत चिंता

## मोदी यांनी केली युनूस यांच्याशी चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बँकॉक :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांगलादेशचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्यासमवेत शुक्रवारी झालेल्या बैठकीत हिंदूंसह अल्पसंख्याकांच्या सुरक्षेबाबत भारताची चिंता अधोरेखित केली आणि बांगलादेश सरकार त्यांच्यावरील अत्याचाराच्या प्रकरणांची सखोल चौकशी करून त्यांच्या सुरक्षेची खात्री करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

बंगालच्या उपसागरातील बहुक्षेत्रीय आणि तांत्रिक सहकार्य (बिम्सटेक) गटाच्या नेत्यांच्या शिखर बैठकीदरम्यान दोन्ही नेत्यांची



भेट झाली. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये पंतप्रधान शेख हसीना यांची हकालपट्टी झाल्यानंतर त्यांची ही पहिलीच भेट होती. युनूस यांच्याभेटीबाबत पत्रकारांना माहिती देताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, मोदींनी हिंदूंसह बांगलादेशातील अल्पसंख्याकांच्या सुरक्षेशी संबंधित भारताची चिंता अधोरेखित केली.

बांगलादेश सरकार अल्पसंख्याकांवरील

» पान ७ वर

## धक्कादायक, धोकादायक...

# एआयचा वापर होतोय बनावट आधार कार्डसाठी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आर्टिफिशियल इंटेलिजेन्स (एआय) हा सध्याच्या तंत्रज्ञानाचा परवलीचा शब्द ठरत आहे. एआयवर आधारित वेगवेगळ्या टुल्समध्ये रोजची कामं ही अधिक सोपी आणि अचूक होत आहेत. पण, त्याचा गैरवापर देखील केला जात आहे. ओपनएआयचे लोकप्रिय एआय टूल चॅट जीपीटीच्या मदतीनं बनावट आधार कार्ड तयार करत असल्याचं उघड झालं आहे.

नव्या जीपीटी मॉडेलमध्ये फोटो अधिक चांगले करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आलीय. हे




फिचर गेल्याच आठवड्यात सुरु झालं असून, ते कमालीचं लोकप्रिय झालं आहे. त्याच्या मदतीनं वापरकर्त्यांनी ७० कोटींपेक्षा जास्त फोटो तयार करण्यात केले आहेत. आपल्या देशातील नागरिकांसाठी आधार कार्ड हे महत्त्वाचं ओळखपत्र आहे. युनिक आयडेंटीफिकेशन

» पान ७ वर

# टँकरमाफियांचा 'उपसा'...!

## पुणेकरांची अवस्था : धरण उशाला अन् कोरड घशाला टँकर माफियांचा 'उपसा'...!

**समस्या**

"उन्हाळ्याच्या वाढत्या उष्णतेसोबत पाण्याच्या टँकरची मागणीही वाढत आहे. शहरासह उपनगरामध्ये पाण्याची मागणी वाढली आहे. नागरिकांच्या मागणीनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे प्रयत्न केले जात आहेत."

**— प्रसन्नराघव जोशी,** अधीक्षक अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पुणे महापालिका.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याच्या उशाला असलेल्या साखळी धरणामुळे पुणेकरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत नाही, असे म्हटले जाते. मात्र, हे खरं नाही. कारण २०२४-२५ या आर्थिक वर्षात तब्बल ४ लाख ८८ हजार २३६ टँकरच्या फेऱ्या झाल्या असून, यामध्ये टँकर माफिया सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. कारण ठेकेदार याद्वारे ३ लाख ९९ हजार ८० टँकर तर पाणी भरना केंद्रावरुन चलन भरुन ५५ हजार ७३ टँकरच्या फेऱ्या झाल्या आहेत. तर पुणे मनपाच्या पाणी पुरवठा विभागाने केवळ ३४ हजार८० टँकरच्या फेऱ्या



झाल्या आहेत. त्यामुळे पुण्यात पाणी टंचाई नाही, असे सांगणाऱ्या पाणी पुरवठा विभागाचा दावा फोल ठरला आहे. त्यातूनच टँकरमाफियांनी धुमाकुळ घातला असून पुणेकरांचा पैसा अक्षरश:'पाण्यासारखा'वापरला जात आहे; धक्कादायक बाब म्हणजे प्रशासन पुणेकरांना पाणी देण्यास पूर्ण असमर्थ ठरल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

### मार्चमध्ये वाढले टँकर

● मागील म्हणजेच २०२३-२५ या आर्थिक वर्षात एकूण ४ लाख ३८८ टँकर फेऱ्यांद्वारे पाणी पुरविले गेले होते. यात कंत्राटदारांच्या ३ लाख ४५ हजार ८४६ टँकरचा समावेश आहे. या वर्षाच्या तुलनेत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे प्रमाण जवळपास ४ हजारांनी वाढले आहे. यंदा उन्हाचा चटका जानेवारीपासूनच जाणवू लागला आहे. आता त्याची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे पाण्याचीही मागणी वाढत आहे. महापालिकेने जानेवारीमध्ये ३९ हजार ६९२ टँकरफेऱ्यांद्वारे पाणीपुरवठा केला आहे. तर फेब्रुवारीमध्ये ३८ हजार ५३२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला आहे. तर मार्चमध्ये सुमारे ४८ हजार टँकरच्या फेऱ्या झाल्या आहेत. हे प्रमाण एप्रिलमध्ये वाढणार हे निश्चित आहे.

उन्हाच्या वाढच्या चटक्यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरांमध्ये पाण्याची मागणी वाढत आहे. शहरासाठी खडकवासला धरणसाखळी आणि भामा आसखेड प्रकल्पातून पाणी आणून ते महापालिकेच्या विविध जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून ते नळाद्वारे नागरिकांना

» पान ७ वर



## शनिवारवाड्याच्या प्रागंणात भव्य पेशवे सृष्टी उभारा

**पुणे :** शिवसृष्टी, शंभुसृष्टी प्रमाणे, ज्या वीर पराक्रमी पेशव्यांनी अटकेपार झेंडे लावून पुण्याची कीर्ती सर्वत्र नेली त्या पुण्यात (शनिवार वाडा प्रांगणात) पेशव्यांच्या पराक्रमाचा इतिहास सांगणारी भव्य अशी पेशवे सृष्टी निर्माण व्हावी या मागणीचे निवेदन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, पुणे च्या वतीने देण्यात आले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील , प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर यांना निवेदन देताना जिल्हाध्यक्ष मंदार रेडे, महिला आघाडी अध्यक्ष केतकी कुलकर्णी, दत्तात्रय देशपांडे.



## चित्रप्रदर्शनातून उलगडणार वन्दे मातरम्‌चा इतिहास

**पुणे :** वन्दे मातरम्‌ या राष्ट्रमंत्राच्या सार्ध शती (१५०) जयंती वर्षानिमित्त तसेच ऋषी बंकिमचंद्रांच्या १३१व्या स्मृतीदिनानिमित्त ऋषी बंकिमचंद्र स्मृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात सुरवातीलाच वन्दे मातरम्‌चा इतिहास मांडणाऱ्या तसेच गेल्या सव्वाशे वर्षात नामवंत भारतीय चित्रकारांनी रेखाटलेल्या भारतमातेच्या चित्रांचे प्रदर्शन मंगळवार, दि. ८ ते शनिवार, दि. १२ एप्रिल या कालावधीत बालगंधर्व कलादालनात आयोजित करण्यात आले आहे.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन दि. ८ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता खासदार मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते होणार असून ज्येष्ठ चित्रकार चंद्रशेखर जोशी, अनिल उपळेकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे, अशी माहिती प्रदर्शनाचे संयोजक मकरंद केळकर आणि वन्दे मारतम्‌चे अभ्यासक मिलिंद सबनीस यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. रवींद्र सातपुते यावेळी उपस्थित होते. दि. 12 एप्रिल पर्यंत प्रदर्शनी सकाळी १० ते रात्री ८ या वेळात सर्वांसाठी खुली असणार आहे.



## ‘ससून’च्या अधीक्षकासह दोघांना पोलीस कोठडी

**पुणे :** फर्निचरच्या कामाचे बिल मंजूर करण्यासाठी एक लाख रुपयांची लाच घेणाऱ्या बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कार्यालयीन अधीक्षकासह आणि वरिष्ठ सहायकाला न्यायालयाने शनिवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

जयंत पर्वत चौधरी (वय-४९) आणि सुरेश विश्वनाथ बोनवळे (वय-५३) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. चौधरी हे वरिष्ठ सहाय्यक असून, बोनवळे कार्यालयीन अधीक्षक म्हणून बीजे वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून बुधवारी (ता. २) ही कारवाई करण्यात आली होती. तक्रारदार यांचा फर्निचर पुरवठा करण्याचा व्यवसाय आहे. त्यांनी बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयात २०२३ मध्ये २० लाख रुपये किमतीचे फर्निचर दिले होते.

त्यापैकी पहिल्या टप्प्यातील दहा लाख रुपये किमतीच्या फर्निचर बिलाच्या मंजुरीसाठी या दोघांनी १३ टक्के दराने तक्रारदाराकडे एक लाख ३० हजार रुपयांची मागणी केली. याबाबत तक्रारदार व्यावसायिकाने एक एप्रिल रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात तक्रार दिली. दोघांना एक लाख रुपयांची लाच घेताना अटक करण्यात आली आहे.

## पुणे स्टार्टअप एक्स्पो १० एप्रिलपासून

**पुणे :** देशातील आणि राज्यातील नवोदित उद्योजकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि स्टार्टअपना चालना देण्यासाठी डेस्टिनेशन को वर्किंग, पुणे बिझनेस अँड इन्फ्रास्ट्रक्चर ग्रुप, टीडीटीएल आणि एमआयटी-डब्लूपीयु यांच्यातर्फे ‘पुणे स्टार्टअप एक्स्पो २०२५’चे १० एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती एक्स्पोच्या आयोजिका अमृता देवगांवकर यांनी पत्रकार परिषदेत गुरुवारी दिली. यावेळी अमृत श्रोत्री, सीमा काळे, नीलिमा अलूलकर, मानसी ठाकूर, दीपा बडवे, कृष्णन वर्मा, गार्गी कुलकर्णी आणि सर्वेश मेहेंदळे उपस्थित होते. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा एक्स्पो १० एप्रिल रोजी सकाळी नऊ ते सायंकाळी सहा या वेळेत कोथरूड येथील एमआयटी-डब्लूपीयु संस्थेत होणार आहे. देवगांवकर म्हणाल्या, “या उपक्रमामुळे राज्याच्या विविध भागातील नवोदितांच्या स्टार्टअपना एक व्यासपीठ तर विद्यार्थ्यांना आपली कौशल्ये दाखविण्याची संधी मिळणार आहे. तर स्टार्टअपना थेट गुंतवणूकदार आणि मार्गदर्शकांशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. स्टार्टअपसाठी संकेतस्थळावर एआय-एमएल, फॅशन, ॲग्रिकल्चर अँड फूड, एंटरटेनमेंट अँड मीडिया, बांधकाम व्यवसाय क्षेत्र आणि हेल्थकेअर व बायोटेक असे विभाग करण्यात आले असून यामुळे जास्तीत जास्त स्टार्ट अप यासाठी नोंदणी करू शकतात.

## आमदारांची ‘महासभा’...!



**पुणे** राज्य शासनाच्या विविध योजना तळागळातील जनतेपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी सर्व ग्रामपंचायत प्रशासन,अधिकारी यांनी प्रयत्न करावेत, गावांतील मूलभूत प्रश्न सुटावेत या उद्दशाने शिरुर-हवेली मतदार संघातील हवेली गटातील ग्रामपंचायतींची समन्वय सभा आमदार ज्ञानेश्वर (आबा) कटके यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

## अधिकाऱ्यांनी नागरिकांची विश्वासार्हता जपावी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** जनतेने आपल्यावर ठेवलेली विश्वासार्हता आपणाकडून पूर्ण झाली पाहिजे.आपण,आपल्या खुर्चीला न्याय देणे गरजेचे आहे. परिसरामध्ये झालेली सर्व विकासकामे दर्जेदार झाली आहेत की नाहीत,होत आहेत का,याची पाहणी आपण स्वत:जागेवर जावून करावी.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कामाची अशी पद्धत आहे,ती आपणही आत्मसात करावी,शासकीय योजना जास्तीत जास्त प्रमाणात राबविणाऱ्या अधिकारी,कर्मचाऱ्यांचा सन्मान केला जाईल,असे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांनी सांगितले.

ग्रामपंचायतींची समन्वय सभा आमदार ज्ञानेश्वर (आबा) कटके यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगीमाजी जिल्हा परिषद सभापती मंगलदास बांदल,गटविकास अधिकारी भूषण जोशी,बांधकाम उपअभियंता गित्ते, केसनंदचे सरपंच धनजंय

धनाजी हरगुडे,माजी सरपंच संतोष हरगुडे, दत्ता हरगुडे,बाबासाहेब हरगुडे,दिनेश झांबरे,मच्छिंद्र सातव तसेच हवेली तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामपंचायत अधिकारी हवेली पंचायत समितीच्या सर्व विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# झुक झुक झुक आगीनगाडी...!

### मध्ये रेल्वेचा तीन दिवस ‘मेगाब्लॉक’; प्रवाशांनो मुंबईचा प्रवास टाळा

आता उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले आहेत, त्यामुळे बाळगोपाळांना आणि त्यांच्या पालकांना आता वेध लागले आहेत ते उन्हाळी सुट्ट्यांचे आणि मौजमजा करण्याचे. हीच परिस्थिती पाहून गाडी पकडण्यासाठी आता त्यांची धावपळ सुरु झाली आहे, त्यातच आता रेल्वेने कधी नव्हे ते पुणे ते मुंबई मार्गावर तब्बल तीन दिवसांचा ‘मेगाब्लॉक’ घेतला असून त्यामुळे प्रवाशांची ‘धावाधाव’ होणार आहे. ही परिस्थिती पाहून हौशानवसांच्या आनदांवर ऐन सुट्ट्यांच्या दिवसात विरजन पडण्याची शक्यता आहे.




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मध्य रेल्वेवरील लोणावळा-मळवली विभागात उड्डाणपुलाच्या पायाभूत कामासाठी तीन दिवसीय ब्लॉक घेण्यात येणार आहे. हा ब्लॉक ६ ते ८ एप्रिल दरम्यान असेल. या कालावधीत लांबपल्ल्याच्या रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकात आणि पुणे लोकलच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे.

मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, लोणावळा – मळवली विभागात प्रस्तावित उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी ४ स्टील्स उभारणीसाठी, समांतर रेल्वे फाटकाच्या (लेव्हल क्रॉसिंग गेट) जागी विशेष वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. मळवली – लोणावळा दरम्यानच्या अप आणि डाऊन मार्गावरील हा ब्लॉक ६ ते ८ एप्रिल दरम्यान घेण्यात येणार आहे. हा ब्लॉक पायाभूत सुविधांच्या देखभालीसाठी आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक आहेत. ब्लॉक काळात रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### ब्लॉकमुळे होणारे परिणाम

**ब्लॉक १**

- रविवार, ६ एप्रिल रोजी दुपारी २.०५ ते दुपारी ४.०५ पर्यंत
- लांबपल्ल्यांच्या रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकात बदल
- गाडी क्रमांक २२१५९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – चेन्नई एक्स्प्रेस लोणावळा येथे दुपारी ४.०५ वाजेपर्यंत थांबवण्यात येईल.
- गाडी क्रमांक १७२२२ लोकमान्य टिळक टर्मिनस – काकीनाडा एक्स्प्रेस कर्जत येथे दुपारी ३.२० वाजेपर्यंत थांबवण्यात येईल.
- गाडी क्रमांक २२१९४ ग्वाल्हेर – दौंड एक्स्प्रेस चौक येथे १० मिनिटांसाठी थांबवण्यात येईल.
- पुणे लोकलच्या वेळापत्रकात बदल
- पुणे – लोणावळा लोकल आणि शिवाजी नगर – लोणावळा लोकल मळवलीपर्यंत चालवण्यात येईल
- मळवली – लोणावळा लोकल सेवा उपलब्ध नसेल.
- लोणावळा – पुणे लोकल आणि लोणावळा – शिवाजी नगर लोकल मळवली येथून चालवण्यात येईल
- ही लोकल लोणावळ्याऐवजी मळवली येथून सुटेल.

**ब्लॉक २**

- सोमवार, ७ एप्रिल रोजी दुपारी १.०५ ते दुपारी २.३५ पर्यंत
- पुणे लोकलच्या वेळापत्रकात बदल
- शिवाजी नगर – लोणावळा लोकल मळवलीपर्यंत चालवण्यात येईल.
- मळवली – लोणावळा लोकल सेवा उपलब्ध नसेल.
- लोणावळा – पुणे लोकल मळवली येथून चालवण्यात येईल.
- ही लोकल लोणावळ्याऐवजी मळवली येथून सुटेल.

**ब्लॉक ३**

- मंगळवार, ८ एप्रिल रोजी दुपारी १.०५ ते दुपारी ३.०५ पर्यंत
- पुणे लोकलच्या वेळापत्रकात बदल
- शिवाजी नगर – लोणावळा लोकल मळवलीपर्यंत चालवण्यात येईल
- मळवली – लोणावळा लोकल सेवा उपलब्ध नसेल.
- लोणावळा – पुणे लोकल मळवली येथून चालवण्यात येईल
- ही लोकल लोणावळ्याऐवजी मळवली येथून सुटेल.

## ‘बांधकाम’ उत्पन्नाचे मिळकतकतींचे ‘बांधकाम’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेचा उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत म्हणून मिळकतकर विभाग आणि बांधकाम विभागाकडे पाहिले जाते. महापालिकेच्या बांधकाम विभागाला २०२४-२५ या आर्थिक वर्षात बांधकाम परवानगीतून सुमारे २ हजार ६०१ कोटींचे उत्पन्न मिळविण्यात यश आले आहे. तर, मिळकतकर विभागाला सुमारे २ हजार ३६५ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे मिळकतकर विभागापेक्षा अधिक उत्पन्न मिळविण्यामध्ये बांधकाम विभागाने सलग दुसऱ्या वर्षी बाजी मारली आहे.

पुणे महापालिकेला २०२४-२५ या आर्थिक वर्षात ८ हजार २७२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविण्यात यश आले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा १२ कोटी रुपयांनी उत्पन्न वाढले असून, आतापर्यंतच्या महापालिकेच्या इतिहासामध्ये मिळालेले हे सर्वाधिक उत्पन्न असल्याचा दावा महापालिकेकडून केला जात आहे.

महापालिका आयुक्तांनी २०२४-२५ वर्षासाठी महापालिकेचे ११ हजार ६०१ कोटींचे अंदाजपत्रक तयार केले होते. त्यापैकी ३१ मार्च अखेरपर्यंत ८ हजार २७२ कोटी रुपयांचा महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला. यामध्ये बांधकाम विभागाला बांधकाम परवानगीतून २ हजार ६०१ कोटी, मिळकतकरातून २ हजार ३६५ कोटी, जीएसटीमधून २ हजार ५०० कोटी, मीटरने पाणीपट्टीमधून ११६ कोटी, मुद्रांक शुल्कातून १९० कोटी, तर शासकीय अनुदान आणि इतर मधून ५०० कोटी असे ८ हजार २७२ कोटींचे उत्पन्न मिळाले. गेल्या वर्षी २०२३-२४ या आर्थिक वर्षात पुणे महापालिकेला ८ हजार २६० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. यंदा यामध्ये १२ कोटी रुपयांची वाढ झाली.

### अंदाजपत्रकात प्रत्यक्षात मिळालेले उत्पन्न

- २०२०-२१ ६ हजार २३९ कोटी ४ हजार ७१३ कोटी
- २०२१-२२ ७ हजार ६५० कोटी ६ हजार ८०६ कोटी
- २०२२-२३ ८ हजार ५९२ कोटी ७ हजार १०० कोटी
- २०२३-२४ ९ हजार ५१५ कोटी ८ हजार २६० कोटी
- २०२४-२५ ११ हजार ६०१ कोटी ८ हजार २७२ कोटी

## कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी विश्वासार्ह माहिती संकलित व्हावी : डॉ. दीपक शिकारपूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (आर्टिफिशिअल इन्टेलिजन्स) वापरापूर्वी योग्य आणि विश्वासार्ह माहितीचे संकलन होणे आवश्यक असते. नगर रचना आणि मूल्यांकन विभागात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना विभागाच्या आवश्यकतेनुसार परिणाम साधण्यासाठी सुयोग्य प्रॉम्पटस् वापरणे तसेच शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी स्वतंत्र विभाग विकसित करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी डॉ. दीपक शिकारपूर यांनी केले.

नगर रचना आणि मूल्यांकन विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी शहर नियोजनात कृत्रिम बुद्धिमत्तेचे स्थान या विषयी जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर रचना विभागात मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले



होते. राज्यातील सुमारे 650 अधिकाऱ्यांचा यात सहभाग होता. कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी अवगत करताना डॉ. शिकारपूर यांनी संवाद साधला. नगर रचना विभागाचे संचालक अविनाश पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शिकारपूर पुढे म्हणाले, संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. आज खूप मोठ्या प्रमाणात डिजिटल डेटाची निर्मिती होत आहे. उपलब्ध माहितीच्या आधारे पृथक्करण, विश्लेषण आणि भविष्यसूचक आकृतिबंध तयार करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. नगर रचना विभागातही कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करता येऊ शकतो. परंतु तो करण्याआधी मोठ्या प्रमाणात सुयोग्य आणि विश्वासार्ह माहितीचे संकलन होणे अत्यंत आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर सकारात्म पद्धतीने करा परंतु त्याला ब्रह्मवाक्य समजू नका असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला.

प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनाविषयी माहिती देताना अविनाश पाटील म्हणाले, राज्य सरकारच्या कामकाजास 100 दिवस पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अतंर्गत नगर रचना आणि मूल्यांकन विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. शासकीय कामकाजात सुसूत्रता आणत, कमीतकमी वेळात नागरिकांना सुलभतेने उत्तम सुविधा पुरविण्यासाठी मार्गदर्शन सत्र उपयुक्त ठरणार आहे.

प्रशासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग आणि डेटा ॲनालिसीसचा कशा पद्धतीने वापर होऊ शकतो याविषयी सुहास मापारी यांनी विवेचन केले.

मान्यवरांचा परिचय रेश्मा देशकर यांनी करून दिला तर आभार नगर रचना विभागाचे उपसंचालक किशोर गोखले यांनी मानले.

## आयुर्वेदाचा शास्त्रोक्त पद्धतीने प्रचार-प्रसार व्हावा : डॉ. हर्डीकर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयुर्वेद ही पुरातन उपचार पद्धती असून आयुर्वेदाविषयी जगाला प्रचंड आकर्षण आहे. आयुर्वेदाचा देश-विदेशात शास्त्रोक्त पद्धतीने प्रचार व्हायला हवा, अशी अपेक्षा ख्यातनाम अस्थिव्यंगतज्ज्ञ पद्मश्री डॉ. शरच्चंद्र हर्डीकर यांनी व्यक्त केली.

शतकपूर्ती केलेल्या राष्ट्रीय शिक्षण मंडळाचा एकदंत प्रतिष्ठानतर्फे ‘एकदंत कृतज्ञता पुरस्कार’ देऊन गौरव करण्यात आला. डॉ. शरच्चंद्र हर्डीकर यांच्या हस्ते संस्थेस सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. भालचंद्र भागवत यांनी संस्थेच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी होते. एकदंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मुकुंद कोठावदे, मराठवाडा मित्र मंडळ संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. भाऊसाहेब जाधव, डॉ. भीम गायकवाड मंचावर होते.

डॉ. कोठावदे यांच्या कर्करोग जागृतीवरील भित्तीचित्रे व कलाकृतींचे प्रदर्शन महाविद्यालयाच्या आवारात भरविण्यात आले होते. याचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले.

डॉ. शरच्चंद्र हर्डीकर पुढे म्हणाले, देशात अनंत काळापासून अस्तित्वात असलेल्या आयुर्वेद उपचारपद्धतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. उपचार पद्धतीचे कुठलेही शास्त्र शिका पण इतर शास्त्राचाही अभ्यास करणे गरजेचे आहे. उपचार पद्धतीत काही मर्यादा वाटत असल्या तरी संशोधनाद्वारे त्यात कशाचा समावेश करू शकतो याचाही विचार होणे अपेक्षित आहे.

प्रा. जोशी म्हणाले, आरोग्याच्या क्षेत्रात संवेदनशीलता, नैतिकता आणि मानवता या गोष्टींना खूप महत्त्व आहे. आरोग्याच्या बाबतीत मानवी संवेदना हद्दपार करता येणार नाहीत. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी रुग्ण आणि डॉक्टर यांच्यात होणारा संवाद हा आंतरिक असतो. फॅमिली डॉक्टर ही संकल्पना कालबाह्य होत असताना सध्याची आरोग्य क्षेत्रातील उपचार पद्धती चिंतनाचा विषय ठरावा अशी आहे. डॉ. भागवत म्हणाले, राष्ट्रीय शिक्षण मंडळामुळे आयुर्वेदाचा प्रचार देशातच नव्हे तर परदेशातही मोठ्या प्रमाणावर झाला आहे. डॉ. मुकुंद कोठावदे यांनी प्रास्ताविक केले तर संस्थेविषयी डॉ. भाऊसाहेब जाधव यांनी अवगत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपूर्वा संगोराम यांनी केले तर आभार स्मिता कोठावदे यांनी मानले.



श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट, पुणेच्या वतीने आयोजित ‘सद्गुरु श्री जंगली महाराज १३५ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून रंगीबेरंगी विद्युत रोषणाईने संपूर्ण मंदिर परिसर उजळून गेला आहे.

# मंगेशकर रुग्णालयावरून सत्ताधारी-विरोधक भिडले

## चुकीला माफी नाही मंत्री बावनकुळेंचा इशारा, घटनेचे राज्यात राजकीय पडसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गुरुवारी घडलेल्या घटनेवर आता राजकीय पडसाद उमटण्यास सुरुवात झाली असून पैशांअभावी गर्भवती महिलेवर उपचार करण्यास नकार दिल्याने महिलेचा जीव गेल्याची घटना घडली होती. यानंतर आरोग्य राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी रुग्णालयावर कारवाईचे आदेश दिले आहेत.

माध्यमांशी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आंदोलन करणे हा आपला अधिकार आहे. पण जी चूक झाली आहे ती फार मोठी चूक आहे आणि अशा चुकीला माफी नसते. सरकार यावर योग्य कारवाई करेल कारण कोणाचाही परिवार असो पीएचा आहे किंवा माझा परिवार आहे, असे नाही. सर्वसाधारण गरीब माणसाला अशी सेवा न देणे आणि मुजोरगिरी करणे ही एक प्रकारची मुघलशाही आहे. कोणाची काय चूक आहे ते तपासले पाहिजे. ही गंभीर घटना असून याची दखल स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. आम्ही सर्वांनी याची गंभीर दखल घेतली आहे आणि कोणालाही आम्ही सोडणार नाही असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.



### कठोर कारवाई करणार



रुग्णाच्या कुटुंबीयांना १० लाख रुपये मागण्यात आले होते, आम्ही कोणालाही सोडणार नाही. अजित पवार आहेत, आम्ही आहोत आणि जे काही झाले आहे. यावर आम्ही कठोर कारवाई करणार आहोत. या घटनेमुळे जनतेमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. अशा बाबी आम्ही माफ करणार नाही.

**-चंद्रशेखर बावनकुळे,**




### हिंमत असेल तर कारवाई करा :



या घटनेवर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी देखील संतप्त टीका केली आहे. रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची टीका संजय राऊत यांनी केली आहे. हिंमत असेल तर रुग्णालयावर कारवाई करावी. ज्या ज्या डॉक्टरांचे नावे घेत आहेत भिसे कुटुंब त्यांच्यावर कारवाई करावी. त्यांनी रुग्णालयावर कारवाई करून दाखववी, माझे आव्हान आहे त्यांना. ज्या बाईंचा गुरुवारी मृत्यू झाला त्या बाईंचा शाप लागेल तुम्हाला, असे संजय राऊत म्हणाले.

**-संजय राऊत**

### राज्यात मस्तवाल पद्धत :



शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री संजय शिरसाट यांनी देखील संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. संजय शिरसाट म्हणाले, आधी पैसे जमा करा मग आम्ही उपचार करू, अशा मस्तवाल पद्धतीमध्ये काही हॉस्पिटल सुरू आहेत आणि छोटे नाही तर मोठे जे धर्मदायच्या नावाखाली नोंदणी केली आहे. म्हणून पुण्यातच नव्हे तर महाराष्ट्रामध्ये अशा हॉस्पिटलची चौकशी झाली पाहिजे. या या वर्षात किंवा दोन वर्षात किती गरिबांचा उपचार केलेला आहे

**-संजय शिरसाट**

### चौकशीचे आदेश दिले :



भाजप नेत्या व राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी देखील या घटनेवर प्रतिक्रिया दिली असून, गर्भवतीच्या मृत्यूप्रकरणी चौकशीचे आदेश दिले असल्याची माहिती माधुरी मिसाळ यांनी दिली आहे. माधुरी मिसाळ म्हणाल्या, आम्हाला याची कालच माहिती मिळाली होती आणि आम्ही चौकशीचे आदेशही दिले आहेत.

**-मंत्री माधुरी मिसाळ**



## भक्तिगीतांतून शब्द आणि संगीताचा सुरेल मिलाफ

**पुणे :** आरंभी वंदीन अयोध्येचा राजा... कबीराचे विणतो शेले... कानडा राजा पंढरीचा... अशा एकाहून एक सरस रचनांसह नमो ज्ञान राजा... यासारख्या संत साहित्यातील काही नवीन स्वरबद्ध अभंग पेशवेकालीन तुळशीबाग श्रीराम मंदिरात सादर झाले. भक्तिगीतांतून शब्द आणि संगीताचा सुरेल मिलाफ यानिमित्ताने रसिकांनी अनुभवला.

श्री रामजी संस्थान तुळशीबाग च्यावतीने श्रीराम मंदिरात श्रीरामनवमी उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये 'राम बरवा कृष्ण बरवा' या वृषाली मावळंकर, केतन अत्रे व सहकारी यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले, विश्वस्त डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले, कोटेश्वर तुळशीबागवाले, रामदास तुळशीबागवाले, श्रीपाद तुळशीबागवाले, राघवेंद्र तुळशीबागवाले यांसह तुळशीबागवाले परिवार उपस्थित होता.

# प्रवाशांचे ‘हवाहवाई’...!

## देशातंर्गत प्रवासाला पसंती; ९ महिन्यात ५४ लाख प्रवाशांचा प्रवास

पुण्याला गेल्या एक वर्षापासून हक्काचा असा केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री म्हणून मुरलीधर मोहोळ यांच्यासारखा शांत आणि संयमी असा मंत्री लाभला आहे, विशेष म्हणजे मोहोळ यांनी या अल्पशा कालावधीत आपल्या कामाची छाप सर्वसामान्य नागरिकांमध्ये उमटवली आहे. याच माध्यमातून त्यांनी त्यांचे ‘होम पीच’ असलेल्या पुण्यावर अधिक लक्ष केंद्रित करुन पुणे विमानतळावर आमूलाग्र असे बदल केले आहेत, त्यांची ही कामाची पद्धत अतिशय वाखाणण्याजोगी अशीच आहे. प्रवाशांनीही या नेत्याने केलेल्या कामाचा पूरेपूर वापर केला आहे. विशेष म्हणजे विमानतळावरील प्रवाशांचा राबताही वाढला असून महसूलातही काही पटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे पुण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

“ आगामी काळात पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तार करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय उड्डाणे वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

**-संतोष ढोके,** संचालक, पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ



“ पुणे विमानतळावरील प्रवासी वाहतुकीने प्रथमच एक कोटीहून अधिकचा टप्पा पार केला आहे. पुण्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे. भविष्यात वाढत्या प्रवाशांची संख्या पाहता विमानतळावर आणखी पायाभूत सुविधा निर्माण होणे गरजेचे आहे.

**-धैर्यशील वंडेकर,** वाहतूक तज्ज्ञ



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे विमानतळाचे विस्तारीकरण, आंतरराष्ट्रीय विमानांची उड्डाणे आणि नवीन टर्मिनल यामुळे प्रवासी संख्येत वाढ झाली असून, गेल्या वर्षभरात प्रथमच एक कोटी प्रवाशांचा टप्पा ओलांडला गेला आहे. त्यामध्ये प्रवाशांनी आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासापेक्षा देशांतर्गत प्रवासाला पसंती दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

या विमानतळावरून २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत २०२४-२५ मध्ये १०.६६ टक्के प्रवाशांची वाढ झाली आहे, तर विमान वाहतूक ७.५ टक्क्यांनी वाढली आहे. या विमानतळाचे विस्तारीकरण, उडाण योजनेंतर्गत देशांतर्गत उड्डाणे, आंतरराष्ट्रीय विमानांची उड्डाणे, नवीन टर्मिनलमुळे विमान वाहतूक वाढली आहे.

तसेच, प्रवाशांसाठी असलेल्या डीजी यात्रा सुविधेमुळे हवाई प्रवासाला पसंती देण्यात आली आहे. या विमानतळावरून वर्षभरात एक कोटी प्रवाशांनी प्रवास केला आहे. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात नऊ लाख ५४ हजार प्रवाशांनी प्रवास केला, असून यामध्ये नऊ लाख २० हजार देशांतर्गत, तर ३३ हजार ३३७ आंतरराष्ट्रीय हवाई प्रवाशांचा समावेश असल्याचे केल्याचे विमानतळ प्रशासनाकडून सांगण्यात आले.

विमानांच्या वाहतुकीतही ७.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत साडेचार हजार विमानांची उड्डाणे वाढली आहेत. गेल्या वर्षभरात या विमानतळावरून ६८ हजार ५५७ विमानांची वाहतूक झाली आहे. दरम्यान, या विमानतळावरून मालवाहतुकीत ८.८५ टक्के वाढ झाली आहे.

### देशांतर्गत ३५ ठिकाणी उड्डाणे

● पुणे विमानतळावरून सद्य:स्थितीत देशांतर्गत ३५ ठिकाणी उड्डाणे होत आहेत. भोपाळ, त्रिवेंद्रम, चेन्नई, इंदोर, अहमदाबाद, देहराडून येथे विमानसेवा सुरू करण्यात आल्याने प्रवाशांची संख्या वाढली आहे.

# महापालिकेचा मिळकतदारांना दिलासा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी हातभार लागणार आहे. पुणे महापालिकेने मिळकतकरदात्यांना मोठा दिलासा दिला असून याबाबतची बिले त्यांना १ मेनंतर पाठविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. राज्य शासनाने मिळकतकरात ४० टक्के सवलत देण्याच आदेश दिला आहे. मात्र ही सवलत कशी दिली जाते, याची माहिती करदात्यांना समजत नाही. तसेच करआकारणी विभागाकडून संबंधित मिळकतदारांना ४० टक्के सवलत देऊन बिल पाठवले जात नसल्यामुळे सुमारे तीन लाख मिळकतदारांची ४०० कोटी रुपयांची थकबाकी दिसून येते, अशा आशयाच्या तक्रारी महापालिकेकडे काही सामाजिक संस्थांनी केल्या होत्या. त्यानंतर महापालिकेच्या करआकारणी विभागाने करात ४० टक्के सवलत दिल्याच्या स्पष्ट उल्लेख करुन १ मेनंतर तशी बिले पाठविली जाणार असल्याचे जाहीर केले. या निर्णयामुळे महापालिकेच्या उत्पन्नात भर पडणार असून दुसरीकडे करदात्यांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

४० टक्के सवलतीची बिले पाठविल्यानंतर महापालिकेला ४०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकणार आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी तत्काळ ही बिले पाठविण्याचे आदेश द्यावे, अशी मागणी आपले पुणे आणि आपला परिसर संस्थेने तसेच सजग नागरिक मंचने केली होती. याची दखल घेत मिळकतकर आकारणी विभागाने बिले तयार करण्यास सुरुवात केली आहे. या विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये सवलती देण्यावरुन संभ्रम होता. त्यामुळे ही बिले पाठवण्यासाठी निर्णय घेण्यात आला नव्हता. मात्र आता बिले पाठविल्यानंतर ९० दिवसांच्या आता बिलाची रक्कम भरावी. त्यानंतर मात्र महापालिकेकडून दंडात्मक कारवाई केली जाईल, असे मिळकतकर आकारणी विभागाच्या प्रमुख प्रतिभा पाटील यांनी सांगितले.



## महापालिकेच्या कोट्यावधीच्या जागेवर अतिक्रमण

**पुणे :** वानवडी येथील महानगरपालिकेच्या आरक्षित जागेवर विंडसर अवेन्यू कॉन्डोमिनियम सोसायटीने अतिक्रमण केले असून, ३५ ते ४० कोटी रुपयांचा बाजारभाव असलेली ४० हजार चौरस फूट जागा गिळंकृत करण्याचा प्रयत्न सुरु असल्याचा आरोप समाजवादी पक्षाचे पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी सरचिटणीस दत्ता पाकीरे, उपाध्यक्ष अनिरुद्ध सुर्यवंशी, महिला अध्यक्ष साधना शिंदे, चिटणीस शहाजहान झारी आदी उपस्थित होते.

जांबुवंत मनोहर म्हणाले, "एकीकडे सरकार वक्फ बोर्डाच्या जागेवर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन विधेयक आणत आहे. मात्र, इथे पुण्यात महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर खासगी सोसायटी कब्जा करीत असताना त्याकडे डोळेझाक केली जात आहे. शहरातील अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका प्रशासन कारवाई करणार, असे सांगत आहे. मात्र, स्वतःच्या जागेतील अतिक्रमण वारंवार आदेश देऊनही का काढू शकत नाही, असा प्रश्न आहे. समाजवादी पक्षाने निवेदन देऊनही कारवाई होत नसेल, तर सोसायटीशी महानगरपालिकेची मिलीभगत तर नाही ना? असा संशय आम्हा कार्यकर्त्यांना येत आहे.

## 'अभिषेकी' सुरांनी बहरली संगीत मैफल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अविट गोडीचे राग, त्याला सप्तसुरांची साथ, तबल्याच्या थापेने निर्माण होणारे ताल आणि त्याला गायकांची सुरेल गायन साथ... अशा राग आणि सुरांनी नटलेल्या ज्येष्ठ गायक पंडित शौनक अभिषेकी यांच्या संगीत मैफिलीने सद्गुरु श्री जंगली महाराज संगीत महोत्सव बहरला.

सद्गुरु श्री जंगली महाराज यांच्या १३५ व्या पुण्यतिथी दिनानिमित्त श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट तर्फे आयोजित उत्सवामध्ये पंडित शौनक अभिषेकी आणि सहकारी कलाकारांनी शास्त्रीय संगीताची सुमधुर मैफल सादर केली.

पंडित शौनक अभिषेकी यांनी अबोर रागातील झपताल खयाल एक तालाने मैफिलीची सुरुवात केली . 'नयना पार लग' या गाण्याला तीन तालामध्ये सादर करून पंडित शौनक अभिषेकी यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. करण देवगावकर (गायन), प्रणव गुरव (तबला), मिलिंद कुलकर्णी (हार्मोनियम) अतुल गरुड (तालवाद्य) यांनी पंडित अभिषेकी यांना सुरेल साथ संगत केली.

पंडित शौनक अभिषेकी यांचे विविध रागातील हरकतींचे सूर, त्याला तबला आणि संवादिनीची सुरेल साथ यामुळे जंगली महाराज मंदिराचा भक्तिमय परिसर मैफिली मुळे संगीतमय झाला होता.



पुणे सद्गुरु श्री जंगली महाराज यांच्या १३५ व्या पुण्यतिथी दिनानिमित्त श्री जंगली महाराज देवस्थान ट्रस्ट तर्फे आयोजित उत्सवामध्ये पंडित शौनक अभिषेकी आणि सहकारी कलाकारांनी शास्त्रीय संगीताची सुमधुर मैफल सादर केली.



## 'रणधुरंदर नानासाहेब पेशवे ' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे :** मोहन शेटे लिखित व भारतीय विचार साधना निर्मित ' रणधुरंदर नानासाहेब पेशवे ' या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते झाले.

सन १८५७ च्या स्वातंत्र्य समरचे शिल्पकार नानासाहेब पेशवे यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त उत्तर प्रदेशातील कानपूर जवळ बिठूर येथे आयोजित भव्य कार्यक्रमात पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, अजित तुकदेव, निलिमा चिवटे, कुंदनकुमार साठे, सुधीर थोरात, संदीप महिंद उपस्थित होते.

योगी आदित्यनाथ म्हणाले, भारतीय स्वातंत्र्य संग्रामात इंग्रजांविरुद्ध संपूर्ण देशाला संघटित करण्याचे अतुलनीय कार्य नानासाहेबांनी केले होते. या बिठूरच्या पावन भूमीवर नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी युद्ध प्रशिक्षण घेतले होते.ज्या सशस्त्र क्रांतिकारकांच्या बलिदानामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले त्यांचे कृतज्ञतेने स्मरण करणे हे आपले कर्तव्य आहे.

# क्रिएटिव्ह आणि मुकुलमाधव फाउंडेशनचा एक हात मदतीचा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एखाद्या संस्थेला, गणपती मंडळाला नेमकं काय हवंय हे ओळखून त्यांच्या गरजेवर आधारित उपक्रमाचे महत्व हे जास्त असतं आणि म्हणून संदीप खर्डेकर, क्रिएटिव्ह फाउंडेशन, मुकुलमाधव फाउंडेशन आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या कल्पकतेचे अभिनंदन करतो असे गौरवोदगार ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी काढले.

क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि मुकुलमाधव फाउंडेशनच्या वतीने शुक्रवारी ३५ संस्था, गणेश मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ व ज्ञाती संस्था तसेच भजनी मंडळाना उपयुक्त असे खुर्च्या, स्पीकर सेट, वॉटर कुलर व इतर साहित्य भेट देण्यात आले त्या वेळी ते बोलत होते.

वाईट अनुभव, त्यातून आलेली निराशा किंवा इतर कारणांनी ते बंद पडलेले मी पहिले आहे. मात्र सातत्याने वर्षानुवर्षे उपक्रम करण्यात क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि मुकुलमाधव फाउंडेशन चे वेगळेपण आहे, क्रिएटिव्ह फाउंडेशन ने सातत्याने सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार केला असून यापुढील काळात रोख स्वरूपात वर्गणी न देता वस्तूरूपी मदत करण्यात येणार असल्याचे फाउंडेशन चे अध्यक्ष संदीप खर्डेकर म्हणाले. यावेळी क्रिएटिव्ह फाउंडेशन चे अध्यक्ष संदीप खर्डेकर, मुकुलमाधव फाउंडेशन चे सचिन कुलकर्णी, योगेश रोकडे, क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या विश्वस्त माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, विश्वस्त प्रतीक खर्डेकर, विश्वस्त सतीश कोंडाळकर, कोथरूड मंडल भाजपा अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला, नगरसेवक दीपक पोटे, माजी नगरसेवक विशाल धनवडे, भाजपा शहर उपाध्यक्ष प्रशांत हरसूले, उपाध्यक्ष मंदार बलकवडे, सर्वेश जोशी, संदीप पाटील, नितीन कंधारे, सतीश गायकवाड ही आदी मान्यवर उपस्थित होते.



“ समाजात काम करताना लोकोपयोगी वस्तू भेट देणे महत्वाचे असून केवळ सरकारवर अवलंबून राहून समाजाची परिस्थिती किंवा सामाजिक स्वास्थ्य सुदृढ होणार नाही, तर त्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी आपल्या परीने गरजुंना मदत केली पाहिजे.

**—ना. चंद्रकांतदादा पाटील,**



## पुणे हादरलं; कोयत्याने मानेवर सपासप वार

**पुणे :** घरगुती वादातून पुतण्यासह एकाने चुलत्याच्या मानेवर कोयत्याने वार करून खून केल्याची घटना आज शुक्रवारी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास धामणे ग्रामपंचायत कार्यालयाजवळ तालीम ता. मावळ जि. पुणे येथे घडली. शिरगाव परंदवडी पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. महादेव भगवान गराडे (वय ७३, रा. धामणे ता.मावळ) असं हत्या झालेल्या चुलत्याचं नाव आहे. मंगेश किसन गराडे (वय ३८, रा.धामणे मावळ) आणि एक अनोळखी असे या हत्येती आरोपी आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक तेजस्विनी कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत महादेव गराडे आणि आरोपी मंगेश गराडे यांच्यात सतत घरगुती वाद होते. त्यातून आरोपी मंगेश गराडे आणि त्याच्या एका साथीदाराने मयत महादेव गराडे यांच्या मानेवर कोयत्याने वार केले. यात गंभीर जखमी झाल्याने महादेव गराडे यांचा जागीच मृत्यू झाला. हत्या केल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक तेजस्विनी कदम करत आहेत.



## अट्टल चोरटा अखेर जेरबंद

**कोंढवा :** त्रिमुर्ती चौकातील कपड्याचे दुकानाचे शटर उचकटून त्यातील अडीच लाख रुपयांचे कपडे व रोकड चोरुन नेणाऱ्या अट्टल चोरट्याला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली आहे. सुलतान रिजवान शेख (वय २२, रा. गल्ली नंबर २३, शिवनेरीनगर, भगवा चौक, कोंढवा)असे या चोरट्याचे नाव आहे. दुकानातून चोरलेले १५ हजार रुपयांचे कपडे जप्त करण्यात आले आहेत. भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यातील तपास पथकाने केलेल्या तपासात पोलीस अंमलदार मंगेश पवार, महेश बारवकर, सचिन गाडे, अभिनय चौधरी, तुकाराम सुतार यांना हा घरफोडी रेकॉर्डवरील गुन्हेगार सुलतान शेख याने केल्याची माहिती मिळाली. त्याचा शोध घेत असताना तो कोंढव्यातील शिवनेरीनगर येथे मिळून आला. त्याला २ एप्रिल रोजी पोलिसांनी अटक केली. त्याने साथीदाराच्या मदतीने घरफोडी केल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडून १५ हजार रुपयांचा माल जप्त केला असून उर्वरित माल व साथीदाराचा तपास सुरु आहे.



## आंबेडकर संग्रहालयात रविवारी वारसा दर्शन

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचे औचित्य साधत सिम्बायोसिस येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालयात रविवारी (ता. ६) सकाळी साडेनऊ वाजता वारसा दर्शन कार्यक्रम होईल. इतिहास प्रेमी मंडळ आणि लोकमान्य कल्चरल फाउंडेशन यांच्यातर्फे हा कार्यक्रम होईल. सिम्बायोसिस संस्थेने निर्माण केलेल्या या जागतिक दर्जाच्या संग्रहालयात डॉ. आंबेडकर यांच्या वापरातील अनेक वस्तू , कपडे, टेबल-खुर्ची, भांडी, पुरस्कार व त्यांनी अखेरचा श्वास घेतलेला पलंग नागरिकांना पाहायला मिळेल, तसेच त्यांच्या देदीप्यमान वाटचालीतील महत्त्वाची छायाचित्रे पाहायला मिळतील. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डॉ. आंबेडकर स्वतः आपल्याला प्रश्नांची उत्तरे देणार असलेला विलक्षण अनुभव घेता येईल.

# चुकीला माफी नाही

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा

- पुणे येथे महसूल परिषदेचे उद्‌घाटन
- शेतीला रस्ते, पाणी, वीज द्या!
- देशाने महाराष्ट्राचा आदर्श घ्यावा असे काम करा
- किचकट कायदे सोपे करू
- महिन्यातून किमान एक पत्रकार परिषद घ्या
- विकसित महाराष्ट्रासाठी नावीन्यतेचा शोध घ्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तलाठ्यापासून मंत्रालयातून राज्याचा कारभार चालवणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत आपण 'एक परिवार' आहोत हे ध्यानात ठेवून न घाबरता जनतेची कामे करावी. अनवधानाने झालेली चूक माफ करता येते, जनतेच्या विश्वासाला तडा जाईल अशी चूक जाणीवपूर्वक झाली तर माफी नाही, हेही लक्षात असू द्या, असा कानमंत्र महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्रातील सर्व वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांना दिला.



पुणे येथे दोन दिवस महसूल परिषद होत आहे. या परिषदेच्या उद्‌घाटन करताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्राची रूपरेषा आखली आहे. ती पूर्णत्वास नेण्यासाठी पडेल ते कष्ट करा. महसूल विभागाला प्रशासनाचा कणा म्हणतात. त्यामुळे लोककल्याणकारी योजना राबविताना समाजाच्या शेवटच्या माणसाची काळजी घ्या. त्याचा कणा ताठ राहिला पाहिजे यासाठी जिवाचे रान करा. राज्याचा कारभार पारदर्शी आणि गतिमान करण्याचे काम महसूल विभागच करू शकतो, हा विश्वास मला आहे.

कार्यशाळेस अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे, जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, नागपूर विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिद्री, अमरावती विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्यासह सर्व जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी आदी उपस्थित होते.

पुढील दोन वर्षात एकाही व्यक्तीची सुनावणी बाकी राहता कामा नये असा संकल्प करून महसूल विभागाचा देशात आदर्श निर्माण करावा. शेतकऱ्यांच्या आत्महत्या अतिशय दुर्दैवी आहेत.. आपण त्या थांबल्या पाहिजेत यासाठी काम करण्याची गरज आहे. शेतीला पाणी, पाणंद रस्ते, वीज देण्यासाठी पुढाकार घेऊन शेतकऱ्याला सुखी करण्याचे प्रयत्न होऊ द्या.आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. जनतेला आम्ही उत्तरदायी आहोत. जनतेने दिलेली मतं ही आम्ही कर्ज समजतो. त्यासाठी जनतेला उत्तरदायी राहणे हे आमचं कर्तव्य आहे. महसूल विभागाने लोकाभिमुख निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. कामात आधुनिकीकरण आणि ए आयचा वापर झाला तर महसूल विभाग अधिक चांगले काम करत आहे हे लक्षात येईल. कुटुंब प्रमुख म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी कायम तुमच्या पाठीशी आहे. आपण मिळालेली जबाबदारी ही केवळ जबाबदारी न समजता नाविन्यपूर्ण काम केले पाहिजे. आपल्या काळात एखादे तरी काम चांगले जनतेच्या हिताचे झाले पाहिजे असा उद्देश ठेवा. अनेक किचकट कायदे सोपे केले पाहिजेत, कायदा करताना विधिमंडळातही महसूल विभागावर विश्वास दाखवला जातो.

आपण नव्याने काही योजना आणत आहोत यामध्ये वाळू धोरण, देवस्थान जमिनी, भोगवटा दोनच्या जमिनी एक करणे, स्वामित्व योजना, पाणंद रस्ते अशा पद्धतीची कामे केली जाणार आहेत. यासाठी ही कामे करताना अधिकाऱ्यांनी आपली मानसिकता बदलली पाहिजे. सकारात्मक राहा व जनतेची कामे करा. कोणावरही निलंबन , अभियोगाची कारवाई करताना मंत्री म्हणून आनंद होत नाही ; मात्र खूप चुकीच्या पद्धतीने काम केले तर त्याच्यावर कारवाई होणार.

### माध्यमांना सकारात्मक सामोरे जा

● माध्यमे लोकांसाठी असतात , जनतेचे प्रश्न ते मांडतात. आपल्या विभागातील लोकाभिमुख निर्णयाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या पाहिजेत. माध्यमांना घाबरू नका. आपले चांगलं काम त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करा. प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी महिन्यातून किमान एक पत्रकार परिषद घेतली पाहिजे. अनेक ठिकाणी प्रवास करून वेगवेगळे अनुभव आणि चांगलं काम माध्यमांसमोर मांडा. सकारात्मक बातम्या समाजाची गरज आहे. माध्यमे सकारात्मकता नक्कीच वाढवितात. प्रवास आणि संवाद हीच आपल्या यशाची पुढची पावले आहेत. इतर राज्यांमध्ये काय चालले आहे याचा देखील अभ्यास करावा

### उसनवारी पद्धत बंद करणार

● महसूल विभागातील लोक हे इतर शासकीय विभागांमध्ये जाण्याचे प्रमाण खूप वाढलेले आहे. त्यामुळे महसुल विभागातील कामकाजावर अधिक ताण पडतो. यापुढे असे होणार नाही. इतर ठिकाणी पाठवलेल्या लोकांना पुन्हा महसूल विभागामध्ये आणण्याचे काम पुढील काळामध्ये होऊन आस्थापना अधिक सशक्त केली जाईल असे सांगून बावनकुळे म्हणाले की, अधिकाऱ्यांनी चुकीचे काम अजिबात करू नये. अगदी मंत्र्यांनी जरी सांगितले आणि नियमात बसत नसेल तर स्पष्टपणे मत नोंदवा, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

### बोधचिन्हाचे प्रकाशन

● कार्यक्रमावेळी भूमी अभिलेख बोधचिन्हाचे उद्‌घाटन करण्यात आले. त्याबरोबरच इप्सित, तीस भू प्रणाम केंद्र, ई मोजणी वर्जन टू आणि महा खनिज ऑटो या प्रकल्पांचेही उद्‌घाटन ऑनलाईन पद्धतीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार यांनी केले तर पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी आभार मानले.

# समाजासाठी योगदान देणाऱ्यांचा सन्मान देशसेवेचे प्रतीक : चंद्रकांत पाटील



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "देशासाठी बलिदान देणाऱ्यांचे स्मरण आणि समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्वाचा सन्मान करणे हेही देशसेवेचेच काम आहे. समाजातील आदर्श व्यक्तींचा सन्मान करून देशप्रेमाची भावना वाढवण्याचे काम त्यातून होते," असे मत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मरणार्थ आयोजित 'व्यर्थ ना हो बलिदान' देशभक्ती पुरस्कार सोहळा नुकताच उत्साहात झाला. त्यावेळी चंद्रकांत पाटील बोलत होते.

वंदे मातरम् संघटना पुणे जिल्हा, पुणे शहर आणि संयुक्त युवा फिनिक्स सोसायटी ट्रस्टतर्फे हा सोहळा आयोजिला होता. याप्रसंगी शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मरणार्थ टिळक चौक ते स. प. महाविद्यालय मशाल फेरी काढण्यात आली. एअर मार्शल भूषण गोखले, आमदार हेमंत रासने, वंदे मातरम् संघटना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सचिन जामगे, बाळासाहेब जगताप, डॉ. दत्ता कोहिनकर, अमोल जगताप, महेश बाटले आदी उपस्थित होते. झहीर मुलानी, मोहित काकडे, संतोष देवकर, राज घाटे, किरण केकाणे, आदित्य मुंगळे, आकाश जामगे आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

**सन्मान कार्यांचा -**

**पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानित केले. योगगुरू डॉ. संप्रसाद विनोद यांना 'जीवनगौरव पुरस्कार', ॲड. एस. के. जैन यांना 'शैक्षणिक गौरव पुरस्कार', राजेश पांडे यांना 'राजकीय गौरव पुरस्कार' तसेच, मंदार गोंजारी यांना 'पत्रकारिता गौरव पुरस्कार', ओम भुतकर आणि संस्कृती बालगुडे यांना 'कला गौरव पुरस्कार', तर गजेंद्र पवार यांना 'उद्योजकता गौरव पुरस्कार', महेंद्र चव्हाण यांना 'क्रीडा गौरव पुरस्कार', तर डॉ. अभिजित सोनवणे, डॉ. बच्चू सिंग यांना 'सामाजिक गौरव पुरस्कार' देण्यात आला.**

# पुण्यात पुन्हा ठाण्याच्या रिक्षाची जोरदार चर्चा...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर बदनामीकारक काव्य करणाऱ्या स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराला पुणेकराने चोख प्रत्युत्तर दिले आहे. कामराच्याच शैलीत काव्य करीत एकनाथ शिंदे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करणारा फलक टिळक रस्त्यावर झळकला आहे. रिक्षा चालवताना एकनाथ शिंदे आणि मागे बसलेला 'कॉमन मॅन' असे व्यंगचित्र असलेला हा फलक सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे. 'बोलनेवाले बोलते रहें, वो काम ही करता जाए !' अशा शब्दांत शिंदे यांचा गौरव करण्यात आला आहे.

युवा सामाजिक कार्यकर्ते वैभव वाघ यांनी हा फलक दुर्वांकुर डायनिंग हॉलसमोर लावला आहे. 'ठाणे की रिक्षा, चेहरे पे दाढी' गाण्यांच्या ओळी लिहीत 'शेर नजर वो आए' असा गौरवपूर्ण उल्लेख शिंदे यांचा करण्यात आला. हिंदुत्वाचा कैवारी, चिपळूणचा महापूर, इर्शाळवाडीची दुर्घटना यामध्ये शिंदे यांनी तत्परता दाखवत थेट घटनास्थळी जाऊन केलेले कार्य, आरोग्य कक्षाच्या माध्यमातून केलेले कार्य यासह लाडकी बहीण योजना या काव्यातून मांडली आहे. काश्मीरच्या लाल चौकातील गणेशोत्सवात त्यांनी घेतलेला सक्रिय सहभाग यातून त्यांची कीर्ती ठाणेच नव्हे, तर पूर्ण देशभर असल्याचे दिसून येते, असे यातून सांगण्याचा प्रयत्न आहे. नागरिकांचे लक्ष वेधून घेणारा हा फ्लेक्स लावणारे वैभव वाघ हे पुणे जिल्ह्यात एक कल्पक आणि क्रियाशील नेतृत्व म्हणून प्रसिध्द आहेत.



"एकनाथ शिंदे यांनी अवघ्या अडीच वर्षात मुख्यमंत्री केलेले लोकोपयोगी कार्य प्रेरणादायी आहे. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून अधिकाधीक चांगल्या सोयीसुविधा, योजना देण्याचे काम त्यांनी केले. लाडकी बहीण योजना आणली, मुख्यमंत्री आरोग्य सहायता कक्षातून लाखो गोरगरिबांना सेवा दिली. शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी, कामगारांसाठी, हिंदुत्वासाठी चोवीस तास उपलब्ध असणाऱ्या उपमुख्यमंत्र्यांबाबत कुणाल कामराने बदनामीकारक वक्तव्य संतापजनक आहे. — वैभव वाघ

# कायम महिलांचा सन्मान करावा : रघुनाथ यादव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खानापूर :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयाचे प्रथम विद्यार्थी रघुनाथ यादव यांचेकडून गरजवंत विद्यार्थ्यांची सुमारे १८ हजार शैक्षणिक शुल्क भरून अर्थसहाय्य केले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करेन तसेच सर्वांनी महिलांचा सन्मान करावा असे रघुनाथ यादव म्हणाले. मी महिला आहे याचा मला अभिमान आहे. या मुलींसाठी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थीनींना प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देवून रघुनाथ यादव, मुख्याध्यापक पांडूरंग फापाळे यांचे हस्ते गौरविण्यात आले.

प्रास्ताविक जेष्ठ शिक्षक शशिकांत जाधव यांनी केले.रघुनाथ यादव हे नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतात असे जाधव म्हणाले. यशस्वी विद्यार्थी लहान गट कु समृद्धी गणेश जाधव (प्रथम क्रमांक), साक्षी सचिन जावळकर (द्वितीय क्रमांक), आर्या किरण जावळकर (तृतीय क्रमांक) मोठा गट ज्ञानेश्वरी सचिन जावळकर (प्रथम क्रमांक), स्नेहल बाळासाहेब जगताप (द्वितीय क्रमांक), हर्षदा पांडुरंग पाटील (तृतीय क्रमांक) कार्यक्रमाचे निवेदन भगवान मदने व आभार ज्योत्स्ना गुरव यांनी केले.



पुणे मुलींसाठी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थीनींना प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देवून रघुनाथ यादव, मुख्याध्यापक पांडूरंग फापाळे यांचे हस्ते गौरविण्यात आले.

# पुणे विद्यापीठ आयोजित कार्यशाळेला तरुणांचा उदंड प्रतिसाद!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "संविधानतील शाश्वत विकास आणि युवकांचा विकास" या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र प्रशाळे अंतर्गत शिक्षणशास्त्र आणि विस्तार विभाग, 'राष्ट्र निर्माण' अंतर्गत कार्यशाळेत तरुणांचा उदंड प्रतिसाद!

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित संविधानिक मूल्ये, शाश्वत विकास ध्येय, मानव विकास निर्देशांक व युवा विकास या विषयांवर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे पॅट्रॉन प्रो. डॉ. सुरेश गोसावी, प्रो. डॉ. पराग काळकर, प्रमुख पाहुणे आरती अहिवळे व पाहुणे प्रसिद्ध उद्योजक सागर अहिवळे, विशेष अतिथी पार्थ बीश्वास विश्वास, अध्यक्ष प्रो. डॉ. विलास आढाव व विशेष सहकार्य प्रो. डॉ. गीता शिंदे यांचे लाभले. आंतरराष्ट्रीय ईपीडी तज्ञ आणि ग्रीननेक्स एन्व्हायर्नमेंटलच्या प्रसिद्ध उद्योजिका, आरती अहिवळे यांनी मानवांवर आणि पर्यावरणावर कार्बनचा प्रभाव कसा कमी करायचा याबद्दल मार्गदर्शन केले. यांनी औद्योगिक क्रांती आणि त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम याबद्दल बोलले. विविध प्रकारचे प्रदूषण आणि जागतिक तापमानवाढ, उत्पादन निर्मितीसाठी नैसर्गिक संसाधनांचा बेसुमार वापर झाल्यामुळे निसर्गावर होणारा परिणाम झाले आहे. वर्ष २०१२ मध्ये फक्त २ कर्मचाऱ्यांपासून सुरू झालेल्या ह्या कंपनीत आता ३५० कर्मचारी आहेत. पॅरिस करार अंतर्गत कार्बन न्यूट्रल २०७० पर्यंत करण्यासाठी मुबलक स्व-रोजगार रोजगार आणि नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

प्रसिद्ध उद्योगपती सागर अहिवळे यांनी ग्रीन सोल्युशन कंपनी पाणी, प्लास्टिक हवा आणि प्रदूषणातून कार्बन आणि इतर हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यास कशी मदत करते याबद्दल माहिती दिली. त्यांनी या क्षेत्रातील विविध करिअर, बाजार संशोधन आणि अनेक नोकरीच्या संधींबद्दल मार्गदर्शन केले. एम्पॉवर चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक विनय दवे यांनी आभार मानले. भावना लाटे, निशा जाधव, दीपिका पवार, ऋषिकेश दराडे, शिवम पाल, सूर्यवंशी क्षितिज, शुभम यादव, गौरव महाजन, गौरव. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. समाधान फुगे आणि डॉ. गायत्री चौकडे, हर्षदा आणि आयुष यांनी कठोर परिश्रम घेतले.

राष्ट्र उभारणीच्या सर्व सहा क्षेत्रांवर म्हणजेच शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगार, शांतता आणि सुरक्षा, समानता आणि समावेशन, नागरी आणि राजकीय सहभाग विशेष आहे. एसडीजी म्हणजे निसर्ग आणि मानवाचे सहअस्तित्व. जर focus is reduced, लक्ष कमी केले तर ते आपल्या जीवनावर परिणाम करणारे संतुलन बिघडवते. आपण शाश्वत विकास ध्येयांसाठी हिरवळीच्या आच्छादनावर, रोजगाराच्या संधींवर देखील काम केले पाहिजे. शिक्षण आणि माहितीपटांच्या माध्यमातून ते लागू केले पाहिजे आणि पुढील पिढीच्या चांगल्या स्थितीसाठी काही एसडीजी ध्येयांमध्ये प्रभावीपणे सकारात्मक परिणाम करणारे योगदान दिले पाहिजे.

— प्रा.कुलगुरू डॉ. पराग काळकर



## विजांच्या गडगडाटासह पावसाची हजेरी

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहराच्या विविध भागात विजांच्या गडगडाटासह पावसाने हजेरी लावली आहे. गुरुवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास शहरातील विविध भागात जोरदार तर काही ठिकाणी हलक्या सरी बरसल्या.पिंपरी चिंचवड शहर आणि परिसरात गुरुवारी पावसाने जोरदार हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण पिंपरी चिंचवडकरांच्या जीवाला थंडावा मिळाला. पावसाच्या सरी कोसळल्याने मातीचा छान सुगंध दरवळत होता. तसेच अचानक सुरु झालेल्या या पावसामुळे कामानिमित्त घराबाहेर असलेल्या लोकांची मात्र दाणादाण उडाली. दुचाकीस्वारांना रस्त्याच्या कडेला गाड्या उभ्या करुन उभे राहावे लागले. तर काहींनी घरी मस्त गरमागरम भाजी आणि चहा चा बेत केला.

## पोलिस ठाण्यात फौजदाराला शिवीगाळ करत मारहाण

**पिंपरी :** एकाचा जामीन अर्ज रद्द करावा, या मागणीसाठी पोलिस ठाण्यात आलेल्या एका नागरिकाने फौजदाराला शिवीगाळ करत मारहाण केली. ही घटना बुधवारी (दि.२) रात्री आठच्या सुमारास हिंजवडी पोलिस ठाण्यात घडली. मधुकर रतिकांत जगताप (४७, रा. सांगवडे, मावळ) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर झोल यांनी हिंजवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी मधुकर जगताप हा तुषार नथू जगताप (रा. – सांगवडे) या व्यक्तीचा अटकपूर्व जामीन रद्द करण्याबाबतचा अर्ज घेऊन आला होता. त्या वेळी फिर्यादी ज्ञानेश्वर झोल हे ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्य पार पाडीत होते. आरोपी मधुकर जगताप याचा अर्ज त्यांनी घेतला.

## चैत्र नवरात्री निमित्त 'माता की चौकी' कार्यक्रम संपन्न



**पिंपळे सौदागर :** चैत्र नवरात्रीच्या निमित्ताने समृद्धी पार्क सोसायटी पिंपळे सौदागर येथील रहिवाशांनी माता की चौकी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ह्या कार्यक्रमाला परिसरातील ५ ते ६ सोसायटीच्या लोकांनी सहभाग घेतला होता. माता की चौकीचे आयोजन सोसायटीचे अध्यक्ष सुशील भाटिया, सचिव विवेक अग्रवाल, सल्लागार समीर सचदेवा, आदित्य गौंड यांनी केले होते. सोसायटी सदस्यांनी माता की चौकीचा आनंद लुटला आणि हिंदू नववर्ष एकत्र साजरे केले. सदस्यांनी श्री. भाटिया यांना असे अधिकाधिक कार्यक्रम आयोजित करण्याची विनंती केली.

## देहूत कांदा चोरांचा सुळसुळाट

**देहूगाव :** सध्या कांद्याला बाजार भाव मिळत नसला तरीही चोरट्यांनी शेतातील दहा ते अकरा गोण्या म्हणजे साडेपाच क्विंटल कांदे चोरून नेल्याची धक्कादायक घटना देहू येथे घडली आहे. या घटनेने परिसरातील शेतकरी चिंतातूर असून आता चोरट्यांची नजर शेतमालावर असल्याचे दिसून येत आहे. हवामान खात्याने राज्याच्या विविध जिल्ह्यात मुसळधार पावसाचा व गारपिटीचा इशारा दिला आहे. त्यामुळे शेतकरी आपल्या शेतात काढणीस आलेल्या पिकाची काळजी घेत पीक तातडीने काढत आहे. देहू, विठ्ठलवाडी, बोडकेवाडी, काळोखे मळा, हगवणे मळा, येलवाडी, सांगुडी, कान्हेवाडी परिसरातील शेतकरी शेतातील गहू, बाजरी, ज्वारी, कांदे आदी पिकांची काळजी घेत काढणीस आलेले पिके तत्परतेने काढत आहे. परंतु शेतात काढलेले पीक लंपास करणाऱ्या चोरांचा सुळसुळाट झाल्याने शेतकरी हैराण आहे.

## निगडीतील जलतरण तलाव खुला


**निगडी :** महापालिकेच्या वतीने निगडी येथे छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव उभारण्यात आला आहे. हा तलाव कोविडमध्ये बंद करण्यात आला होता. तलाव सुरू करण्यासाठी स्थानिक नागरिक व खेळाडूंनी मागणी केली होती. त्यानुसार हा तरण तलाव सुरू करण्यात आला आहे. मात्र, तो महापालिका नव्हे तर ठेकेदार चालवणार आहे. त्यासाठी तीन वर्षांचा करार करण्यात आला असून त्याला महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव निगडी, आकुर्डी, प्राधिकरण, रावेत आणि बिजलीनगर येथील रहिवाशांसाठी महत्वाचा आहे. कोविड-१९ साथीच्या आजारामुळे २०२० मध्ये सुरुवातीला हा तलाव बंद करण्यात आला. स्वीमिंग पूल बंद असल्याने स्थानिकांनी आंदोलन केले होते. त्यांनी भाटेपोटी दिलेला दर तुलनात्मक दृष्ट्या अधिक असल्याने त्यांची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना तीन वर्ष जलतरण तलाव चालवण्याचे काम देण्यात आले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात नागरिकांसाठी निगडीतील जलतरण तलाव खुला झाला आहे.

## मराठी हवीच



## मराठी भाषेचा वापर हवाच; बँकांना मनसेचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चिंचवड :** काही ठिकाणी मराठी भाषेला जाणूनबुजून ठरवून नाकारण्याचे काम काही नाठाळ करताना आढळून येत आहेत. असे प्रकार या पुढे खपवून घेतले जाणार नाही, याची नोंद घेत अभिजात मराठी भाषेच्या वापरा संदर्भात योग्य त्या सूचना सर्व अधिकारी, कर्मचारी वर्गाला द्याव्यात. अन्यथा मनसे स्टाईल भेट दिली जाईल असा इशारा पिंपरी चिंचवड शहरातील बँकांना देण्यात आला.

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व प्रमुख बँकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शहराध्यक्ष सचिन चिखले यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. पिंपरी चिंचवड मधील आय.सी.आय.सी.आय. बँक (पिंपरी शाखा), बँक ऑफ इंडिया, (पिंपरी शाखा), डी.बी.एस.बँक (चिंचवड शाखा), आय.डी.एफ.सी.फर्स्ट बँक (पिंपरी शाखा), आर.बी.एल.बँक (पिंपरी शाखा), बँक ऑफ बडोदा (पिंपरी चिंचवड शाखा), एच डी.एफ. सी. बँक (पिंपरी शाखा) या बँकांना निवेदन देण्यात आले.

# 'इको टुरिझम पार्क'ला वन मंत्र्यांचा 'बुस्टर'

## भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरवा



> स्मार्ट सिटी म्हणून विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील समाविष्ट गाव डुडूळगावमध्ये पर्यटन व स्थानिक नागरिकांना सुविधा अशा संकल्पनेतून दुर्गा टेकडी, निगडीच्या धर्तीवर "इको टुरिझम पार्क" विकसित करता येईल, अशी भौगोलिक रचना आहे. या पार्कसाठी महानगरपालिका प्रशासनाने सल्लागार नियुक्त करावा. सदर कामासाठी वन विभागाने विविध योजनांमधून निधी उपलब्ध करुन कामाचे आदेश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले आहेत. तसेच, वन विभागाच्या हद्दीतील रस्त्यांचा प्रश्नही मार्गी लाणार आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार

### वन मंत्री गणेश नाईक यांचा सकारात्मक प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवडमधील मौजे डुडूळगाव येथे प्रस्तावित "इको टुरिझम पार्क"साठी आवश्यक त्याची निधीची उपलब्धता करुन देण्यात येईल. तसेच, महानगरपालिका आणि वन विभाग यांच्या माध्यमातून पर्यटन क्षेत्राला चालना देणारा हा प्रकल्प विकसित करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले आहे.

वन विभागाशी संबंधित विविध मुद्यांवर बैठक नियोजित करावी, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्यानुसार, मंत्रालय येथे वनमंत्र्यांच्या दालनामध्ये बैठक घेण्यात आली. यावेळी वडगावशेरीचे आमदार बापुसाहेब पठारे, संबंधित विभागाचे उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पिंपरी-चिंचवड टिंबर मर्चट्स अँड मॅन्युफैक्चरर्स असोसिएशनच्या राज्यस्तरीय बैठकीत दि.21 ऑगस्ट 2023 रोजी झालेल्या निर्णयाप्रमाणे लाकूड उपलब्धता अहवाल प्राप्त करुन असोसिएशनच्या सभासदनांना आरा गिरण्यांना परवानगी मिळावी, अशी मागणी करण्यात आली. त्यावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी सूचना वनमंत्र्यांनी दिली.

तसेच, मौजे डुडुळगाव येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगर येथे शेकडो वर्षांपासून स्थानिक नागरिकांचे वास्तव्य आहे. सदर जागा वन विभागाच्या हद्दीत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पायाभूत सोयी-सुविधा देता येत नाहीत. सबब, आण्णाभाऊ साठे नगरमध्ये पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याची परवानगी वन विभागाने महानगरपालिका प्रशासनाला द्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली. यावर महानगरपालिका प्रशासनाने पाठवलेल्या प्रस्तावानुसार, वन विभागाच्या हद्दीत वर्षानुवर्षे वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या पायाभूत सोयी-सुविधा देण्यास ना हरकत दाखला द्यावा, असेही निर्देश वनमंत्री नाईक यांनी दिले आहेत.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, मौजे डुडूळगावमधील अण्णाभाऊ साठेनगर ग्रामपंचायतपासून वनविभागाच्या जागेत आहे. या भागातील नागरीकरांना स्वत:च्या घराची नोंदणी करता येत नाही. तसेच, या भागात पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करता येत नाही. वन विभागाची हद्द लागून असल्यामुळे येथील 18 मीटर रोडच्या बाजुला परिसराचा विकास करता येत नाही. आता वनमंत्र्या दिलेल्या आश्वासनामुळे या रस्त्याच्या विकासाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

# चिखलीतील रस्ते, आरक्षणे ताब्यात घेणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** मंजूर विकास आराखड्यानुसार चिखलीतील रस्ते व आरक्षणे ताब्यात घेण्याची कार्यवाही महापालिकेने सुरू केली आहे. त्यासाठी जमीन व जागा मालकांचे शिबिर मंगळवार (ता. ८) आणि बुधवारी (ता. ९) महापालिकेच्या चिखली गावठाणातील मुले व मुलींच्या शाळेत आयोजित केले आहे. दोन्ही दिवस सकाळी दहा ते सायंकाळी साडेपाच अशी शिबिराची वेळ आहे, अशी माहिती नगररचना उपसंचालक प्रसाद गायकवाड यांनी दिली.

चिखलीची लोकसंख्या वाढत आहे. त्यासाठी परिसराचा विकास गतिमान करण्यासाठी मंजूर विकास योजनेची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यामध्ये रस्ते आणि आरक्षणाचा ताबा घेण्यासाठी भूसंपादन करावे लागणार आहे. त्यासाठी मोठी नुकसान भरपाई द्यावी लागणार आहे. मात्र, सदर रस्ते आणि आरक्षणांनी बाधित क्षेत्र हस्तांतरण विकास हक्क (टीडीआर अर्थात ट्रान्स्फरेबल डेव्हलपमेंट राइटस्) किंवा चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय अर्थात फ्लोअर स्पेस इंडेक्स) यांच्या माध्यमातून ताब्यात घेतल्यास महापालिकेची आर्थिक बचत होणार आहे. तसेच भूसंपादन कायद्यान्वये आरक्षित रस्ता किंवा आरक्षणाचे क्षेत्र ताब्यात आल्यास जमीन मालकांना टीडीआर किंवा एफएसआयचा पर्याय उपलब्ध नसेल. त्यामुळे रस्ते व आरक्षणाने बाधित क्षेत्र आगाऊ ताब्यात घेण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

जमीन वा जागा मालकांच्या प्रबोधनासाठी जागेवर नकाशा दाखवून त्यांचे क्षेत्र रस्त्याने बाधित होत असल्याचे निदर्शनास आणून दिले जाणार आहे. रस्त्याने बाधित जागांचा आगाऊ ताबा शिबिरातच घेण्यात येईल. भविष्यात जमीन मालकांनी टीडीआर किंवा एफएसआयसाठी आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यांना बाधित क्षेत्राचा टीडीआर किंवा एफएसआय एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली देण्यात येणार आहे.

> मंगळवार आणि बुधवार या शिबिरांच्या दिवशी जमीन मालकांनी जागेची मालकी सिद्ध करण्यासाठी सात/बारा उतारा, मोजणी नकाशा (असल्यास) सोबत आणावा. तसेच, प्रपत्र शुल्क शंभर रुपये जमा केल्यानंतर जागेवरच अ व ब प्रपत्र त्वरित देण्यात येणार आहे. त्यामुळे जमीन मालकांनी सदर दिवशी कागदपत्रांसह उपस्थित राहून जागेचा आगाऊ ताबा देऊन महापालिकेस सहकार्य करावे.
>
> - **प्रसाद गायकवाड,** नगररचना उपसंचालक, महापालिका

# टू व्हीलर बाईक टॅक्सीला तीव्र विरोध करू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महाराष्ट्र सरकारने पुणे, पिंपरी चिंचवड मुंबईसह महाराष्ट्रातील एक लाख लोकसंख्यापेक्षा अधिक असलेल्या शहरांमध्ये, टू व्हीलर टॅक्सी सुरू करण्यास मान्यता दिली आहे. यामुळे आधीच आर्थिक अडचणीमध्ये असलेले रिक्षा व टॅक्सी चालक यांच्या व्यवसायावर परिणाम होणार आहे. त्यांचे जगणे मुश्किल होईल. यामुळे सरकारने हा निर्णय मागे घ्यावा. रिक्षा चालक मालकांचे इतरही प्रश्न सोडवावेत, अशी मागणी रिक्षा चालक मालकांच्या वतीने करण्यात आली.

महाराष्ट्र रिक्षा पंचायत, "ऑटो टॅक्सी चालक-मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र राज्य, ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशनच्या (दिल्ली) वतीने कष्टकऱ्यांचे नेते बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आरटीओच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. या वेळी मागणी करण्यात आली. पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेश आव्हाड यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र रिक्षा पंचायत पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष संतोष गुंड ,जिल्हाध्यक्ष लक्ष्मण शेलार, युवक अध्यक्ष शुभम तांदळे, विशाल ससाने, विनायक ढोबळे, अविनाश जोगदंड, विजय जावळे, संदिप कुडुंज, सोपान पवळे, रोहिदास पिंगळे, आदी यावेळी उपस्थित होते.



# लक्ष्मी चौक ते स्वराज रेसिडेन्सी रस्त्याला 'गती'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मोशी :** पिंपरी-चिंचवड महापालिका विकास आराखड्यातील प्रस्तावित रस्ते ताब्यात घेवून त्याचा विकास करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. मोशी येथील लक्ष्मी चौक ते स्वराज रेसिडेन्सी रस्त्याच्या कामाला गती देण्यात आली आहे. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी शुक्रवारी महापालिका प्रशासनाचे अधिकारी आणि सहकाऱ्यांसोबत मोशी येथे विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निखील बोऱ्हाडे, निलेश बोराटे आणि ग्रामस्थ व सोसायटीधारक उपस्थित होते.



मोशी येथे लक्ष्मी चौक ते स्वराज रेसिडेन्सी येथील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित रस्त्याचे काम अखेर मार्गी लागले. महानगरपालिका विकास आराखड्यातील या 24 मीटर रस्त्यावर अतिक्रमण होते. सदर अतिक्रमण आणि शिवरस्त्यावरील बेकादेशीर अतिक्रमणही हटवण्यात आले. त्यामुळे जागा ताब्यात घेऊन रस्त्याचे काम सुरू करण्यात येत आहे, तशा सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. यामुळे या भागातील स्थानिक नागरिक, वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे.

**असा आहे रस्त्याचा फायदा**

- पुणे-नाशिक रोडची परिसराची अंतर्गत 'कनेक्टीव्हीटी',
- भारतमाता चौक ते चिखली गावठाण रस्त्याला पर्यायी रस्ता,
- रिव्हर सोसायटी, ऐश्वर्यम हमारा, स्वराज, प्रिस्टीन ग्रीन, क्रिस्टल सिटी आदी 30 सोसाट्यांना रस्ता उपलब्ध,
- सुमारे 10 हजार सदनिकाधारकांसाठी सुविधा,
- लक्ष्मी चौकाला जोडणाऱ्या रस्त्यावर वाहतूक कोंडी कमी होणार आहे.



> समाविष्ट गावांच्या विकासाच्या मुद्दावर गेल्या 10 वर्षापासून मतदार संघात काम करीत आहे. महापालिका सत्ता काळात समाविष्ट गावांतील पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यात आल्या. त्यामुळे "चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर" तयार झाला. आगामी काळात उपनगरे आणि शहर यांची 'कनेक्टिव्हीटी' वाढवण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत.
>
> — **महेश लांडगे,** आमदार

संपादकीय विशेष

# देशभक्ती रूजवणारा कलाकार

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्वात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी रोजी झाला. मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी स्वामी असे होते. मनोज कुमार यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. दिलीप कुमार हे त्यांचे आवडते अभिनेते. त्यांच्यावर दिलीप कुमार यांचाच प्रभाव होता. त्यांनी मनोज कुमार हे नाव धारण करण्यामागेही दिलीप कुमार हेच होते.



शबनम या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेल्या पात्राचे नाव मनोज कुमार असे होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेले मनोज कुमार हे पात्र त्यांना इतके भावले की त्यांनी स्वतःचे नाव मनोज कुमार असेच ठेवले. १९५७ साली शहीद या चित्रपटाद्वारे मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटात त्यांनी साकारलेली भगतसिंग यांची भूमिका प्रेक्षकांना खूप भावली. देशभक्तीवर आधारित हा चित्रपट यशस्वी झाल्याने त्यांनी पुढे अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली. मनोज कुमार यांनी उपकार या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले. लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला जय जवान किसान... हा नारा त्यांनी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट खूप गाजला या चित्रपटातील गाणी लोकप्रिय झाली. मेरे देश की धरती.... हे अजरामर गीत याच चित्रपटातले. उपकार नंतर त्यांनी पुरब और पश्चिम, हरियाली और रास्ता, रोटी कपडा और मकान, क्रांती, हिमालय की गोद मे हे देशभक्तीपर चित्रपट काढले हे सर्व चित्रपट खूप गाजले. या चित्रपटाद्वारे त्यांनी प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला.

मनोज कुमार यांनी आणि अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली म्हणून त्यांना भारत कुमार हे टोपण नाव पडले. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले देशभक्तीवरील चित्रपट त्याकाळी खूप गाजले होते. मेरे देश की धरती, सरफरोशी की तमन्ना, एक प्यार का नगमा है, पाणी रे पाणी तेरा रंग कैसा अशी अनेक अजरामर गाणी मनोज कुमार यांच्यावर चित्रित झाली आहेत. आजही स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी त्यांच्या देशभक्तीवरील चित्रपटातील गाणी आवर्जून वाजवली जातात. शोर, पत्थर के सनम, दो बदन, मेरा नाम जोकर हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील खूप लोकप्रिय ठरले. मनोज कुमार यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. उपकार या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. २००५ साली त्यांना चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. १९९२ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले.

मनोज कुमार यांनी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारा पडद्यावरील भारत कुमार काळाच्या पडद्याआड गेला असे म्हणावे लागेल. मनोज कुमार यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली आहे. ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# उत्पादनाला आधार, टेस्ला-टाटांचा सहकार

**उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्राचे १४ हजार कोटी रुपयांचा बूस्टर डोस कामी येत असल्याचे अलिकडेच दिसून आले. याच सुमारास रेल्वे इंजिन उत्पादनात भारताने अमेरिका, युरोपच्या एकूण उत्पादनावरही मात केल्याचे पहायला मिळाले. या दोन सुवार्तांखेरीज कांदा निर्यात शुल्क रद्द करण्यामागील परिस्थिती सरत्या आठवड्यामध्ये समोर आली. याखेरीज 'टेस्ला'सोबत टाटांच्या भागीदारीचे वृत्तही चर्चेत राहिले. आणखी एक वृत्त म्हणजे 'टेस्ला'सोबत टाटांची भागीदारी होत असल्याचे समोर आले.**

आर्थिक रा
महेश देशपांडे
आर्थिक घडामोडींचे जाणकार

केंद्र सरकारने उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आखलेल्या योजनेंतर्गत (पीएलआय) २०२१ पासून १४ हजार कोटींहून अधिक निधी जारी केला आहे. 'पीएलआय' योजनेला सरकार भरपूर चालना देत आहे, देशातील १० मोठ्या क्षेत्रांसाठी आतापर्यंत १४ हजार २० कोटी रुपये देण्यात आले आहेत.सरकारने देशातील उत्पादन क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या 'पीएलआय'योजनेअंतर्गत १४ हजार वीस कोटी रुपयांची मदत केली आहे. यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स, मॅन्युफॅक्चरिंग, आयटी हार्डवेअर, फार्मास्युटिकल्स, टेलिकॉम, फूड प्रोसेसिंग, ऑटोमोबाईल आदी दहा मोठ्या क्षेत्रांचा समावेश आहे. ही रक्कम प्रोत्साहन अनुदान रुपात होती. ही योजना देशाच्या उत्पादन क्षमता आणि निर्यातीला चालना देण्यासाठी २०२१ मध्ये सुरू करण्यात आली. त्यात १४ क्षेत्रांचा समावेश करण्यात आला होता. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे, की 'पीएलआय' योजनेचा देशातील विविध क्षेत्रांवर लक्षणीय परिणाम झाला आहे. या योजनेद्वारे स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे उत्पादन वाढेल, अधिक लोकांना रोजगार मिळेल आणि निर्यातीला चालना मिळेल.

या योजनेमुळे देशांतर्गत तसेच परदेशातूनही गुंतवणूक आकर्षित झाली आहे. योजनेंतर्गत स्वदेशी वस्तूंच्या उत्पादनात आणि निर्यातीत चांगली कामगिरी दाखवणाऱ्या कंपन्यांना सरकारकडून प्रोत्साहन दिले जाते. 'पीएलआय' योजनेंतर्गत १४ क्षेत्रांसाठी ७४६ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. त्यात बल्क औषधे, वैद्यकीय उपकरणे, फार्मा, दूरसंचार, व्हाईट गुड्स, अन्न प्रक्रिया, कापड आणि ड्रोन यांसारख्या क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश आहे. 'पीएलआय'लाभार्थ्यांपैकी १७६ लघु आणि मध्यम उद्योगक्षेत्रातील आहेत. नोव्हेंबर २०२४ पर्यंत सुमारे १.६१ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. यामुळे सुमारे १४ लाख कोटी रुपयांची (सुमारे १६२.८ अब्ज डॉलर) विक्री झाली आहे. २०२४-२५ पर्यंत १५.५२ लाख कोटी रुपयांच्या विक्रीचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. या योजनेमुळे ११.५ लाखांहून अधिक लोकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे रोजगार मिळाला आहे. 'पीएलआय' योजनेंतर्गत, कंपन्यांनी विशेष स्टीलमध्ये सुमारे 20 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केल्यास गुंतवणुकीचे लक्ष्य २७ हजार १०६ कोटी रुपये होते. यामुळे नऊ हजार लोकांना थेट रोजगारही उपलब्ध झाला.

दरम्यान, भारतीय रेल्वेने या वर्षी लोकोमोटिव्ह उत्पादनात नवा विक्रम केला आहे. या वर्षी भारतात १४०० लोकोमोटिव्हचे उत्पादन झाले. ते अमेरिका आणि युरोपच्या एकत्रित उत्पादनापेक्षा जास्त आहे. देशाचे लोकोमोटिव्ह उत्पादन १४०० वर पोहोचले आहे. युरोप आणि अमेरिकेच्या एकूण उत्पादनाची सांगड घातली, तरी देशाचे लोकोमोटिव्ह उत्पादन त्यांच्यापेक्षा खूप पुढे आहे. रेल्वे यंत्रणेमध्ये या आर्थिक वर्षात दोन लाख नवीन वॅगन्सची भर पडली. ही नवी इंजिने सध्या चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स (सीएलडबल्यू), बनारस लोकोमोटिव्ह वर्क्स (बीएलडबल्यू), पटियाला लोकोमोटिव्ह वर्क्स (पीएलडबल्यू) सारख्या उत्पादन युनिटमध्ये तयार केली जात आहेत. या वर्षी भारतीय रेल्वेमध्ये सुमारे दोन लाख नवीन वॅगन्स समाविष्ट करण्यात आल्या.

गेल्या दहा वर्षांमध्ये रेल्वेने सुमारे ४१ हजार 'लिंक-हॉफमन-बुश' (एलएचबी) डबे तयार केले आहेत.

पूर्वी वर्षाला फक्त ४००-५०० एलएचबी डबे तयार केले जात होते आणि आता पाच-साडेपाच हजार डबे तयार केले जातात. सर्व 'आयसीएफ' कोचचे 'एलएचबी' कोचमध्ये रूपांतर केले जाणार आहे. रेल्वे सुरक्षेतील गुंतवणूक १.१६ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. ती पूर्वीपेक्षा किती तरी पटींनी अधिक आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग, धुके सुरक्षा उपकरणे आणि 'कवच' प्रणाली वेगाने लागू केली जात आहे. ट्रॅकच्या देखभालीवर अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी, नवीन प्रकारचे वाहन विकसित केले गेले आहे. हे रेल-कम-रोड व्हेईकल देखभालीचे काम सोपे करते. पन्नास हजार किलोमीटरचे प्राथमिक रेल्वे नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. २०१३-१४ मध्ये दर वर्षी सुमारे ३,७०० वेल्डिंग बिघाड





होत असत, तर हे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक घटून २५० वर आले आहे.

आता चर्चा कांद्याच्या निर्यातीची. दर घसरल्यानंतर शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय आता लागू होत आहे. सध्या सरकार कांद्याच्या निर्यातीवर २० टक्के निर्यात कर वसूल करते. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाने जारी केलेल्या अधिसूचनेमध्ये म्हटले आहे की सरकारने कांद्यावरील निर्यात शुल्क शून्य करण्याचा निर्णय घेतला आहे. एक एप्रिलपासून ही अधिसूचना लागू होईल. देशातील कांद्याच्या किमतीत प्रचंड वाढ झाल्यामुळे केंद्र सरकारने डिसेंबर २०२३ मध्ये निर्यातीवर बंदी घातली होती. यानंतर, मे २०२४ मध्ये किमान निर्यात किंमत मर्यादा ५५० रुपये प्रति टन आणि चाळीस टक्के निर्यात शुल्कासह परदेशात कांदा विकण्याची परवानगी देण्यात आली. सप्टेंबर २०२४ मध्ये किमान निर्यात किंमत रद्द करण्यात आली आणि निर्यात शुल्कदेखील वीस टक्के करण्यात आले. ते आता पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

निर्यातबंदी असूनही २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण १७.१७ लाख टन कांद्याची निर्यात झाली असून २०२४-२५ या आर्थिक वर्षात ११.६५ लाख टन कांद्याची निर्यात झाली आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, सप्टेंबर 2024 मध्ये मासिक कांदा निर्यातीचे प्रमाण ७२ हजार टनांवरून जानेवारी २०२५ मध्ये १.८५ लाख टन झाले आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाने म्हटले आहे की हा निर्णय शेतकऱ्यांना फायदेशीर दर सुनिश्चित करण्यासाठी आणि ग्राहकांसाठी कांद्याच्या किंमती नियंत्रणात ठेवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. रब्बी पिकांची आवक चांगली होण्याच्या अपेक्षेने घाऊक आणि किरकोळ भावात घसरण झाली आहे. सध्याच्या किमती मागील वर्षांच्या संबंधित कालावधीच्या पातळीपेक्षा जास्त असल्या, तरी अखिल भारतीय भारीत सरासरी मॉडेलच्या किमती ३९ टक्क्यांनी घसरल्या आहेत. त्याचप्रमाणे, गेल्या एका महिन्यात अखिल भारतीय सरासरी किरकोळ किमती दहा टक्क्यांनी घसरल्या आहेत. कृषी मंत्रालयाचा अंदाज आहे की या वर्षी रब्बी कांद्याचे उत्पादन २२७ लाख टन होईल, जे गेल्या वर्षीच्या १९२ लाख टनापेक्षा १८ टक्के अधिक आहे. भारताच्या एकूण उत्पादनात ७०-७५ टक्के वाटा असलेला रब्बी कांदा ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये खरीप पिकाची आवक सुरू होईपर्यंत बाजारातील स्थिरतेसाठी महत्त्वाचा आहे.

आता नजर उद्योगक्षेत्रातील एका महत्वाच्या घडामोडीवर टाटा ऑटोकॉम्प, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टाटा टेक्नॉलॉजीज आणि टाटा इलेक्ट्रॉनिक्स गोपनीय पद्धतीने एलन मस्क यांच्या 'टेस्ला' कंपनीचे जागतिक पुरवठादार बनले आहेत. मीडिया रिपोर्टसनुसार, टाटा ग्रुपने अमेरिकन इलेक्ट्रिक व्हेइकल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी 'टेस्ला'सोबत सुट्या भागांचा जागतिक पुरवठादार म्हणून भागीदारी केली आहे.

एकीकडे, 'टेस्ला' भारतीय बाजारपेठेत प्रवेश करण्याच्या तयारीत आहे, तर दुसरीकडे, टाटा स्वतःला कंपनीसाठी स्थानिक पुरवठादार म्हणून तयार करत आहे. कास्टींग, फोर्जिंग, इलेक्ट्रॉनिक्स आणि फॅब्रिकेशनच्या विकास आणि उत्पादनावर चर्चा करण्यासाठी 'टेस्ला'च्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्थानिक पुरवठादारांची भेट घेतली. 'टेस्ला' भारतात पुरवठादारांचे पाठबळ उभे करण्याच्या तयारीत आहे. 'टेस्ला'चे उत्पादन युनिट भारतात सुरू झाले की भारतीय पुरवठादारांना सोर्सिंगच्या संधीचा फायदा होईल. टाटा टेक्नॉलॉजी आउटसोर्स उत्पादन अभियांत्रिकी सेवा तसेच डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन सेवा आणि विविध उत्पादनांसाठी 'अपस्किलिंग सोल्यूशन्स' प्रदान करते.




## राशीभविष्य

- **मेष** : मन अस्थिर राहील. कामाचा बोजा वाढेल. शारीरिक श्रम जास्त होतील.
- **वृषभ** : शासकीय कामे मार्गी लागतील. प्रतिष्ठित व्यक्तीच्या ओळखीचा फायदा होईल.
- **मिथुन** : मनाविरुद्ध वागावे लागेल. काही काळ चिडचिड वाढेल. संततीचे सुख मिळेल.
- **कर्क** : जुन्या आठवणीत रमून जाल. गुंतवणुकीत वाढ कराल. प्रकृतीकडे लक्ष द्यावे लागेल.
- **सिंह** : कामात दगदग होईल. मन भावनिक होईल. संततीबद्दल शुभवार्ता समजतील.
- **कन्या** : लिखाणाद्वारे प्रसिद्धी मिळेल. तुमच्या शब्दास मान मिळेल. आप्तेष्टांच्या भेटी होतील.
- **तूळ** : आपली मते इतरांवर लादू नका. व्यवहारात फसण्याची शक्यता. नकारात्मक विचार सोडा.
- **वृश्चिक** : काहींना परदेशगमनाचे योग. फायदेशीर व्यवहार होतील. दक्ष राहून सही करा.
- **धनु** : घरात कुरबुरी वाढतील. मानसिक थकवा निर्माण होईल. संतती सुख देईल.
- **मकर** : संवादामुळे लोकांची मने जिंकाल. लोकप्रियतेत वाढ होईल. संततीशी, ज्येष्ठांशी मतभेद होतील.
- **कुंभ** : जबाबदारीच्या कामाने डोकेदुखी वाढेल. उत्साहाचा अभाव जाणवेल. मन शांत ठेवा.
- **मीन** : घरगुती कार्यक्रमाचे व्यवस्थापन उत्तम कराल. अपेक्षा पूर्ण होतील. अहंकार जागृत होईल.

## ५ एप्रिल

दिनविशेष

- २०१३ : राही सरनोबत विश्वकरंडक नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक विजेती.
- २०१५ : 'लार्ज हॅड्रॉन कोलायडर' पुन्हा सुरू.
- २०१६ : पठाणकोटवरील हल्ला भारतानेच घडवल्याचा पाकिस्तानचा कांगावा.
- २०१७ : उत्तर कोरियाची मध्यम पल्ल्याच्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी.
- २०१८ : बांग्लादेशातील 'अन्सारउल बांगला टीम' या दहशतवादी संघटनेत सक्रिय असणाऱ्या पाच बांगलादेशी नागरिकांच्या पोलीस कोठडीत वाढ.

आरोग्यमंत्र

## भाजून खा लसूण

बहुगुणी लसूण अनेक व्याधींवर औषधासमान काम करत असल्यामुळेच स्वयंपाक करताना भाजी किंवा डाळीला तडका देण्यासाठी गृहिणी लसणाचा वापर करतात. लसूण खाण्यानं हृदय मजबूत होतं. यातील अनेक औषधी गुणधर्मांमुळे आरोग्य चांगलं राहण्यास मदत होते. त्यामुळेच आज लसणाच्या सेवनाचे काही लाभ जाणून घेऊ या.



* लसणामध्ये टेस्टोस्टेरॉन हार्मोन वाढवण्याचा गुण असतो. हे हार्मोन्स पुरूषांचं सेक्स लाईफ सुधारतात. लसणाच्या नियमित सेवनानं सेक्स पावर वाढते. * लसणात ओमेगा ३ फॅटी ॲसिड आढळतं. यामुळे लसणाच्या सेवनामुळे हृदय मजबूत होतं. हृदयविकाराची शक्यता कमी होते. * लसूण खाल्ल्यानं सर्दी, खोकला आणि ताप दूर होतो. लसणात अँटीबायोटीक, अँटीव्हायरल आणि अँटीफंगल गुणधर्म असतात. त्याच्या प्रभावामुळे वायरल आजार दूर राहतात. यासाठी लसूण थोडा भाजून खाणं * फिटनेस चांगला ठेवायचा असेल तर रोज सकाळी रिकाम्यापोटी एक लसूण पाकळी चावून खावी आणि त्यानंतर एक छोटा ग्लास कोमट पाणी प्यावं. काही दिवसात तुम्हाला चांगला फरक दिसून येईल. यामुळे दिवसभर तणावग्रस्त आणि उत्साह रहाणं शक्य होतं तसंच फिटनेससुद्धा राखता येतो. * पचनक्रिया वाढवण्यासाठी, सुरळीत करण्यासाठी लसूण रामबाण औषध आहे कारण लसणात भरपूर फायबर असतं. म्हणूनच लसणाच्या सेवनामुळे पचनशक्ती वाढते. हे सगळे लाभ लक्षात घेता लसूण नित्य सेवनात ठेवावा.

महत्वाचे काही

## माणूस का उडू शकत नाही?

पक्ष्यांप्रमाणे आपल्यालाही उडता आलं तर किती बरं होईल असं आपल्याला नेहमी वाटतं. पण पक्ष्यांच्या हाडांचा सांगाडा हलका असतो. त्यांची हाडंही हलकी असतात. त्याखेरीज शरीरात हवेच्या पिशव्या असल्याने ते अधिक हलके बनतात. त्यांच्या शरीराच्या वजनाच्या तुलनेत स्नायू चांगलेच शक्तीमान असतात. विशिष्ट शरीररचनेमुळे ते चापल्याने उडू शकतात. स्नायूंच्या सहाय्याने ते पंखांनी सहज उडू शकतात. पक्षी पंख फडफडवतो तेव्हा पंखांनी हवा खाली ढकलतो आणि वर जातो. माणसाचं शरीर पक्ष्यांच्या तुलनेत जड असतं. त्यामुळे माणसाला मोठ्या पंखांची गरज लागेल. माणसाचे स्नायूही तुलनेने शक्तीमान नसतात. त्यामुळे आपण कृत्रिम पंखही फडफडवू शकत नाही. हलके शरीर असलेले पक्षी सहज उडू शकतात. उलट जड पक्ष्यांना उडताना अडचणींना तोंड द्यावं लागतं. कोंबडा आणि मोर यासारखे पक्षी उंच उडू शकत नाहीत. शहामृग आणि पेंग्विन यासारखे पक्षी तर अधिक जड आहेत. त्यांना उडताच येत नाही. ते फक्त धावू शकतात. त्यामुळे हातांना कृत्रिम पंख जोडले तरी आपण उडू शकणार नाही.

सल्ला मोलाचा

## कधी, कसं बोलू नये

नातेसंबंधात तणाव येण्याला वादावादीचे प्रसंग, संघर्षाच्या वेळी बोललं गेलेलं एखादं वाक्य किंवा शब्द कारणीभूत झालेले असतात. अगदी पती-पत्नीच्या नात्यातही हीच गोष्ट दिसून येते. बोलताना नकळत जोडीदाराच्या वर्मावर बोट ठेवलं गेलं तर तो दुखावला जातो, अबोल बनतो किंवा आक्रस्ताळेपणा करून राग व्यक्त करतो. यामागचं नेमकं कारण न लक्षात आल्यानं मग घरातील ताण वाढत जातो. म्हणून शब्दांचा नेमका आणि विचारपूर्वक, किमान वापर अनेकदा नाती टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त असतो. मग ती नाती कौटुंबिक असोत, व्यावसायिक असोत वा सामाजिक. अचानक उद्भवणाऱ्या प्रसंगी तोल सुटणंही स्वाभाविक असतं. परंतु मग जाणीवपूर्वक नाती सांधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे सासू सुनेच्या वादात इगो मध्ये न आणता सून सासूकडे जाऊन काहीही झालं तरी तुमचा अनुभव निव्वळ पुस्तकी ज्ञानापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे, असं बोलली, तर वाद न राहता नात्यातली दरी सांधली जाऊ शकते. पती पत्नीच्या वादातही कोणाचं योग्य आहे यापेक्षा काय योग्य आहे याचा विचार झाला तर वाद विकोपाला जाणार नाहीत.

पंचांग

**शनिवार, ५ एप्रिल २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु. ८, नक्षत्र : पुनर्वसु
चंद्रराशी : मिथुन, योग : अतिगंड
सूर्योदय: ६.३१, सूर्यास्त: ६.५१

फॉरवर्डस

**कधी कधी दूर राहिल्यानं गैरसमज वाढतात...**

करीब आओगे तो शायद हमें समझ लोगे,
ये फासले तो ग़लतफ़हमियां बढ़ाते है।

वाचा तर खरं

वयाच्या विविध टप्प्यांवर ग्राहकाला भरावे लागणारे विम्याचे हप्ते ठरवताना धोक्याचा कालावधी आणि मूल्य लक्षात घेतलं जातं. धोक्याचे दर, पैशाची आवक आणि व्यक्तीची आजची आणि पुढची आर्थिक उलाढाल लक्षात घेऊन ॲक्च्युअरी विम्याचे हप्ते ठरवतो. विमा क्षेत्रातली माहिती त्याला सतत असावी लागते. या क्षेत्राची उत्तम जाण असणं गरजेचं असतं. संघटना, कर्मचाऱ्यांना किती रक्कम द्यायची हे ठरवण्याचं कामही त्याचंच असतं. त्यामुळे वेगळं करण्याची इच्छा असणाऱ्यांना या क्षेत्रात नक्कीच वाव आहे. काही संस्थांमधून या विषयाचं प्रशिक्षण घेता येईल.

करिअरवाटा

## एमसीएमच्या प्रवेशासाठी...

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या वाढीचा वेग कोणापासूनही लपून राहिलेला नाही. या क्षेत्रात पगारही भरभक्कम असल्यामुळे इथे नोकरी मिळवण्याची जिद्द तरुणाईमध्ये पहायला मिळते.




सध्या जगातल्या अनेक मान्यवर आय.टी. संस्था या क्षेत्रातल्या तज्ज्ञांच्या आणि प्रशिक्षित तरुणांच्या शोधात आहेत. येत्या पाच वर्षांमध्ये जगभरात आय.टी. तंत्रज्ञांच्या काही कोटी जागा निर्माण होण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेता तुम्हालाही इथे काम करण्याची इच्छा असेल आणि वरिष्ठ पदावरची एखादी छान नोकरी पाहिजे असेल तर काही पदव्या घेणं आवश्यक ठरतं. अशा पदव्यांमध्ये एमसीएम ही सर्वाधिक महत्त्वाची पदवी समजली जाते. बीसीएम नंतर दोन वर्षांचा हा पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करून अनेक बुद्धिमान तरुणांनी आय.टी. क्षेत्रात आपलं नशीब काढलं आहे. त्यातल्या काही तंत्रज्ञांनी एम.सी.एम.नंतर डॉक्टरेटसुद्धा केली आहे. आय.बी.एम., टी.सी.एस., इन्फोसिस, विप्रो, झेन्सार अशा अनेक मान्यवर संस्थांमध्ये एम.सी.एम. करणारे तंत्रज्ञ वरच्या पदावर असून लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या करत आहेत. तेव्हा तुम्हीही ही संधी सोडू नका.

खेचाखेची

## काय बोलणार?

मी आमच्या सोसायटीतल्या वॉचमेनला म्हणालो...
.
काय रे, तू दारू पितोस ड्यूटीवर?
.
.
**वॉचमन:** त्याचं काय आहे ना साहेब...
सिक्युरिटी नेहमी टाईट असली पाहीजे म्हणून...!
.
काय बोलणार सांगा ,,,,

वेगळं काही

झारखंडच्या मनोहर नायकने आपल्या पत्नीला शोधण्यासाठी २४ दिवसांमध्ये ६०० किलोमीटर अंतर सायकलवरून कापलं. मनोहर ओरिसामध्ये मजुरी करतो. मकरसंक्रांतीच्या दिवशी त्याची पत्नी माहेरी जाण्यासाठी निघाली. पण माहेरी पोहोचलीच नाही आणि परतही आली नाही. त्याने पोलिसात तक्रार केली. त्याचवेळी तो सायकल घेऊन पत्नी अनिताच्या शोधार्थ निघाला. अनिताचा फोटो दाखवून लोकांना तो तिची माहिती विचारत फिरत होता. त्याने वृत्तपत्रांमध्येही तिचा फोटो छापून आणला. पुढे अनिता खरगपूरला असल्याचं कळलं. त्याची पत्नी मानसिक रूग्ण आहे. त्यामुळे ती हरवली होती. पण मनोहरचं तिच्यावर खूप प्रेम आहे. अनिताला घेऊन तो घरी परत आला आहे.

ट्रेंडी

## हेअर कलर निवडा हटके

पांढरे केस लपवण्यासाठी केस कलर करणं ही सोय आहे तर काळ्या केसांवरही वेगवेगळे ट्रेंडी कलर अप्लाय करुन आकर्षक लूक मिळवणं हा फॅशन फंडा आहे. तुम्हालाही तो आजमावून बघायचा असेल तर चलतीतल्या कलर्सबद्दल जाणून घ्या.



* अल्ट्राव्हायलेट हेअर कलर – केवळ कपड्यांमध्येच नव्हे तर केसांमध्येही हा कलर अनेकींच्या पसंतीस उतरत आहे. या कलरने केस टोन्ड करा किंवा हायलाईट करा. * गोल्डन हेअर कलर – त्याच त्याच हेअर कलरला कंटाळला असाल तर गोल्डन कलर ट्राय करायला हरकत नाही. * चारकोल – सध्याच्या फॅशन सीझनमध्ये स्मोकी ग्रे आणि चारकोल हे रंग ट्रेंडी मानले जात आहेत. सोबर पण ट्रेंडी लूक हवा असणाऱ्यांसाठी हा रंग सर्वोत्तम. * मिड्नाईट ब्लू – ट्रेंडमध्ये नव्याने ॲड झालेला कलर म्हणजे मिडनाईट ब्लू. निळ्या आणि काळ्याच्या सीमारेषेवर असणाऱ्या या रंगाने केसांना वेगळाच लूक मिळतो. * निऑन हेअर कलर – हेअर कलरमध्ये निऑन कलरची जादू आहे. यातही पेस्टल, ब्राईट, स्टेन्सिल किंवा मल्टीकलर हायलाईट हे पर्याय उपलब्ध आहेत.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### गयामध्ये शस्त्रसाठ्यासह ३ माओवाद्यांना अटक

**पाटणा :** बिहारच्या गया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि स्फोटकांसह तीन माओवाद्यांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली. गुरुवारी स्पेशल टास्क फोर्स (एसटीएफ) आणि स्थानिक पोलिसांनी संयुक्त कारवाईत इमामगंज पोलिस स्टेशन परिसरातील चक्करबंधा येथून त्यांना अटक करण्यात आली. अटक केलेल्यांची ओळख रूपेश पासवान, बबलू कुमार आणि उदय कुमार अशी आहे, असे पोलिसांनी सांगितले.

### जोधपूर विमानतळावर अमेरिकी पर्यटक ताब्यात



**जोधपूर :** शुक्रवारी जोधपूर विमानतळावर एका ६२ वर्षीय मुळच्या चिनी अमेरिकन पर्यटकाला, काही काळासाठी ताब्यात घेण्यात आले. नियमित तपासणीदरम्यान सुरक्षा कर्मचाऱ्यांना त्याच्या सामानात सॅटेलाइट फोन आढळला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. विली वेई यांग जोधपूरहून दिल्लीला प्रवास करणाऱ्या २८ सदस्यांच्या गटाचा भाग होता. विमानतळाचे एसएचओ सुरेश चौधरी म्हणाले की, ही घटना सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली, म्हणजे हा गट दिल्लीला जाणाऱ्या विमानात चढण्याच्या नियोजित वेळेपूर्वी घडली.

# एसटीचे जाहिरात उत्पन्न १०० कोटींपर्यंत वाढवा

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** एसटी महामंडळाच्या बसेस तसेच स्थानकांवर करण्यात येणाऱ्या जाहिरातींसाठी सर्वंकष नवीन धोरण तयार करून त्यामाध्यमातून मिळणारे उत्पन्न १०० कोटी रुपयांपर्यंत वाढवावे अशा निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. तसेच राज्यभरात परिवहन विभागाच्या जिथे-जिथे जमिनी आहेत, त्या बहुतेक जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. ते अतिक्रमण काढून टाकून, तेथे कुंपण भिंत घालावी, तसेच नामफलक लावण्यात यावा असेही प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे.

परिवहन आयुक्त कार्यालयात बोलावलेल्या परिवहन विभागाच्या आढावा बैठकीमध्ये प्रताप सरनाईक बोलत होते. सध्या ज्या जाहिरात संस्थांना काम दिले आहे, त्यांच्याकडून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने त्यांचे करार रद्द करावेत, अशा सूचना देऊन मंत्री सरनाईक म्हणाले की, चांगले उत्पन्न देणाऱ्या संस्थांची निवड करावी. सध्या जाहिरातीच्या माध्यमतून महामंडळाला २२-२४ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. त्यामध्ये वाढ करुन हे उत्पन्न १०० कोटी करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. नवीन बस खरेदीमध्ये प्रवासी व बस यांची सुरक्षा लक्षात घेऊन जाहिरातीसाठी उपयुक्त पॅनेल बसवण्याची व्यवस्था करावी. तसेच जुन्या बसेसमध्येही याची व्यवस्था करण्यात यावी. बसस्थानके सुधारण्यासाठी नियोजन करावे.

बसस्थानकावर सुसज्ज महिला प्रसाधनगृहे उभारण्यात यावीत. राज्यातील महत्त्वाच्या बसस्थानकांवर महिलांसाठी स्वच्छतागृहे, हिरकणी कक्ष उभारून ते चांगल्या स्थितीत राहतील याची व्यवस्था निर्माण करावी. एसटी महामंडळ मोठ्या प्रमाणावर डिझेल खरेदी करते. यासाठीच्या भविष्यात निविदा काढताना त्यामध्ये सीएसआर फंड संबंधित संस्थेने एसटीसाठी खर्च करावा, अशी अट समाविष्ट करावी, अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या.

करारानुसार ५१५० इलेक्ट्रिक बस पैकी केवळ २२० बसेस एसटी महामंडळाला संबंधित संस्थेने भाडेतत्त्वावर पुरविल्या आहेत. भाडेतत्त्वावर इलेक्ट्रिक बस पुरवठा करण्याचा करार केलेल्या आणि अद्यापही बस पुरवठा न करणाऱ्या संबंधित संस्थेला अंतिम नोटीस पाठवावी. त्यानंतरही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यास त्यांचा करार रद्द करण्याची कार्यवाही करावी. यंदा २ हजार ६४० लालपरी बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. त्यापैकी मार्च अखेर ८०० बसेस १०० आगारात दाखल झाल्या असून प्रवासी सेवेत रुजू झालेल्या आहेत. पुढील दोन महिन्यांत सर्व २५१ आगारांना नवीन बसेस मिळतील असे नियोजन करावे. महामंडळाच्या नवीन बसेसचे लोकांनी चांगले स्वागत केले आहे. येथून पुढेही अशाच प्रकारे चांगल्या बसेस प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्याव्यात. सर्व बसेसमध्ये जीपीएस सह सीसीटीव्ही कॅमेराही बसवण्यात यावेत असे मंत्री सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

### अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्या

● राज्यभरात ठिकठिकाणी परिवहन विभागाची जमीन आहे. त्या जमिनीवर कित्येक वर्षापासून अनधिकृत अतिक्रमण झालेले दिसून येते. याबाबत स्थानिक अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करून सदर जमिनी अतिक्रमण मुक्त करुन आपल्या ताब्यात घ्याव्यात. तेथे कुंपण भिंत करावी. तसेच आपल्या विभागाचा नाम फलक प्रदर्शित करावा व यापुढे त्या ठिकाणी अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सन २०२३ पासून परिवहन विभागाच्या विविध पदांच्या बदल्या या ऑनलाइन पद्धतीने होत आहेत. यामध्ये मानवी हस्तक्षेपाला कोणती संधी नाही. यापुढे या ॲपमध्ये आवश्यक त्या सुधारणा करून होणाऱ्या बदल्या अत्यंत पारदर्शक होतील याबाबत दक्ष रहावे! तसेच अधिकाऱ्यांच्या बरोबरच लिपिक पदाच्या बदल्या या ॲपद्वारे होतील, असे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

# महाराष्ट्रासाठी ४,८१९ कोटींची तरतूद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने शुक्रवारी रेल्वेच्या एकूण १८,६५८ कोटी रुपयांच्या ४ मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांना मंजुरी दिली. यामुळे महाराष्ट्र, ओडिशा आणि छत्तीसगड या तीन राज्यांतील १५ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेचे जाळे सुमारे १,२४७ किमीने वाढणार आहे. यात महाराष्ट्रातील ४,८१९ कोटी रुपयांच्या गोंदिया-बल्हारशाह मार्गावरील २४० किमी लांबीच्या लाईन दुहेरीकरण प्रकल्पाचा समावेश आहे.

छत्तीसगडमधील पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने केंद्रीय मंत्रिमंडळाने ६१५ किमी लांबीचा नवीन रेल्वे मार्ग उभारण्यासाठी ८,७४१ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्याला आज मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या मार्गावरील रस्ते वाहतुकीच्या तुलनेत या नवीन रेल्वे मार्गामुळे लॉजिस्टिक खर्चात २,५२० कोटी रुपयांची बचत होईल. हा देशातील सर्वात मोठ्या रेल्वे प्रकल्पांपैकी एक असेल, असे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याची घोषणा करताना सांगितले.



ओडिशात ३,९१७ कोटी रुपये खर्चाचा २७७ किमी लांबीच्या प्रकल्प उभारला जात आहे. यामुळे संबलपूर आणि जरापाडा दरम्यान तिसरा आणि चौथा मार्ग जोडला जाणार आहे. तर चौथा प्रकल्प ओडिशातील असून, येथील झारसुगुडा - ससोन दरम्यान तिसरा आणि चौथा मार्ग जोडला जाईल.

# दयोदय गोशाळेच्या शेड क्रमांक तीन चा उद्घाटन सोहळा संपन्न



दयोदय गोशाळेच्या शेड क्रमांक तीनचे उद्घाटन प्रसंगी श्री. शेखरजी मुंदडा, श्री. गिरीश शाह, ॲड. स्वप्निल ढमढेरे, श्री. नितीन वाघमोडे, , डॉ. शितल नवले, श्री. अतुल शहा, सौ. संगिता शहा, श्री. सिध्दार्थ शहा व अन्य.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** सौ कुसुम आणि श्री जिनदत्त शाह वेल्फेअर फाउंडेशन संचलित दयोदय गोशाळा चे शेड क्रमांक 3 चे कार्यारंभ सोहळा नुकताच संपन्न. यावेळी सर्वप्रथम दयोदय गोशाळेचे विश्वस्त आणि सचिव श्री सिध्दार्थ अतुल शाह यांनी गोशाळेचे व्हिजन आणि मिशन याबाबत उपस्थिताना सविस्तर माहिती देऊन या ठिकाणी एकात्मिक व्यक्तिमत्व विकास आणि आध्यात्मिक विकास गोमातेच्या सेवेच्या माध्यमातून करण्याचा प्रयास असल्याचे सांगितले.

या सोहळ्यासाठी महाराष्ट्राचे राज्यमंत्री दर्जाचे मा श्री शेखरजी मुंदडा अध्यक्ष महाराष्ट्र गोसेवा आयोग तसेच मा. श्री गिरीश भाई शाह, सदस्य, भारतीय जीव जंतू कल्याण बोर्ड आणि कार्यकारी संचालक, समस्त महाजन एनजीओ मुंबई, ॲड. स्वप्निल ढमढेरे, आयकर आयुक्त मा. नितीन वाघमोडे पशुसंवर्धन विभागाचे डॉ शितल नवले, पशुधन विकास अधिकारी मा श्री पोळ साहेब, बारामती नगर परिषदेचे माजी अध्यक्ष मा. सदाशिव बापू सातव तसेच बारामती सहकारी बँकेचे चेअरमन सचिव सातव साहेब कार्यकारी संचालक श्री रमेश बनकर साहेब आदी मान्यवर या ठिकाणी उपस्थित होते. याशिवाय विविध भागातून आलेले गोशाळा चालक यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. यावेळी मान्यवरांचा सत्कार श्री. अतुल शहा यांनी केला.

दयोदय गोशाळेचे कार्यपद्धती पाहून शेखरजी मुंदडा यांनी मा अतुल भाई शहा श्री सिद्धार्थ शाह यांचे अभिनंदन करून दयोदय गोशाळा ही एक आदर्श गोशाळा असल्याचे मत व्यक्त केले आणि भावी काळात शासकीय योजना राबवण्यासाठी या गोशाळेला निश्चितपणे सुवर्णसंधी देण्यात येईल असे मत व्यक्त केले. गोवर्धन, गोसंरक्षण व गोसंगोपन यांचे कार्य दयोदय गोशाळेमार्फत उत्तम प्रकारे कार्य केले जात आहे असे मत व्यक्त केले. भविष्यकाळात सर्व गोशाळा आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सातत्याने प्रयत्न राहणार आहेत व हे माझे स्वप्न आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी मा. गिरीश भाई शहा यांनी दयोदय गोशाळेचे व्यवस्थापन संचालन आणि गोमातेची सेवा आणि गोमातेचा संभाळ योग्य पद्धतीने चालू असल्याचे मत व्यक्त केले. दयोदय गोशाळा ही गोसेवा गोसंरक्षण व गोरक्षण तसेच नैसर्गिक शुद्ध वातावरण आणि पर्यावरणाचे कार्य आणि ग्रामीण विकास याचे प्रेरणादायक आदर्श गोशाळा बनली आहे असे मत त्यांनी व्यक्त केले

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दयोदय गोशाळेचे व्यवस्थापक बाळकृष्ण कुलकर्णी यांनी केले.

पान १ वरून

## संतप्त पडसाद

संयम बाळगावा आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये घडलेल्या अमानुष प्रकाराच्या पार्श्वभूमीवर भाजप पुणे शहर महिला आघाडीच्या वतीने एरंडवणे येथील दीनानाथ रुग्णालयातील डॉ. सुश्रुत घैसास यांच्या क्लिनिक मध्ये जाऊन तोडफोड केली. यावेळी हर्षद फरांदे, स्नेहल दगडे पाटील, पुनम चौधरी, आरती कोंढरे, उज्वला गौड, स्वाती मोहोळ, रेणुका राठोड, भावनाताई शेळके, सविता बलकवडे, लिमये गायत्री ताई भागवत अश्विनी पवार या भाजपा पदाधिकाऱ्यांनी निवेदन हॉस्पिटल प्रशासनातील अधिकारी रवी पालेकर यांच्याकडे सुपूर्त केले. दिलेल्या निवेदनावर लवकरात लवकर योग्य ती कारवाई करावी, अशी विनंती हॉस्पिटल प्रशासनास करण्यात आली आहे. अन्यथा आम्ही पुढील कारवाई करू असा इशारा देखील पुणे भाजपा महिला आघाडीच्या वतीने दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनास देण्यात आला आहे.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने १० कोटी किमतीची आठ हजार चौरस फूट जमीन राज्यसरकार कडून १ रुपया भाड्याने पदरात पाडून घेतली... राज्य सरकारने देखील रुग्णसेवेसाठी मोठ्या विश्वासाने चॅरिटेबल ट्रस्ट असलेल्या या रुग्णालयाला दिली पण त्यांनी सरकारचा विश्वास घात केला, असा संताप प्रमुख संयोजक कसबा संस्कार केंद्र पुणे व प्रमुख हिंदवी महिला गट पुणे च्या अनघा अनिल दिवाणजी यांनी व्यक्त केला.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात नुकतीच घडलेली घटना ही केवळ धक्कादायक नव्हे, तर मानवी संवेदनांनाही काळिमा फासणारी आहे. या घटनेविरोधात आज युवक काँग्रेसकडून तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. युवक काँग्रेसचे राज्य सरचिटणीस अक्षय जैन यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर काळे शाई फेकत निषेध नोंदवला, तसेच रुग्णालयाच्या नावाच्या फलकाची फाडफाड करून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली.

### आज तीव्र लक्षवेधी धरणे आंदोलन!

● जनतेची संपत्ती सरकारच्या मदतीने हडप करून, गोर-गरीब जनतेतील गरीब रुग्णांची प्रचंड लूट करणाऱ्या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल समोर तीव्र निदर्शने करीत आंदोलन आज शनिवारी ५ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे. प्रत्येक नागरिकाला हॉस्पिटलची गरज भासणार आहे. दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, मुख्य प्रवेशद्वारासमोर, पुणे येथे सकाळी ११.३० वाजता सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन रुग्ण हक्क परिषद, पुणे शहर कमिटीचे उमेश चव्हाण यांनी केले आहे.

## एआयचा वापर...

अथॉरिटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून आधार कार्ड नागरिकांना दिले जातात. नागरिकांनी दिलेली बायोमेट्रिक आणि भौगोलिक माहितीच्या आधारावर हे आधार कार्ड तयार केले जाते. पण, हेच आधार कार्ड चॅट जीपीटीच्या माध्यमातून तयार होत असल्यानं खळबळ उडाली आहे. सोशल मीडिया नेटवर्क एक्स वर याबाबतची उदाहरणं वापरकर्त्यांनी शेअर केली आहेत. एआयच्या मदतीनं तयार करण्यात आलेले फेक आधार कार्ड आणि खरे आधार कार्ड यामधील फरक शोधणे अवघड आहे. फेक आधार कार्डवरील जन्मतारीख, फोटो ही सर्व माहिती देखील अस्सल आहे. हा प्रकार उघड झाल्यानंतर युझर्समध्ये काळजीचं वातावरण निर्माण झालंय. चॅटजीपीटीला ही माहिती कशी मिळाली? हे प्रकार करणाऱ्यांवर काय कारवाई करणार? हा प्रश्न यानिमित्ताने विचारला जात आहे.

## काँग्रेसचे...

२०१९ च्या सीएएला आव्हान दिले आहे, त्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सर्वोच्च न्यायालय २००५ च्या माहिती अधिकार कायद्यातील २०१९ च्या सुधारणांना काँग्रेसने आव्हान दिले आहे. निवडणूक आचार नियम (२०२४) मधील सुधारणांच्या वैधतेला काँग्रेसने आव्हान दिले आहे यावरही सुनावणी सुरू आहे. त्याचप्रमाणे, १९९१ च्या प्रार्थनास्थळ कायद्याची मूळ भावना राखण्यासाठी काँग्रेसने केलेल्या हस्तक्षेपावर सर्वोच्च न्यायालयात एक खटला प्रलंबित आहे.

# अधिवेशनाचे वाजले सूप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन शुक्रवारी संपले. राज्यसभा आणि लोकसभा अशा दोन्ही सभागृहांचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले. ३१ जानेवारी रोजी या अधिवेशनाला सुरवात झाली होती. या अधिवेशनामध्ये सरकारने देशाचा सर्वसाधारण अर्थसंकल्प मांडला, वक्फ दुरुस्ती विधेयक, त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक, स्थलांतर आणि विदेश विधेयक यांना दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळाली. यानंतर संसदेचे पावसाळी अधिवेशन होईल.

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी सभागृहाच्या २६७ व्या सत्राच्या समारोपप्रसंगी सर्व सदस्यांचे सक्रिय योगदान दिल्याबद्दल आभार मानले. त्यांनी सांगितले की, या अधिवेशनात राज्यसभेचे एकूण १५९ तास कामकाज झाले. सभागृहाची उत्पादकता ११९ टक्के होती. अधिवेशनामध्ये, राज्यसभेचे सर्वात जास्त वेळ कामकाज ३ एप्रिल रोजी झाले. यादिवशी सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली, सलग १७ तासानंतर ४ एप्रिल रोजी पहाटे ४:०२ वाजता कामकाज संपले.

जा.क्रं./1763/25 दि. 02/04/2025 **NOTICE OF INQUIRY** C.R NO. /292/2024

नमुना क्रं. 2
सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे
चौकशीची नोटीस
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, सन 1950 याचे कलम 22

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, सन 1950 चे कलम 22 अन्वये "Alumni of MVPM Hostels" पुणे (पी.टीआर क्रं. एफ 41741/पुणे) या संस्थेतर्फे **सौ. कीर्ती लड्डा** (विश्वस्त) यांनी सदर संस्थेच्या घटना व नियमावलीत बदल करण्यासाठी व त्यास मान्यता घेण्यासाठी बदल अर्ज क्रं. 1292/2024 दाखल केला आहे. प्रस्तावित बदल, संबंधित बदल अर्जाबरोबर जोडले आहेत. सदर घटना व नियमावलीतील प्रस्तावित बदलांबाबत मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे न्यायालयात चौकशी केली जाणार आहे. तरी सदर संस्थेच्या कोणत्याही सभासदास सदर घटना व नियमावलीतील प्रस्तावित बदलाबाबत काही म्हणणे मांडायचे असल्यास हरकत घ्यायची असल्यास संबंधित सभासदाने स्वतः अथवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत दिनांक 25/4/2025 रोजी मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नं. 1. पुणे विभाग, पुणे यांचे न्यायालयात सकाळी 11.00 वा. हजर रहावे आणि आपले म्हणणे मांडावे अन्यथा सदर चौकशीचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल.
आज दिनांक 2/4/2025 रोजी माझ्या सहीनीशी व धर्मादाय आयुक्तांच्या शिक्यानिशी सदर नोटीस दिली.

शिक्का
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग पुणे, वाडिया कॉलेज समोर,
45-2, कै. बाळकृष्ण सखाराम ढोले पाटील मार्ग, पुणे - 1

## मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश

निर्देशानुसार तयार करण्यात आलेल्या धर्मादाय रुग्ण योजनेची सर्व धर्मादाय रुग्णालयांकडून प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी प्रधान सचिव विधी व न्याय विभाग तसेच धर्मादाय आयुक्त यांना खालील प्रमाणे सूचना केल्या आहेत.

● धर्मादाय रूग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकातील रूग्णांसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व धर्मादाय रुग्णालयांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे 'धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची' मान्यता घ्यावी. याबाबत धर्मादाय रुग्णालयांना तत्काळ निर्देश देण्यात यावेत.

● विधी व न्याय विभागामार्फत गठीत करण्यात आलेल्या तपासणी पथकामार्फत तपासणी अहवाल व समितीच्या शिफारशी सादर केल्या आहेत. त्या शिफारशींवर तत्काळ कार्यवाही करावी.

● शासनामार्फत धर्मादाय रुग्णालयांमध्ये १८६ धर्मादाय आरोग्य सेवकांच्या सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर पदे तात्काळ भरण्यात यावीत. निर्धन रुग्णनिधी (आयपीएफ) खात्याबाबतची अद्ययावत माहिती धर्मादाय रुग्णालयांकडून घेवून ती धर्मादाय आयुक्त यांच्या संकेतस्थळावर अद्ययावत करावी.

● योजनेची अंमलबजावणी न करणाऱ्या रुणालयांवर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार कठोर कारवाई करावी.

## नवीन महाबळेश्वरमधील...

मंजुरी दिलेल्या गावांमुळे आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची (एमएसआरडीसी) महाबळेश्वर, पाटण, सातारा, जावळी या तालुक्यांतील तब्बल ५२९ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाली आहे. एमएसआरडीसीने यापूर्वीच नवीन महाबळेश्वर गिरिस्थानात समाविष्ट केलेल्या २३५ गावांच्या अधिसूचित क्षेत्राचा प्रारूप विकास आराखडा तयार केला आहे.

**साता-यातील ५२९ गावांसाठी प्राधिकरण**

लवकरच हा आराखडा अंतिम केला जाणार आहे. आता २३५ गावांनजीक असलेल्या आणखी २९४ गावांचाही या प्रकल्पात नव्याने समावेश केला आहे.

या २९४ गावांचे एकूण क्षेत्रफळ ९४,४०४ हेक्टर म्हणजेच ९४४ चौ. किमी एवढे आहे. यापूर्वीच्या २३५ या गावांचे एकूण क्षेत्र १,१५,३०० हेक्टर एवढे आहे. या नव्या प्रस्तावाला मान्यता मिळाल्याने साता-यातील ५२९ गावांतील २,०९,७०० हेक्टर म्हणजेच तब्बल २०९७ चौ. किमी क्षेत्रासाठी एमएसआरडीसी नियोजन प्राधिकरण असेल.

**जैवविविधतेला बाधा**

या प्रकल्पामुळे या जैवविविधतेला बाधा पोहचेल. अत्यावश्यक नसलेला हा प्रकल्प रद्द करून पर्यावरणाचे संरक्षण करावे, अशी मागणी पर्यावरण अभ्यासक आणि वनस्पतितज्ज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर यांनी केली आहे.

**या ६७ गावांचा समावेश**

जावळी तालुका – आडोशी, आगलावेवाडी, धनकवडी, दिवदेववाडी, जुंगटी, करंडी तर्फे मेढा, खिरखंडी, कुंभारगणी, कुसापूर, कुसवडे, माडोशी, मालचौंडी, मालदेव, मोळेश्वर, मामुर्डी, मेट इंदवली, मोहाट, मोरावळे, नरफदेव, निझरे, पाली तर्फे तांब, पिंपरी तर्फे मेढा, सावरत, सायली, ताकवली, तांबी, तांबी तर्फे मेढा, वाघेश्वर, वाहिटे, वासोटा पाटण – आंबावणे, आंब्रुळे, आसावळेवाडी, चाफेर, ढोकावळे, डिचोळी, घाणाव, गोकुळ तर्फे हेळवाक, हुंबरवाडी, काळकेवाडी, कावरवाडी, मालोशी, मणेरी, मार्लोशी, मसतेवाडी, मिरगाव, नाटोशी, नावडी, नवजा, पुनवळी, रुवळे, शिरशिंगे, तळीये, तोंडोशी, तोरणे, झाडोळी, झाकडे. सातारा- आगुडेवाडी, आकले, भांबावळी, चिंचणी, गोगावळेवाडी, जोतिबाचीवाडी, कामठी, पाटेघर, वेळे, येवतेश्वर.

## टँकरमाफियांचा...

वितरित केले जाते. जेथे पाणीपुरवठा होत नाही किंवा काही कारणाने पाणी पोहोचू शकलेले नाही, अशा ठिकाणी महापालिकेतर्फे मोफत टँकर दिले जातात. हापालिकेकडे टँकरची संख्या कमी असल्याने ठेकेदारांच्याही टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो. किमान आठ टँकर असलेल्या ठेकेदारांमार्फत अन्य ठिकाणी पाणी पोहोचवले जाते. यासाठी पालिका ठेकेदारांना शुल्क देते. तर ज्या सोसायट्यांना पाणी कमी पडते किंवा त्यांना अतिरिक्त पाण्याची गरज आहे, अशा सोसायट्या निश्चित शुल्क (चलन) भरून टँकर विकत घेतात. या तिन्ही प्रकारच्या टँकरची नोंद ठेवली जाते.

**PUBLIC NOTICE (FOR LOST OF ORIGIONAL DOCUMENT)**

Notice is hereby given that the share certificates no(s) 5240 for Equity shares of **BAJAJ AUTO LIMITED** shares bearing distinctive no(s) 149695178-149695252 standing in the name(s) of (late) **Smt. Indumathi Badrinath** having **Folio no. BI 0000022**, or such other details including any modifications/updation thereof in the mentioned original share certificate due to any corporate actions, if any, mentioned in the books of **M/s BAJAJ AUTO LIMITED**, has/have been lost/misplaced/destroyed and the advertiser (legal heir) has/have applied to the company for issue of duplicate share certificate(s) in lieu thereof. any person(s) who has/have claim(s) on the said shares should lodge such claim(s) with the company's registrars and transfer agents viz Kfin Technologies Private Limited, selenium tower b, Plot no: 31-32 Gachibowli, financial district, Nanakramguda, Hyderabad - 500 032 within 15 days from the date of this notice failing which the company will proceed to issue duplicate share certificate(s) in respect of the said shares. For and on behalf of late Smt. Indumathi Badrinath,Argula Krishna Badrinath

## अल्पसंख्याकांच्या सुरक्षेबाबत...

अत्याचाराच्या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून त्यांच्या सुरक्षेची हमी देईल, अशी अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली, असे मिस्री यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या भेटीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पर्यावरणाला हानी पोहोचवणारी कोणतीही वक्तव्ये टाळावीत, असे आवाहन केले. लोकशाही, स्थिर, शांततापूर्ण, पुरोगामी आणि सर्वसमावेशक बांगलादेशसाठी भारताच्या पाठिंब्याचा पुनरुच्चार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

भारताचा संबंधांबाबत लोककेंद्रित दृष्टिकोनावर विश्वास असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आणि दीर्घ कालावधीत दोन्ही देशांमधील सहकार्यावर प्रकाश टाकला ज्यामुळे दोन्ही देशांच्या जनतेला ठोस लाभ झाला आहे. याच भावनेतून बांगलादेशबरोबर व्यावहारिकतेच्या भावनेवर आधारित सकारात्मक आणि विधायक संबंध प्रस्थापित करण्याची भारताची इच्छा त्यांनी प्राध्यापक युनूस यांना अधोरेखित केली, असे मिस्री यांनी सांगितले.

## भारतकुमार हे नाव खऱ्या अर्थाने...

चित्रपटांनी तर जागतिक पातळीवर अनेक विक्रम प्रस्थापित केले. 'रोटी कपडा और मकान' सारख्या चित्रपटांनी त्यांनी सामाजिक विषयांना हात घातला. उपकार, क्रांती असे अनेक चित्रपट त्यांनी गाजवले. त्यांनी आपल्या प्रत्येक कलाकृतीतून देशप्रेमाची आणि राष्ट्रीयत्वाची भावना रुजवण्यासाठी प्रयत्न केले.

भारतीय चित्रपटसृष्टीसाठी त्यांनी दिलेले योगदान अमूल्य असून त्यांची जागा कधीही भरून निघणार नाही. मनोजकुमार यांनी दिग्दर्शन, पटकथा-गीत लेखन, संकलन या क्षेत्रातही काम केले. त्यांनी अनेक नवोदित कलाकारांना संधी दिली. त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीला सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांना भारत सरकारकडून पद्मश्री आणि दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्यांच्या निधनाने हिंदी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ कलाकार हरपला आहे.

## मनोज कुमार काळाच्या पडद्याआड

नाटकांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यानंतर ते मुंबईत आले. १९५७ मध्ये 'फॅशन' या चित्रपटातून त्यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली. १९६० मध्ये 'कांच की गुड़िया' या चित्रपटात ते पहिल्यांदा मुख्य भूमिकेत दिसले. हा चित्रपट सुपरहिट ठरला. यानंतर 'उपकार', 'पत्थर के सनम', 'रोटी कपडा और मकान', 'संन्यासी' आणि 'क्रांती' यांसारख्या अनेक चित्रपटात ते झळकले. त्यांच्या बहुतेक चित्रपटांमध्ये त्यांचे नाव 'भारत' असे असायचे. याच कारणामुळे चाहत्यांमध्ये ते 'भारत कुमार' म्हणून लोकप्रिय झाले.

**भारतीय सिनेसृष्टीतील महान युगाचा अंत : उपमुख्यमंत्री अजित पवार**

ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि 'भारतकुमार' म्हणून ओळखले जाणारे मनोजकुमार यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका महान युगाचा अस्त झाला आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

जा.क्रं./1762/25 दि. 02/04/2025 **पब्लिक नोटीस** C.R NO. 422/2024

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे
चौकशीची नोटीस
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, सन 1950 याचे कलम 22

सार्वजनिक ट्रस्टचे नाव, नोंदणी क्रमांक: "MVPM (Maheshwari Vidya Pracharak Mandal) Alumni" फ्लॅट नं ३, अमित अपार्टमेंट, CTS नं १०९८/अ, ८८० मॉडेल कॉलनी, पुणे ४११०१६ नोंदणी क्रमांक: F/41741/PUNE

अर्जदारः **सौ. कीर्ती लड्डा**
विषय - संस्थेचा नावात बदल करणे बाबत.....
सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग पुणे हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल / अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये संस्थेच्या नावात बदल करणे बाबत नोटीस काढत आहे.
सदर संस्थेचे नविन नाव व जुने नाव खालीलप्रमाणे:-
संस्थेचे नविन नाव : ALUMNI of MVPM HOSTELS
संस्थेचे जुने नाव: "MVPM (Maheshwari Vidya Pracharak Mandal) Alumni"
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
हि नोटीस माझे सहीनिशी व मी, सहा. धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे शिक्कानिशी आज दिनांक 2/4/2025 रोजी दिली.

शिक्का
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग पुणे, वाडिया कॉलेज समोर,
45-2, कै. बाळकृष्ण सखाराम ढोले पाटील मार्ग, पुणे - 1

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे मळद, ता-वारामती, जि-पुणे येथील व परिसरातील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
खालील परिशिष्टातील नमूद मिळकत तिचे विद्यमान मालक श्री. महादेव संभाजी गावडे यांनी आमचे अशिल श्रीकांत कल्याण पोळ व मंदा श्रीकांत पोळ यांना विक्री करण्याचे मान्य करून तसा व्यवहार ठरून विसारादाखल रक्कम स्विकारून विसारपावती लिहून व नोंदवून दिलेली आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व त्यांचेशिवाय इतर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नसल्याची खात्री व भरवसा दिला आहे. परंतु या उपरही या मिळकतीचे मालकी हक्क, वाटप, तावा, वहिवाट अगर इतर वावतीत कोणाचीही कसलीही हरकत, व्यवहार अगर हितसंबंध असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत खालील पत्त्यावर मूळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा आमचे अशिल कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नसल्याचे ग्राह्य धरून व असल्यास जाणिवपूर्वक सोडून दिल्याचे गृहीत धरून व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीची दखल घेतली जाणार नाही .
**परिशिष्ट :**
तुकडी पुणे, पोट तुकडी वारामती, मे. दुय्यम निबंधक सौ., वारामती यांचे अधिकार कक्षेतील, जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती बारामती अंतर्गत मौजे मळद, ता. वारामती, जि. पुणे येथील शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे-
**विद्यमान मालक : श्री. महादेव संभाजी गावडे**
१) गट नंवर : ६१ / २ क्षेत्र : ९ हे. ६७ आर आकार: रु. पै. ३३ - ९९ ताबा व वहिवाटीचे हक्क : २ हे. ४२ आर क्षेत्र पैकी, तसेच २) गट नंबर : ६९ / १ क्षेत्र : १९ हे. २६ आर आकार: रु. पै. ५९-७८ तावा व वहिवाटीचे हक्क : हे . २१ आर एकत्रित पैकी ००.०६ आर क्षेत्र, रस्ता वापर, वहिवाट व इजमेन्ट हक्कांसह.
वरील मिळकत वावत कोणाची हरकत असल्यास, खालील पत्त्यावर ८ (आठ) दिवसांच्या आत संपर्क साधावा.
**बारामती**
**दिनांक : २९/०३/२०२५**

शिक्का
**सही**
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. प्रतिक प्रदिप महामुनी
ऑफीस, शालीमार कॉर्नर, वारामती,
ता. बारामती, जि. पुणे.
मो.नं. ९३७३०२०२३२

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that Smt. Sunanda Shivaji Tupe is the Owner/ Holder of All that piece and parcel of land bearing S. No. 201/21/2 adm. 1000 Sq.fts, Situated at Hadapsar Tal. Haveli Dist. Pune within the limits of PMC. The said land is purchased from Shri Ravindra Uttarmrao Tupe & others vide Sale Deed dated 31/07/2010 registered in the office of Sub Registrar, Haveli 6 at Sr.No. 6651. Smt. Sunanda Shivaji Tupe states and declares that Original Sale Deed dated 31/07/2010 registered at Haveli 6 at Sr.No. 6651, with RR and Index II are lost and misplaced. The said owner have assured that she has clear and marketable title to the said Property. Now my client intends to obtained loan from Vastu Housing Finance Corporation Ltd and If any person, bank institution or authority having any claim, objection or interest or having in possession of above Original lost documents, should inform me on address given below within 7 days from the date of this notice. Dated- 04/04/2025

**Adv. Vanashree G Kshirsagar-Mob. 9823598801,**
**email - vanashree.kshirsagar@vastuhfc.com**
**Vastu Housing Finance Corp Ltd, Cts No 363/3, Final Plot No 715/3, Apartment No 3, 2Nd Flr, Awing, Pratisad, Jog Condominium, Shivaji Nagar, Bhamburda, Haveli, Pune 411004**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that Late Devidas Tatyram Galande owner/holder of S. No. 196 (Old S. no. 161) adm 500 sq.ft, situated at Phursungi, Pune expired on 05/10/2020, leaving behind his legal heirs i.e wife Smt. Ratan Devidas Galande, Son Mr. Sagar Devidas Galande & Son Mr. Sachin Devidas Galande. Now my clients Mr. Sagar Devidas Galande & others intends to obtain loan from Vastu Finserv India Pvt Ltd and If any person having any claim/objection in respect of legal heir-ship of Lt. Devidas Tatyram Galande should inform me on address given below within 7 days from the date of this notice. Dated- 04/04/2025

**Adv. Vanashree G Kshirsagar-Mob. 9823598801,**
**email - vanashree.kshirsagar@vastuhfc.com**
**Vastu Housing Finance Corp Ltd, Cts No 363/3, Final Plot No 715/3, Apartment No 3, 2Nd Flr, Awing, Pratisad, Jog Condominium, Shivaji Nagar, Bhamburda, Haveli, Pune 411004**

# सर्वसमावेशक विकासाकडे

## वंचितांना न्याय मिळण्याचा विश्वास, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या दोन्ही सभागृहांनी वक्फ (दुरुस्ती) विधेयक आणि मुस्लिम वक्फ (रद्द) विधेयक मंजूर करणे हे सामाजिक, आर्थिक न्याय, पारदर्शकता आणि सर्वसमावेशक विकासाच्या प्रयत्नात एक महत्त्वाचा क्षण आहे. हे विधेयक विशेषतः अशा लोकांना मदत करेल जे दीर्घकाळापासून बाजूला राहिले आहेत. ज्यामुळे त्यांना संधी मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आले आहे. संसदीय समितीच्या चर्चेत सहभागी झालेले आणि त्यांचा दृष्टिकोन मांडणाऱ्या व कायद्यांना बळकटी देण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व संसद सदस्यांचे आभार", असं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.

वक्फ सुधारणा विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आलं आहे. यानंतर आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीनंतर या विधेयकाचं कायद्यात रूपांतर होईल. दरम्यान, मागील काही दिवसांपासून वक्फ सुधारणा विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलंच राजकारण तापलं होतं.

वक्फ सुधारणा विधेयकाला विरोधकांनी जोरदार विरोध दर्शवला.






मात्र, अखेर हे विधेयक लोकसभा आणि राज्यसभा अशा दोन्ही सभागृहात मॅरेथॉन चर्चेनंतर मंजूर करण्यात आलं. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वक्फ सुधारणा विधेयकावर आता प्रतिक्रिया दिली आहे.

हे विधेयक सामाजिक, आर्थिक न्याय, पारदर्शकता आणि सर्वसमावेशक विकासाच्या प्रयत्नात एक महत्त्वाचा क्षण असल्याचं पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे.

"संसदीय समितीला आपले मौल्यवान विचार पाठवणाऱ्या असंख्य लोकांचेही विशेष आभार. त्यामुळे पुन्हा एकदा, व्यापक चर्चा आणि संवादाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

अनेक दशकांपासून वक्फ व्यवस्थेची पारदर्शकता आणि जबाबदारीचा अभाव होता. यामुळे विशेषतः मुस्लिम महिला, गरीब मुस्लिम, मुस्लिमांच्या हिताचे नुकसान झाले. संसदेने मंजूर केलेले कायदे पारदर्शकता वाढवतील आणि लोकांच्या हक्कांचे रक्षण करतील", असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

### स्वाक्षरीनंतर कायद्यात रुपांतर

● लोकसभेच्या पाठोपाठ राज्यसभेत गुरुवारी (३ एप्रिल) रात्री १२ तासांच्या चर्चेनंतर मध्यरात्री २.३० वाजता वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झालं. यावेळी वक्फ सुधारणा विधेयकाच्या बाजूने १२८ मते पडली, तर विधेयकाच्या बाजूने ९५ मते पडली आहेत. आता हे विधेयक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पाठवले जाणून असून त्यांनी या विधेयकावर स्वाक्षरी केल्यानंतर या विधेयकाचं कायद्यात रूपांतर होईल.

● वक्फ सुधारणा विधेयकावरून सत्ताधारी भारतीय जनता पार्टी, एनडीए आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांमध्ये चांगलंच राजकारण तापल्याचं पाहायला मिळालं. यानंतर अखेर वक्फ सुधारणा विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आलं. लोकसभेत २ एप्रिल रोजी मध्यरात्री हे विधेयक मंजूर झालं, तर राज्यसभेत ३ एप्रिल रोजी मध्यरात्री २.३० वाजता हे विधेयक मंजूर करण्यात आलं. दोन्ही सभागृहात मॅरेथॉन चर्चा झाली. या चर्चांसाठी लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज मध्यरात्री देखील सुरु ठेवण्यात आलं होतं. ३ एप्रिल रोजी मध्यरात्री २.३० वाजता राज्यसभेत विधेयक मंजूर करण्यात आलं. त्यानंतर पहाटे ४ वाजेपर्यंत सभागृहात या विधेयकावर चर्चा झाली. पहाटे ४ वाजता सभागृहाचं कामकाज तहकूब करण्यात आलं.



"सभागृह पहाटे ४ वाजतेपर्यंत सुरु ठेवण्यात आलं. आता पुन्हा सकाळी ११ वाजता कामकाज सुरु करण्यात येईल. त्यामुळे ही एक दुर्मिळ बाब आहे."

—**जगदीप धनखड** सभापती

# ममता बॅनर्जींना पुन्हा धक्का

## रामनवमीच्या शोभा यात्रेला सर्वोच्च परवानगी

ममता बॅनर्जी सरकारला शुक्रवारी कलकत्ता उच्च न्यायालयाकडून धक्का बसला आहे. अंजनी पुत्र सेनेला हावडा येथील प्रस्तावित मार्गावर रामनवमीनिमित्त शोभा यात्रा काढण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. पश्चिम बंगाल सरकारने न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे कारण देत शोभा यात्रेला आक्षेप घेतला होता. या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने आता रॅली काढण्यास परवानगी दिली आहे. अर्थातच, ही शोभा यात्रा काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने काही अटीशर्थी घातल्या आहेत. ही शोभा यात्रा नरसिंह मंदिरापासून सुरू होईल आणि त्यानंतर जीटी रोडमार्गे हावडा मैदानावर संपेल. दरवर्षी रामनवमीनिमित्त हा धार्मिक कार्यक्रम आयोजित केला जातो. पश्चिम बंगाल सरकारने २०२३ आणि २०२४ मध्ये न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याचे कारण देत त्यास आक्षेप घेतला होता.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रामनवमी ६ एप्रिलला आहे, पण पश्चिम बंगालच्या १४ जिल्ह्यांमध्ये त्यापूर्वीच तणाव वाढू लागला आहे. पश्चिम बंगाल सरकारने पोलिसांच्या सुट्ट्या ९ एप्रिलपर्यंत रद्द केल्या आहेत. कोलकाता, मुर्शिदाबाद, हावडा, पूर्व आणि पश्चिम मेदिनीपूर, उत्तर आणि दक्षिण २४ परगणा, सिलिगुडी, जलपाईगुडी, अलीपुरद्वार, बिहार येथे गुरुवारपासून अतिरिक्त पोलिस दल आणि रॅपिड ॲक्शन फोर्स तैनात करण्यात आले आहेत.

गेल्या दोन दिवसांपासून या जिल्ह्यांमध्ये हिंसाचाराच्या तुरळक घटना घडल्याने समाजात तणाव निर्माण झाला आहे. दक्षिण बंगालचे अतिरिक्त पोलीस महासंचालक सुप्रतिम सरकार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, रामनवमीच्या नावाखाली अशांतता निर्माण करण्याचा कट रचल्याची गुप्तचर माहिती आम्हाला मिळाली आहे. हिंदू पक्षाच्या याचिकेवर कलकत्ता उच्च न्यायालयाने हावडा येथे ठरलेल्या मार्गावर सशर्त मिरवणुकीला परवानगी दिली आहे. मिरवणुकीत कोणतीही व्यक्ती शस्त्र बाळगणार नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाने पोलिसांना मिरवणुकीवर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत. कोलकात्याचे पोलिस आयुक्त मनोज वर्मा यांनीही रामनवमीच्या मिरवणुकीत कोणीही शस्त्र बाळगू नये, असा आदेश जारी केला आहे. दरम्यान, उत्तर बंगालमधील एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, डोंगराळ जिल्ह्यांमध्ये अधिक फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.



### न्यायालयाने घातलेल्या अटी

● **शांततापूर्ण वातावरण :** मिरवणूक पूर्णपणे शांततापूर्ण राहिली पाहिजे.

● **शस्त्रे नाहीत :** स्पर्धकांना लाठ्या-काठ्यांसह शस्त्रे बाळगण्यास बंदी आहे. तथापि, झेंडे आणि प्लॅस्टिक गदा (पीव्हीसी) यांना परवानगी देण्यात आली आहे.

● **लक्ष ठेवणे:** शोभा यात्रेच्या पुढील आणि मागच्या बाजूस पोलिसांची वाहने तैनात करावीत.

● **वेळ:** सकाळी ८.३० ते दुपारी १२ शोभा यात्रा पूर्ण करावी.

● **सहभागींची ओळख :** सहभागी होणाऱ्यांनी आपल्या आधार आणि पॅन कार्डच्या छायाप्रती पोलिस उपायुक्त, मध्य विभाग, हावडा यांच्याकडे सादर कराव्यात.


# लंडनहून मुंबईला येणारे विमान तुर्कीला पोहोचले

## २०० हून अधिक भारतीय १५ तास अडकले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लंडनहून मुंबईला जाणारे व्हर्जिन अटलांटिक एअरलाइन्सचे विमान वैद्यकीय कारणामुळे तुर्कीकडे वळवण्यात आले. विमान कंपनीने शुक्रवारी या संदर्भात माहिती दिली. वैद्यकीय हस्तक्षेप आणि तांत्रिक तपासणीमुळे विमानाचा मार्ग बदलण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

विमानात एकाच वेळी वैद्यकीय आणीबाणी आणि तांत्रिक बिघाड झाल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे १५ तासांपासून प्रवासी तुर्कीमध्ये अडकले आहेत. व्हर्जिन अटलांटिक फ्लाइट व्हीएस३५८ ने २ एप्रिल रोजी लंडनहून मुंबईला उड्डाण केले होते. पण अचानक ते तुर्कीतील दियारबाकीर विमानतळावर वळवण्यात आले. विमान कंपनीने दिलेली माहिती अशी, विमानाची तांत्रिक चौकशी देखील केली जाईल.



या संदर्भात, एका एक्स वापरकर्त्याने भारतीय दूतावासाकडे हस्तक्षेपाची विनंती केली. त्यांनी लिहिले की लंडनहून उड्डाण घेतल्यानंतर मुंबईला जाणा-या व्हर्जिन अटलांटिक विमानाला दियारबाकिर विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करावे लागले. एका गर्भवती महिलेसह २०० हून अधिक भारतीय प्रवासी पाणी आणि मूलभूत सुविधांशिवाय अडकले आहेत.

### दूतावासाचे अधिकारी संपर्कात

● या ट्विटला उत्तर देताना दूतावासाने लिहिले की, अंकारा येथील भारतीय दूतावास दियारबाकीर विमानतळ संचालनालय आणि संबंधित अधिका-यांशी सतत संपर्कात आहेत. अडकलेल्या प्रवाशांची काळजी घेण्यासाठी शक्य तितके समन्वय आणि प्रयत्न केले जात आहेत. एका वापरकर्त्याने दावा केला की, त्यांचा एक नातेवाईक अडकलेल्या प्रवाशांमध्ये आहे आणि त्याचे कुटुंब त्याच्याबद्दल चिंतेत आहे. प्रवाशांना फक्त एकच सँडविच खायला देण्यात आले असल्याचेही त्याने सांगितले.

# वक्फची ६० टक्के जमिनीवर अतिक्रमण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** संसदेत वक्फ बोर्ड संशोधन बिलावर मंथन सुरू आहे. दरम्यान हाती आलेल्या माहितीनुसार, वक्फची महाराष्ट्रातील ६० टक्के जमीन अतिक्रमणाच्या विळख्यात आहे, एका सर्वेत ही माहिती पुढे आली आहे. या जमिनीला अतिक्रमणाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी फारशी प्रभावी कारवाई झालेली नाही.

नागपूरमध्ये वक्फच्या विविध संपत्तींचा वाद चर्चेत आहे. यातील एक प्रकरण सदरमधील एका अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेच्या मैदानाशी जुळला आहे. याशिवाय सतरंजीपुरा मस्जिद कमिटीच्या गोधनी येथील जमिनीचे प्रकरणही चर्चेत आहे. सन २०१६-१७ दरम्यान राज्यातील वक्फ बोर्डाने ताजाबाद दर्गाहची जमीन वक्फची असल्याचा दावा केला होता. हे प्रकरणही चर्चेत आले होते. नागपुरातील वक्फ बोर्ड कार्यालयात वक्फ संपत्तीच्या नोंदणीचे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. वक्फजवळ असलेल्या एकूण जमिनीपैकी ५० टक्के जमीन मराठवाड्यात आहे. त्यातही सर्वाधिक संपत्ती छत्रपती संभाजीनगरात असल्याची माहिती सर्व्हेत नोंदवली आहे. त्यानंतर बीड, जालना आणि परभणीतही मोठी संपत्ती वक्फकडे आहे. विदर्भात केवळ नागपूर, अमरावतीतच वक्फकडे जमीन आहे. नागपूर शहर आणि जिल्हा मिळून सुमारे ४० ते ५० एकर जमीन वक्फकडे आहे.



**गाझा पट्टी** इस्रायली सैन्याने गाझा पट्टीतील शुजैया परिसरातून पॅलेस्टिनींना स्थलांतर करण्याचे आदेश दिल्यानंतर तेथील पॅलेस्टिनी त्यांच्या घरातून सामान घेऊन इतरत्र निघाले आहेत.

# मराठी भाषेवरून मनसे आक्रमक



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मराठी भाषेवरुन महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुन्हा एकदा आक्रमक झाली आहे. गुढीपाडवा मेळाव्यात राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना बँकांमध्ये जाऊन तेथील कामकाज मराठी भाषेत होत आहे की नाही हे तपाण्यास सांगितले होते. त्यानंतर मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात मनसे कार्यकर्ते बँकांमध्ये जात आहेत.

दरम्यान दोन बँक कर्मचाऱ्यांना मनसे कार्यकर्त्यांना जाब विचारत गोंधळ घातल्याच्या घटना समोर आल्या आहेत. एकीकडे मराठी भाषेवरून मनसे आक्रमक असताना, बँक कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून संरक्षणाची मागणी केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज ठाकरे यांच्या आदेशानंतर मनसेचे कार्यकर्ते मुंबई, ठाणे आणि पुणे येथील राष्ट्रीयीकृत बँक शाखांच्या व्यवस्थापकांशी संवाद साधत आहेत.

मराठीचा वापर व्हावा यासाठी मनसेचे पदाधिकारी बँकेत जाऊन जाब विचारत आहेत. मात्र आता बँक ऑफ महाराष्ट्र ऑफिसर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजीव ताम्हाणे यांनी गुरुवारी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून सुरक्षेचि मागणी केली आहे.

### बँक ऑफ महाराष्ट्र ऑफिसर्स असोसिएशनची मागणी

● बँक कर्मचाऱ्यांना धमकावणाऱ्या आणि हल्ला करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करा.

● स्थानिक पोलिस अधिकारी, जिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकारी यांना बँक कर्मचारी आणि सरकारी मालमत्तेची सुरक्षा सुनिश्चित करण्याचे निर्देश द्या.

● बँक कर्मचाऱ्यांना अशा धमक्यांपासून वाचवण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे निर्देश एमडी, सीईओ, ईडी आणि झोनल मॅनेजरसह बँक व्यवस्थापनाला द्या.

● जर त्वरित कारवाई केली गेली नाही, तर संप आणि इतर कायदेशीर उपाययोजनांसह आमचा निषेध वाढवण्याशिवाय आमच्याकडे पर्याय राहणार नाही.

## एम्स वसतिगृहातून दागिने चोरणाऱ्या महिलेला अटक



**नवी दिल्ली :** अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील (एम्स) वसतिगृहातील खोल्यांमधून दागिने चोरणाऱ्या ४३ वर्षीय महिलेला पोलिसांनी अटक केली आहे. गाझियाबादचा रहिवासी असलेला आणि मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजीमध्ये डिप्लोमा आणि सायन्समध्ये बॅचलर डिग्री घेतलेला आणि एका खासगी हॉस्पिटलमध्ये लॅब असिस्टंट म्हणून काम करणाऱ्या आरोपीला गुरुवारी अटक करण्यात आली. डॉक्टरांचा कोट परिधान केलेल्या या महिलेने ढिसाळ सुरक्षेचा फायदा घेत एम्सवसतिगृहातील दरवाजे उघडले होते.

## कृष्णा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी बैठक बोलवणार



**नवी दिल्ली :** महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश यांच्यातील कृष्णा पाणीवाटपाच्या वादावर एकमत होण्यासाठी केंद्र सरकार लवकरच बैठक बोलवणार असल्याची माहिती कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी शुक्रवारी दिली. कृष्णा पाणी वाटपाच्या वादावर एकमत होण्यासाठी संबंधित राज्य सरकारांसोबत लवकरच बैठक बोलावण्याचे केंद्र सरकारने मान्य केले आहे, असे शिवकुमार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने गुरुवारी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेऊन मेकेदातू आणि अप्पर भद्रा प्रकल्पांना मंजुरी मागितली.

## आंध्र प्रदेश सचिवालयात भीषण आग



**विजयवाडा :** आंध्र प्रदेश सचिवालयाच्या दुसऱ्या ब्लॉकमध्ये शुक्रवारी पहाटे किरकोळ आग लागल्याने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून घटनेच्या वेळी खोलीत किंवा आजूबाजूला कोणीही नव्हते. उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह प्रमुख मंत्र्यांची कार्यालये असलेल्या साऊथ ब्लॉक क्रमांक दोनच्या अखंड ति वीज पुरवठा (यूपीएस) कक्षात सकाळी साडेसहाच्या सुमारास आग लागली. या आगीत यूपीएस रूममधील बॅटरी जळून खाक झाल्या असून आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. तपास सुरू आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

## अरुणाचलने वैद्यकीय क्षेत्रासाठी एआय-संचालित आरोग्य सेवा



**ईटानगर :** अरुणाचल प्रदेशातील राष्ट्रीय आरोग्य अभियानाने (एनएचएम) कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या खासगी संस्थेच्या सहकार्याने ईशान्येकडील राज्यात आरोग्य सेवा पुरविण्यासाठी एक उपक्रम सुरू केला आहे. एनएचएम, अरुणाचल प्रदेश आणि वाधवानी एआय यांच्यातील संबंध राज्याच्या आरोग्य सेवा प्रणालीमध्ये एआय समाकलित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे ते म्हणाले. पहिल्या टप्प्यात पापुमरे, लोंगडिंग, तिराप, नामसाई आणि पश्चिम सियांग या पाच निवडक जिल्ह्यांमध्ये एआय-संचालित सोल्यूशन्स तैनात केले जाणार आहेत.

## नवी मुंबईत मेफेड्रोनसह एकाला अटक

**ठाणे :** १८ लाख ४५ हजार रुपयांच्या अमली पदार्थांसह एका २६ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे. अहमद फारुख मोतलानी याला गुरुवारी ७३.८० ग्रॅम मेफेड्रोनसह अटक करण्यात आल्याची माहिती तळोजा पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी दिली. नूरी नावाचा रिक्षाचालक फरार असून त्याला पकडण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# उपमुख्यमंत्र्यांकडून सत्तेचा पाशवी वापर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भवानीनगर :** उपमुख्यमंत्र्यांकडून राज्यातील सत्तेचा पाशवी वापर सुरू असून, सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असतानाही छत्रपती कारखान्याच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यासाठी दबाव आणला जात असल्याचा आरोप राज्य साखर संघाचे माजी अध्यक्ष व शेतकरी कृती समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांनी केला आहे.

जाचक म्हणाले, छत्रपती कारखान्याच्या निवडणूकीच्या अनुषंगाने कारखान्याचा पोटनियम व सहकार कायद्यानुसार मतदार यादी करावी अशी आमची मागणी होती. मात्र, तीन वेळा सदोष मतदारयादी बनवली गेली. त्यावरून आम्ही उच्च न्यायालयात याचिका दाखल केली, त्यावर सुनावण्या होऊन कारखान्याच्या मतदारयादीसंदर्भात उच्च न्यायालयाने निकाल दिला, हा निकाल गुणवत्तेवर आधारीत नाही हे सर्वांच्याच लक्षात आले आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाविरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली, त्याची पहिली सुनावणी देखील दोन दिवसांपूर्वी झाली, या सुनावणीस छत्रपती कारखान्याचे वकीलही ऑनलाईन उपस्थित होते, सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आमचे म्हणणे ऐकून घेत पुढील सुनावणी पुढील आठवड्यात ठेवली आहे. असाही आतापर्यंत कारखान्याच्या संचालक मंडळाचा पाच वर्षाचा अतिरिक्त कालावधीही संपलेला आहे, अशावेळी आता केवळ आठ ते दहा दिवसांची प्रतिक्षा करायला काही फरक पडत नव्हता. पण सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण पोचले असल्याची माहिती असतानाही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास निवडणूकीचा कार्यक्रम तातडीने जाहीर करण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांकडून दबाव आणला जात आहे छत्रपती कारखान्याची

## पृथ्वीराज जाचक यांचा आरोप

आजची अवस्था होण्यास जे राज्यकर्ते जबाबदार आहेत, त्यांच्याकडूनच राज्यातील सत्तेचा पाशवी वापर करून सर्व आयुधे वापरून या कारखान्याच्या सत्तेसाठी लोकशाहीविरोधी काम केले जात असल्याचा आरोप जाचक यांनी केला. सर्वोच्च न्यायालयालाही जुमानले जात नसल्याने नेमके काय सुरू आहे हे वेगळे सांगण्याची गरज नसल्याचे जाचक यांनी नमूद केले आहे.

सहकारी साखर कारखानदारीला दिशा देणारा कारखाना म्हणून ओळख असणारा श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, गेले २२ वर्ष अव्याहत चालू असलेल्या आर्थिक गैरव्यवहारामुळे जेरीस आला आहे. त्याला जबाबदार केवळ अकुशल नेतृत्वाखाली चाललेली श्री. छत्रपतीची वाटचाल आणि अशाच नेतृत्वात कारखान्याची वाटचाल कायम राहिली पाहिजे, अशी जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारलेल्या नेतृत्वाची कायम इच्छा आहे. कारखाना कार्यक्षेत्रापासून हाकेच्या अंतरावर जोमात वाढत चाललेली खासगी कारखानदारी अन वेगाने होत असलेले त्यांचे विस्तारीकरण ह्या गोष्टी लक्षात घेऊनच खासगी धार्जिणे नेतृत्व आशा चुकीच्या नेतृत्वाला खतपाणी घालत आहे.

सहकारी साखर कारखानदारी अशा मलिदा गँग मधल्या कॉन्ट्रॅक्टरच्या नेतृत्वात द्यायची, ती तोट्यात आणायची अन त्यातून खासगी कारखानदारी जोमात चालवायची भूमिका हे नेतृत्व करत आहे. एकीकडे जाहीर व्यासपीठावर सांगायचं की "मलिदा गँगचा मला त्रास होतोय". अन दुसरीकडे हीच गँग अन त्यातले कॉन्ट्रॅक्टर सहकारी साखर कारखानदारी वर नेमायची भूमिका घ्यायची, ही दुटप्पी मानसिकता या नेतृत्वाची आहे. येणाऱ्या निवडणुकीच्या रणधुमाळीच्या काळात सभासद या दोहोंचा समाचार घेतल्याशिवाय शांत बसणार नाहीत, असा आरोप जाचक यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर केला आहे.

# सभासदांच्या हक्काला हिरावून घेणारे तोंडघशी पडले



येथील श्री छत्रपती सहकारी कारखान्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरूच आहे. या कारखान्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पकड असली, तरी हा कारखाना गेली कित्येक वर्षे आर्थिक संकटाचा सामना करत आहे. कारखान्याच्या परिसरात खासगी कारखान्यांचा विकास होत असताना, छत्रपती मात्र संकटात रुतत चालला आहे. या पार्श्वभूमीवर कारखान्याच्या आजी-माजी संचालकांनी एकमेकांवर आरोप केले आहेत.

श्री छत्रपती कारखान्याच्या २१ हजार १७२ मालकांना त्यांचा हिरावून घेतला जात असलेला हक्क मिळवून देणे हा एक प्रामाणिक प्रयत्न होता, उच्च न्यायालयामध्ये आम्ही गेलो नव्हतो, जे आमच्यावर आरोप करत आहेत, तेच गेले होते आणि तेच तोंडघशी पडले आहेत. आपल्या चुकांचे खापर दुसऱ्यावर फोडण्याची गरज नाही, असे प्रत्युत्तर छत्रपती कारखान्याच्या वतीने अध्यक्ष प्रशांत काटे यांनी दिले.

## प्रशांत काटे यांचे प्रत्युत्तर

छत्रपती साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका करताना सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल असताना, अजित पवार हे सरकारी यंत्रणेचा वापर करत कारखान्याची निवडणूक राज्य निवडणूक प्राधिकरणाला घेण्यासाठी दबाव टाकत आहेत, असा आरोप केला होता. त्या पार्श्वभूमीवर कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत काटे व उपाध्यक्ष अमोल पाटील यांनी या आरोपाला उत्तर दिले.

प्रशांत काटे व अमोल पाटील म्हणाले, छत्रपती कारखान्याची उभारणी करताना या सर्वसामान्य सभासदांनी पोटाला चिमटा घेऊन शेअर्स उभे केले. या कारखान्याचा मालक हा सर्वसामान्य सभासद आहे. त्यालाच या कारखान्याच्या निर्णय प्रक्रियेतून वंचित करणे म्हणजे मोठा अन्याय आहे. आमची पूर्वीपासून भूमिका हीच होती की, अनेक विविध कारणांमुळे या सभासदांना अडचणी आल्या असतील, मात्र त्यांना थेट त्यांच्या हक्कापासूनच वंचित करणे हे योग्य नाही. विरोधकांनी जाणीवपूर्वक या सभासदांना निर्णय प्रक्रियेतून म्हणजे मालक होण्यातून बाजूला करण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला आणि वेळोवेळी ते तोंडघशी पडले.

आता देखील उच्च न्यायालयात त्यांनीच याचिका दाखल केली होती आणि ही याचिका फेटाळली गेली. ती का फेटाळली याचे विस्तृत आत्मचिंतन करण्याऐवजी ते नेतेमंडळींना दोष देत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार हे आमचे लोकनेतृत्व आहेच, शिवाय अजित पवार यांनी सातत्याने कारखान्याला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शक्य असलेले सगळे प्रयत्न व शक्य असलेली सगळी मदत केलेली आहे. त्यांच्याशी सातत्याने जुळवून घेण्याचे प्रयत्न संबंधित विरोधक मंडळी, सातत्याने करतात, तरी देखील त्यांच्यावर आरोप करतात कारखान्याची निवडणूक तोंडावरच असल्याने जे काही आरोप प्रत्यारोप होतील, त्याला योग्य प्रकारे आम्ही उत्तर देऊच,

मात्र चुकीच्या पद्धतीने एखाद्या गोष्टीचे समर्थन करून लोकांमध्ये वेगळा संदेश जाऊ नये, यासाठी खुलासा करणे अत्यंत महत्त्वाचे होते. वास्तविक पाहता आम्ही सभासदांचा मान आणि सन्मान योग्य राखला जाईल, यासाठी न्यायाची अपेक्षा केली आणि योग्य न्याय मिळाला.

मात्र मिळालेला हा न्याय एखाद्याला चुकीचा वाटत असेल तर त्यांनी अजूनही जो शक्य आहेत तो पाठपुरावा करावा, मात्र विनाकारण कोणावर टीका करू नये.

## दुधाची तहान ताकावर

### नारायणगाव आगारासाठी १० नवीन लालपरी मंजूर



**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील नारायणगाव आगारासाठी नवीन २० एसटी बसची मागणी करण्यात आलेली असली तरी नवीन १० एसटी बस देण्यात येणार असल्याने दुधाची तहान ताकावर भागवावी लागणार आहे. नवीन १० एसटी बस पैकी ५ नवीन एसटी बस नारायणगाव डेपोच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. नवीन पाच एसटी बस पैकी तीन एसटी बस नारायणगाव-जुन्नर-पुणे-संगमनेर-पुणे-नारायणगाव तर दोन एसटी बस नारायणगाव-पुणे-नाशिक-पुणे-नारायणगाव असा दररोज अडीच हजार किलोमीटरचा प्रवास पूर्ण करून नारायणगाव डेपोस लाखोचे उत्पन्न मिळवून देणार आहे. आणखी नवीन पाच एसटी बस लवकरच मिळणार असून त्याचे मुंबई वाहतुकीसाठी नियोजन करण्यात येणार असल्याचे आगारप्रमुख वसंत अरगडे यांनी नमूद केले. नारायणगाव बस स्थानकात अर्धे काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम एप्रिल महिना अखेर पूर्ण होणार आहे. काँक्रिटी करणाचे काम पूर्ण झाल्यानंतर नारायणगाव बस स्थानक पूर्ण क्षमतेने वापरात येणार असून काँक्रिटीकरणाच्या कामामुळे प्रवाशांनी सहकार्य करावे अशी विनंती आगर प्रमुखांनी केली आहे. दरम्यान, नारायणगाव बस स्थानकाच्या काँक्रेटी करणाच्या दोन्ही बाजूला गटारीचे बांधकाम करण्यात येत असून त्यावर बंदिस्त जाळी बसवावी अशी विनंती प्रवाशांनी केली आहे. गटार बंदिस्त न केल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल असे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष रोहिदास पवार यांनी स्पष्ट केले आहे.

## पोलिसांसमोर पळाले अन् जाळ्यात अडकले



**शिक्रापूर :** शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस पथक कान्हूर मेसाई भागात गस्त घालत असताना, अचानकपणे दुचाकीवरून एक पोते घेऊन आलेले दोघेजण पोलिसांना पाहून पळाले. मात्र, पोलिसांना संशय आल्याने त्यांची झडती घेतली असता ते चंदनतस्कर असल्याचे समोर आले. पोलिसांनी चंद्रकांत दिलीप गायकवाड, अक्षय दिलीप गायकवाड दोघे या दोघांना चोरीच्या चंदनासह अटक केली. कान्हूर मेसाई येथे शिक्रापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय चौधर, विशाल देशमुख, अमोल रासकर हे गस्त घालत असताना हॉटेल संतोष समोर दुचाकीवर काहीतरी घेऊन आलेले दोघेजण पोलिसांना पाहून हॉटेलच्या पाठीमागे लपले. पोलिसांनी त्यांना पकडून विचारपूस केली असता, त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली, त्यामुळे पोलिसांनी त्यांच्याजवळील गाठोड्यात पाहणी केली असता त्यामध्ये चंदन असल्याचे दिसले. पोलिसांनी त्या दोघांना चंदन व दुचाकीसह ताब्यात घेतले. चंद्रकांत दिलीप गायकवाड, अक्षय दिलीप गायकवाड यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# दूध उत्पादक शेतकरी मेताकुटीला

## कमी दर आणि वाढत्या खर्चाने गणित कोलमडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** शेतीला जोडधंदा म्हणून पुरंदर तालुक्यातील शेतकरी दुधाच्या व्यवसायाकडे वळाला. या दूध धंद्यातून त्याच्या हातात चार पैसे खेळू लागले. त्यामुळे पुढे जाऊन शेतकऱ्यांच्या मुलांनी या जोड धंद्याला मुख्य व्यवसायाचे स्वरूप दिले. मोठ्या प्रमाणात गायी पालन करून डेरी





फार्म चालू केले. मात्र, २०१९ पासून या व्यवसायाला उतरती कळा यायला लागली असून, मागील सात वर्षांमध्ये शेतकऱ्यांचा गोठा आता रिकामा होताना पाहायला मिळतो आहे. दूध दराबाबत शासनाचे असलेले धरसोड धोरण आणि शेतकऱ्यांच्या उत्पादित दुधाला मिळणारा कमी दर व वाढत्या पशुखाद्याच्या किमतीने दूध उत्पादन शेतकरी आता मेटाकुटीला आला आहे. त्यामुळे गोठ्यातील गायींची संख्या आता झपाट्याने कमी होऊ लागली.

दोन वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या दुधाला ३७ ते ४० रुपये भाव मिळत होता. मात्र मागील एक ते दीड वर्षांमध्ये दुधाचे भाव कमी झाले आहेत. दुधाला आता २५ रुपयांपासून ते ३५ रुपयापर्यंत भाव मिळतो. शासनाने दुधाचा हमी भाव ३६ रुपये निश्चित केला असला, तरी खासगी दूध उत्पादक कागदोपत्री दाखवत असलेल्या भावापेक्षा कमी भाव शेतकऱ्यांना देतात. अर्थात त्यासाठी एसएनएफचे कारण पुढे केल जात. मात्र दुधाची फॅट, डिग्री यामध्ये होणारा घोळ शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजला आहे.यावर नियंत्रण ठेवणारी किंवा फॅट डिग्री या मापांवर प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नसतं त्यामुळे शेतकऱ्याच्या दुधाचं मूल्यांकन व्यवस्थित होत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला दिला जाणारा बाजार हा एक उपकार आहे असे डेरी चालक समजत असतात.

जनावरांचा औषध आणि खुराकाचा खर्च वाढला असून, त्याचाही बोजा दूध उत्पादकावर पडत आहे. पशुखाद्याचे वाढलेले दर न परवडणारे ठरत आहेत. सध्या गायीच्या दुधाला २५ ते ३५ रुपये लिटर तर म्हशीच्या दुधाला ५० ते ५५ रुपये प्रतिलिटर भाव दूध डेअरीवर दूध उत्पादक शेतकऱ्यांना मिळतो; परंतु हा दर परवडत नसल्याचे सांगण्यात येते. महिना भरल्यावर दूध उत्पादकाला नियमित तारखेला पगार मिळणे अपेक्षित असते; परंतु तसे होते नाही.

# कमिशन घेऊन कर्ज न दिल्याने एकाची आत्महत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** व्यवसाय उभा करण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये कर्ज मिळवून देतो, असे आमिष दाखवून त्या बदल्यात कमिशन घेऊन कसलेही कर्ज उपलब्ध न झाल्याने रांजणगाव येथील एकाने आत्महत्या केली. आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव संग्राम सातव असे आहे.

रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी याप्रकरणी तीन आरोपींवर गुन्हा दाखल केला असून, दोन जणांना अटक करून ताब्यात घेतल्याचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी सांगितले. याबाबत जनाबाई सातव यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंडस्टोर हाऊसिंग फायनान्स शाखा खराडी या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी संग्राम सातव यांना मॅनेजर उपेंद्र पाटील (रा. थेरगाव पुणे) यांनी पाच कोटी रुपये कर्ज मिळवून देण्याच्या बदल्यात ४० लाख रुपये कमिशन, तसेच विशाल घाटगे याने ५० लाख रुपये कर्ज मिळवून देण्याच्या बदल्यात 5 लाख रुपये कमिशन व मच्छिंद्र पोपट झंजाड (रा. सांगवी सूर्या, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) यानेदेखील कर्ज काढून देण्याचे बदल्यात ३ लाख रुपये कमिशनची मागणी केली.

त्याप्रमाणे संग्राम सातव यांनी राहत्या घरावर कर्ज काढून, तसेच लोकांकडून उसने पेसे घेऊन त्या सर्वांना ठरल्याप्रमाणे कमिशन दिले. परंतु त्यांनी अद्यापपर्यंत कर्ज मंजूर केलेले नाही. त्यांनी फसवणूक केली असल्याचे दिसून आल्याने संग्राम सातव यांनी त्यांना त्याबाबत फोन केला असता ते तीनही लोक त्यांचा फोन न घेता, न भेटता सातव यांना मानसिक त्रास देत होते. अखेर याला कंटाळून संग्राम सातव यांनी आत्महत्या केल्याची फिर्याद जनाबाई सातव यांनी दिली आहे. यातील आरोपी उपेंद्र यशवंत पाटील व मच्छिंद्र पोपट झंजाड यांना पोलिसांनी अटक केली.

# पुरंदरच्या पश्चिम पट्ट्यात पावसाची दमदार हजेरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सासवड व परिसरात गुरुवारी सकाळपासून हवामान अत्यंत गरम होते उन्हाचा तडाखा देखील बसत होता. दुपारी ऊन्हाची तीव्रता जास्तच वाढली. आकाशात मेघ भरून आले. सायंकाळी ४ वाजता अवकाळी पावसाने हजेरी लावली. सासवडसह पवारवाडी, हिवरे, चांबळी, कोडीत, गराडे, दिवे, ताथेवाडी, पिंपळे, नारायणपूर या भागात पावसाने चांगली हजेरी लावली.

या पावसामुळे नारायणपूरला आलेल्या भाविकांची चांगली त्रेधातिरपिट उडाली, तर सासवड येथे भाजीपाला विक्री आलेल्या शेतकरी वर्गाचे चांगलेच हाल झाले. पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला. त्या मुळे वाढत्या उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे.




**सासवड शहरात पावसामुळे वाहतूक कोंडी झाली.** (छायाचित्र - राजेंद्र बर्गे.)

# विमानतळबाधित आक्रमक; शासनाची भूमिका धुडकावली




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** विमानतळ प्रकल्पाबाबत शासनाने यापूर्वी निर्णय झालेला आहे. प्रकल्पामुळे भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांशी शासन सहमत आहे, मात्र प्रकल्प आवश्यक असल्याने पूर्ण करावाच लागेल. तुम्ही तुमच्या अडचणी, भूमिका मांडा मात्र त्या गृहित धरून शासनाची भूमिका पार पाडली जाईल. सर्वेक्षण आणि मोजणी प्रसंगी संबंधित शेतकऱ्यांनी स्वतः उपस्थित राहून आपले क्षेत्र किती आहे हे सांगावे. कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. अशा शब्दात भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली आहे. मात्र, शासनाची भूमिका धुडकावत ग्रामस्थांनी विमानतळ प्रकल्पाला विरोध कायम ठेवला आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, एखतपूर मुंजवडी, खानवडी या सात गावात शासनाने आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची घोषणा करून आता प्रकल्पाचा एक एक टप्पा पूर्ण केला जात आहे. त्या अनुषंगाने गुरुवारी एखतपूर-मुंजवडी गावातील नागरिकांशी भूसंपादन विभागाचे उप जिल्हाधिकारी कल्याण पांढरे यांनी चर्चा केली. गावातील स्थानिक प्रश्नांसाठी ग्रामसभा महत्त्वाच्या मात्र राज्याचा, देशाचा प्रकल्प असेल तर याबाबत शासन स्वतंत्र निर्णय घेते. त्यामुळे तुमच्या आजपर्यंतच्या ग्रामसभांच्या ठरावांना महत्व नाही, असे स्पष्ट केले.

याप्रसंगी पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे, भोर उपविभागीय अधिकारी तानाजी बरडे, नायबतहसीलदार संदीप पाटील, भूमी अधीक्षक स्मिता गौड, कृषी अधिकारी सूरज जाधव, माजी जिप सदस्य दत्ता झुरंगे, एखतपूर च्या सरपंच शितल टिळेकर, उपसरपंच विशाल झुरंगे, महादेव टिळेकर, माणिक निंबळकर, संतोष हगवणे, अमोल टिळेकर तसेच गावातील शेतकरी उपस्थित होते.

### ...मग आता का विचारता ?

शासनाने आमच्या गावात आमच्या परवानगी शिवाय विमानतळ प्रकल्प जाहीर केला. त्यातील एकएक टप्पा पूर्ण केला जात आहे. आता थेट भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरु होत असताना आम्हाला आजपर्यंत काहीच माहिती दिली गेली नाही. त्यामुळे आम्हाला विश्वासात न घेता गृहीत धरून कामे करीत असताल तर आता आमच्याबरोबर चर्चा करायला का आलात ? असा थेट प्रश्न एखतपूर गावच्या सरपंच शीतल टिळेकर यांनी उपस्थित केला.

# आमदाराला हलक्यात घेऊ नका!

## विजय डोळस यांचा एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दमदार इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** वारकऱ्यांनी इथला आमदार केलाय.. खेड तालुक्यातल्या वारकऱ्यांना हलक्यात घेऊ नका! त्यांचे पैसे त्यांना परत द्या आणि पंढरपुरला चांगल्या बसची व्यवस्था करा अन्यथा तालुक्यातील सगळे वारकरी स्थानकात आणुन भजन आंदोलन करू, असा थेट इशारा भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि खेड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष विजय डोळस यांनी राजगुरुनगर एसटी महामंडळाच्या आगार प्रमुख उज्वला कुटे, वाहतुक निरीक्षक एन बी हवालदार यांना दिला.

खेड तालुक्यातील वारकरी प्रत्येक महिन्याला पंढरपूर वारी करतात. त्यासाठी राजगुरुनगर आवारातील बस आरक्षित केली जाते. गेली काही वर्षे ही वारी सुरू आहे. मात्र तीन महिन्यापूर्वी एकादशीला पंढरपूरला जाण्यासाठी वारकऱ्यांना सीएनजी बस देण्यात आली. त्यासाठी किवळे गावचे वारकरी भगवान चौधरी यांनी नेहमीप्रमाणे बस आरक्षित करून प्रवासाला सुरुवात केली. मध्यंतरावर बसमधील सीएनजी संपला. चालकाने राजगुरुनगर आगारात संपर्क साधला. त्यांच्या निर्देशानुसार चालकाने चौधरी यांना साडेआठ हजार रुपयांचा सीएनजी भरायला सांगितले. हे पैसे परत गेल्यावर देऊ असे सांगितले. मात्र, या घटनेला तीन महिने झाले तरी त्याची कोणीच दखल घेतली नाही.

सांगणारे अधिकारी आणि बरोबर असलेला चालक दोघांचीही बदली झाली. त्यानंतर वारकऱ्यांच्या सांगण्यानुसार आमदार बाबाजी काळे यांनी आगारप्रमुखाना संपर्क साधून प्रश्न सोडविण्याचा आग्रह धरला.

अखेर वारकऱ्यांनी भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय डोळस यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. ३) राजगुरुनगर आगार प्रमुख उज्वला कुटे यांचे कार्यालय गाठले. वाहतुक निरीक्षक एन बी हवालदार हेही यावेळी उपस्थित होते.

आगार प्रमुख म्हणुन आपणच हा प्रश्न सोडवला पाहिजे, असे म्हणत डोळस यांनी कुटे यांना धारेवर धरले. चौकशी आणि पैसे मागायला वारंवार आलेल्या वारकऱ्यांशी बेजबाबदार बोलणाऱ्या व वागणाऱ्या हवालदार यांना देखील चांगलेच सुनावले. दर महिन्याला एसटीने पंढरपुर वारी करणारे खंडुशेठ राक्षे व इतर यावेळी उपस्थित होते.

सुरुवातीला टाळाटाळ झाली. मात्र संतप्त वारकरी, त्यांना विजय डोळस यांच्या संघटनेची मिळालेली साथ यामुळे अधिकाऱ्यांनी प्रत्येक महिन्याच्या वारीला एसटीचे एक हजार रुपये कमी करून बस आरक्षितचे आश्वासन दिले. शिवाय तालुक्यातील वारकऱ्यांना बाराही महिने चांगल्या बस देण्यात येतील असे उज्वला कुटे यांनी सांगितले.



राजगुरुनगर आगार प्रमुख उज्वला कुटे यांच्याशी चर्चा करताना विजय डोळस, भगवान चौधरी व इतर.

## वाफगांवचा शुभम पहिल्याच प्रयत्नात दिवाणी न्यायाधीश



**खेड :** वाफगांव (ता. खेड) येथील शुभम विकास कराळे याने पहिल्याच प्रयत्नामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमधून प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश या पदाला गवसणी घातली आहे. न्यायाधीश होणारा शुभम हा वाफगांवमधील पहिला युवक ठरला आहे. सर्व स्तरांतून शुभम याचे अभिनंदन होत आहे. शुभम कराळे याचे प्राथमीक शिक्षण वाफगांव येथे झाले. माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण शिक्रापुर, ता.शिरूर याठिकाणी झालेले असून त्याने कायद्याची पदवी मॉडर्न महाविद्यालय पुणे आणि पदव्युत्तर पदवी सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथून घेतलेली आहे. न्यायाधीश होण्याची जिद्द मनाशी बाळगुन दररोज दहा ते बारा तास अभ्यास करून त्याने हे दैदिप्यमान यश मिळविले. परिक्षा व मुलाखतीसाठी त्याला पुणे येथील प्रख्यात विधीतज्ञ ॲड गणेश शिरसाठ यांचे मार्गदर्शन लाभले. शुभमच्या दोन्ही मोठ्या बहिणी पूनम व पूजा या उच्चशिक्षीत असून आयटी क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. शुभमचे वडील विकास कराळे हे वाफगांवचे माजी सरपंच असून आई वंदना कराळे या पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाच्या (कात्रज डेअरी) माजी संचालिका आहेत.

## राजगुरुनगर परिसराला अवकाळी पावसाचा तडाखा

**खेड :** राजगुरुनगर परिसरात गुरुवारी (दि. ३) सायंकाळी अचानक आलेल्या अवकाळी पावसाने जनजीवन काही काळ विस्कळीत झाले. मेघगर्जनेसह टपोरे थेंब आणि जोरदार पाऊस पडल्याने रस्त्यांवर पाणी साचले, तर शेतकऱ्यांमध्ये उन्हाळी पिकांच्या नुकसानाची भीती निर्माण झाली. गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात ढगाळ वातावरण होते. गुरुवारी सकाळपासूनच आकाशात काळे ढग जमा झाले होते. संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास जोरदार पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे काही ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला, तर रस्त्यांवरील वाहतूकही मंदावली. स्थानिक नागरिकांना या अनपेक्षित पावसामुळे त्रास सहन करावा लागला. शेतकऱ्यांसाठी हा पाऊस चिंतेचा विषय ठरला. उन्हाळी बाजरी, भुईमुग, मका आणि भाजीपाला सध्या शेतात आहेत. या पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. आंब्याला बहर आला असून, त्यावरही विपरित परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## नागरिकांनी मिळकतकराची थकबाकी त्वरीत भरावी



**लोणी-धामणी :** अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव ) येथील ग्रामपंचायतची मिळकत कराची ४२ लाख रुपये थकबाकी, नळ पाणी पट्टी ८ लाख रुपये थकबाकी असे एकूण ५० लाख रूपये थकबाकी असल्याने थकबाकीदारांनी आपली थकबाकी १० एप्रिल पर्यंत जमा करावी अन्यथा नळ कनेक्शन बंद करून थकबाकीदारांची नावे ग्रामपंचायत चौकात फ्लेक्स वर लावण्यात येणार आहेत. त्यामुळे कटूता टाळण्यासाठी मिळकतदारांनी तातडीने आपली थकबाकी भरावी, असे आवाहन सरपंच सारिका हिंगे व ग्रामविकास अधिकारी बीबी मलगे यांनी केले आहे. अवसरी बुद्रुक ग्रामपंचायत हद्दीत १६०० घरांची नोंद आहे, तर २५० बखळ जागा, पोल्ट्री फार्म, महावितरणचे पावर हाऊस, मंगल कार्यालय आहे. या सर्वांची सन २०२४/२५ सालातील ५० लाख रुपये थकबाकी आहे त्यापैकी मार्च महिना थकीत घरपट्टी ४२ लाख रुपये पैकी १८ लाख रुपये जमा झाले आहेत, तर नळ पाणी पट्टी ८ लाख रुपये होते त्यापैकी ४ लाख ५० हजार रुपये जमा झाले आहेत. अद्याप उर्वरित थकबाकी २७ लाख ५० हजार रुपये येणे बाकी असल्याने ग्रामपंचायतीला सुविधा पुरवठा येत नसल्याने, ग्रामपंचायतीने थकबाकीदारांचे नळ कनेक्शन बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच थकबाकीदारांची नावे ग्रामपंचायत चौकात लावण्यात येणार आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी १० एप्रिल पर्यंत थकबाकी तातडीने ग्रामपंचायत कार्यालयात जमा करावी, असे आवाहन उपसरपंच अनिल हिंगे पाटील यांनी केले आहे.

## शेतातील वादातून भावाला मारहाण

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील राऊतवाडी येथे रोहिदास बालवडे यांनी शेतात पाणी दिलेले असल्याने त्यांनी त्यांचा चुलत भाऊ सुदाम यास शेतात पाणी दिलेले आहे तू टँकर भरू नको असे म्हटले होते, त्यांनतर रोहिदास हे शेतात जात असताना सुदाम व त्यांचा मुलगा ऋषिकेश या दोघांनी त्यांना काठीने मारहाण करत गंभीर दुखापत केली, याबाबत रोहिदास सिताराम बालवडे (४२, रा. राऊतवाडी शिक्रापूर ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी सुदाम शिवाजी बालवडे व ऋषिकेश सुदाम बालवडे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# बिले दुरुस्ती कार्यालयात व्हावी

## उपकार्यकारी अभियंता गोरे यांना साकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आळंदी पंचक्रोशीत मोठ्या प्रमाणात वीज बिलांची दुरुस्ती वीज महावितरणच्या कामकाजामुळे करावी लागत आहे. यामुळे आळंदी पंचक्रोशीतील वीज बिलांची दुरुस्ती आळंदी येथील वीज महावितरणचे कार्यालयात कायम स्वरूपी बील दुरुस्तीची व्यवस्था करून गैरसोय दूर करण्याची मागणी आळंदी नगरपरिषद प्रभाग क्रमांक ८ चे शिवसेना शाखा प्रमुख रोहिदास कदम यांनी केली आहे.

या संदर्भात आळंदी शहर शिवसेनेचे शाखा प्रमुख रोहिदास कदम यांनी चाकण येथील वीज महावितरण कार्यालय चाकणचे उपकार्यकारी अभियंता राजेंद्र गोरे यांना निवेदन दिले. उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर घुंडरे पाटील, अर्जुन मेदनकर, कैलास पाचुंदे आदी उपस्थित होते. कदम म्हणाले, आळंदी येथील कार्यालयात या पूर्वी वीज बिल दुरुस्ती होत होती. सध्या वीज बिल दुरुस्तीसाठी चाकण कार्यालयात वीज ग्राहकांना पाठविले जाते. यामुळे त्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो आणि त्यांची गैरसोय होते. पूर्वी प्रमाणे आळंदी येथील वीज वितरण कार्यालयात वीज बिल दुरुस्ती होण्याचे संबंधित यांना सूचना करण्याची मागणी केलीआहे.

आळंदी येथील वीज महावितरण कार्यालयात वीज बिल दुरुस्तीचे कामकाजास येत असलेले अधिकारी, कर्मचारी यांचे कामकाज बाबत परिसरात जनजागृती वीज महावितरण कार्यालयाने करावी. आळंदी शहरात वीज मीटरचे रीडिंग नियमित होत नाही. अंदाजे वीज वापराचे बिल देऊन अंदाजे बिले दिली जातात. यामुळे मीटर प्रमाणे दर महा रीडिंग घेतले जाणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे वीज बिल मीटर रीडिंग संबंधित कर्मचारी यांना सूचना



### वीज ग्राहकांची गैरसोय

● आळंदी परिसरात वीज बिले देखील नियमित तात्काळ वीज ग्राहकांना मिळत नाहीत. वीज ग्राहकांना बिले नियमित वेळेत भरण्यास मिळाल्यास ग्राहकांना वीज सवलतीचा फायदा होईल. मात्र वेळेत बिले मिळत नसल्याने सवलत मिळत नाही. तसेच बिले विलंबाने वाटप होत असल्याने बिल मिळाल्यावर बिलाची आर्थिक तरतूद करून भरण्यास किमान अवधी मिळत नाही. यामुळे वीज ग्राहकांना वीज विलंब आकार द्यावा लागतो. वीज ग्राहकांना वीज बिल भरणा सवलत मिळण्यासाठी वेळेत बिले देण्याची मागणी कदम यांनी वीज ग्राहकांचे वतीने केली आहे.

### आळंदीतच वीज बिले दुरुस्ती करणार

● या संदर्भात उपकार्यकारी अभियंता राजेंद्र गोरे म्हणाले, या पुढील काळात वीज ग्राहकांना नियमित वेळेवर वीज बिले मिळतील. तसेच वीज पुरवठा मीटर प्रमाणे रीडिंग घेण्यासाठी नियमित रीडिंग घेण्यासाठी संबंधित यांना कळविले जाईल. या पूर्वी आळंदीत वीज बिले दुरुस्ती केली जात होती. मात्र संबंधित कर्मचारी यांना वीज ग्राहक इतर प्रश्न विचारणा करीत काम नसताना त्या बाबत माहिती देण्यासाठी वेळ जात होता. मात्र आता या पुढील काळात निश्चित ठराविक वार आणि वेळ देऊन आळंदीतच वीज बिल दुरुस्तीसाठी कामकाज सुरु केले जाईल अशी ग्वाही गोरे यांनी दिली.

## महात्मा गांधी विद्यालयाचे परिक्षेत घवघवीत यश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** सन २०२४- २५ मध्ये झालेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना परीक्षामध्ये महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण ६१ विद्यार्थी शिष्यवृत्ती करिता पात्र ठरले आहेत. यामध्ये १४ विद्यार्थी एनएमएमएस शिष्यवृत्ती करिता पात्र ठरले, तर ४७ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्ती करिता पात्र ठरले आहेत. एनएमएमएस पात्र विद्यार्थ्यांना केंद्र सरकारकडून एकूण ४८ हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती दिली जाते. तर सारथी पात्र विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाकडून एकूण ४० हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यालयातून परीक्षेस एकूण १३० विद्यार्थी बसले होते, त्यातील ६८ उत्तीर्ण झाले, तर ५२.३० टक्के निकाल लागला. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी पुढील प्रमाणे टाकळकर साई संजय, सूर्यवंशी सत्यम बाळासाहेब , शेलार सौम्या सतीश, चासकर आदिती अमोल, शिंदे नेहा जयसिंग, गोरे श्रावणी संतोष, टाकळकर श्रावणी गोरक्षनाथ, रणपिसे श्रेयश हनुमंत, राऊत दिव्या कमलेश, मेमाने स्नेहल गोविंद, पोटकुले अनुष्का निलेश, पालवे प्रतीक्षा परमेश्वर, थिगळे आर्या प्रकाश, गांजाळे ईश्वरी श्रीकांत.

एनएमएमएस विभागाकरिता विभाग प्रमुख म्हणून दिगंबर ऐवळे व वर्षा भोसले यांनी काम पाहिले. विद्यार्थ्यांना शिवराया पादी, निर्मला म्हसुडगे, वर्षा भोसले, अरुणा सांडभोर, प्रियांका गायकवाड, काव्या मुळूक, दिगंबर ऐवळे, कांचन शेलार, रेश्मा आदक या अध्यापकांनी मार्गदर्शन केले. खेड तालुका एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर, उपाध्यक्ष अजित लुणावत, सचिव गणेश जोशी, सर्व संस्था पदाधिकारी तसेच मुख्याध्यापक संध्या कांबळे, उपमुख्याध्यापक दशरथ पिलगर, पर्यवेक्षक रेखा जाधव, अस्मिता पाठक, बाळासाहेब गाडेकर, सोपान निसरड व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

## शहर उपजीविका कृती आराखडा बैठक उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** येथील आळंदी नगरपरिषदअंतर्गत दीनदयाळ जन आजीविका योजनेअंतर्गत आळंदी शहर उपजीविका कृती आराखडा समितीची बैठक मुख्याधिकारी यांचे कक्षामध्ये उत्साहात पार पडली.

राज्य शासनाचे मार्गदर्शक सूचना प्रमाणे दीनदयाळ जन आजीविका योजना राबविण्याचे शासन स्तरावर ठरविलेले आहे. या योजनेसाठी शहर उपजीविका कृती आराखडा तयार करण्यासाठी विविध शासकीय विभागासोबत बैठक नगरपरिषदेत घेतली. यामध्ये दीनदयाळ जन आजीविका योजनेचा शहर उपजीविका कृती आराखड्याबाबत सविस्तर सुसंवाद साधून माहिती देण्यात आली. या बैठकीत आळंदी शहरातील बांधकाम कामगार, केटरिंग कामगार, वाहतूक कामगार, स्वच्छता क्षेत्रात काम करणारे कामगार, केअर वर्कर, घरगुती काम करणारे आदी असंघटीत कामगार विषयी तसेच रोजगार व स्वयंरोजगार उपलब्धीसाठी काय उपाय योजना करता येतील, यावर प्राथमिक चर्चा झाली. शहरातील विकासापासून वंचित असलेल्या घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी काय करता येऊ शकते, याविषयी आपले विचार उपस्थितांनी व्यक्त केले. या बैठकीस नगरपरिषदेचे कार्यालयीन अधिक्षक श्रीमती अर्चना भिसे, सा. प्रकल्प अधिकारी वैशाली पाटील, समुदाय संघटक अर्जुन घोडे, एमआयटी कॉलेजच्या अर्चना आहेर, एमआयडीसी प्रतिनिधी के. जी. पवार, अर्जुन मेदनकर, सुवर्णा काळे, सोनाली रत्नपारखी, पथविक्रेता समिती सदस्य संतोष सोनावणे, तुषार नेटके, महेश जाधव, काजल धोंडगे तसेच आळंदी नगरपरिषदेचे सर्व विभाग प्रमुख, इतर कार्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीचे प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी वैशाली पाटील यांनी कृती आराखड्याची माहिती देत केले. बैठक यशस्वीतेसाठी समुदाय संघटक अर्जुन घोडे यांनी परिश्रम घेतले.



आळंदी नगरपरिषदअंतर्गत दीनदयाळ जन आजीविका योजनेअंतर्गत आळंदी शहर उपजीविका कृती आराखडा समितीची बैठक मुख्याधिकारी यांचे कक्षामध्ये उत्साहात पार पडली.

# खेड तालुक्यातून शासनाला २८४ कोटी ८३ लाख रुपयांचा महसूल




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुक्यातील चाकण एमआयडीसी, सेझ परिसरात वाढते औद्योगिकीकरण आणि त्याद्वारे राजगुरुनगर, चाकण व आळंदी या परिसरात विकसित होणाऱ्या शहरीकरणामुळे जमीन खरेदी आणि बंगलो, फ्लॅट खरेदी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. याद्वारे खेड तालुक्यात खरेदी विक्री व्यवहार मोठ्या प्रमाणात होत असून, १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या आर्थिक वर्षभरात तालुक्यातील तीन दुय्यम निबंधक कार्यालयातुन एकुण ४० हजार ८३४ दस्तनोंदणी केले आहेत. त्यातून शासनाला मुद्रांक शुल्कापोटी २८४ कोटी ८३ लाखांचा महसुल मिळाला आहे, तर ३१ कोटी रुपये नोंदणी फी रुपाने जमा झाल्याची माहिती दुय्यम निबधंक एस. आर. परदेशी यांनी दिली.



खेड तालुक्यात तीन दुय्यम निबंधक कार्यालये आहेत. राजगुरुनगर येथील तहसीलदार कार्यालयाच्या परीसरातील दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक १ मध्ये १० हजार ४२३ दस्त नोंदणी झाली. त्यात ४२ कोटी ८६ लाखांचा मुद्रांक शुल्क तर ९ कोटी ८९ लाख रुपये नोंदणी फी जमा झाल्याची माहिती दुय्यम निबंधक वंदना पोळ यांनी दिली.

चाकण दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक २ मध्ये आर्थिक वर्षात सर्वाधिक म्हणजे १८ हजार ४११ दस्त नोंदणी झाली. याद्वारे १५० कोटी ४२ लाख मुंद्राक शुल्कापोटी तर १३ कोटी ४७ लाख नोंदणी फी पोटी जमा झाल्याची माहिती दुय्यम निबंधक तेजदेव काटे यांनी दिली.

राजगुरुनगर येथील पुणे नाशिक महामार्गावर केंद्रीय कांदा संशोधन केंद्रा समोर सांळुखे हॉस्पिटल इमारतीमधील दुय्यम कार्यालय क्रमाक ३ मध्ये या गत आर्थिक वर्षात १२ हजार दस्त नोंदणी झाली. त्यामधून ९१ कोटी ५५ लाख रुपये मुंद्राक शुल्क मिळाले. तर ७ कोटी ५९ लाख रुपये नोंदणी फी पोटी जमा झाल्याची माहिती दुय्यम निबंधक सुनिल परदेशी यांनी दिली.



# शेफ व्हायचंय?

मित्रमैत्रिणींनो, तुम्ही रेस्टॉरंट्स, कॅफेमध्ये जेवायला जाता. तिथे छान छान पदार्थ मिळतात. या पदार्थांवर आकर्षक सजावट केलेली असते. कधी नेहमीच्याच पदार्थांना ट्विस्ट दिला जातो. हे सगळं शेफच्या मार्गदर्शनाखाली होत असतं. रेस्टॉरंट्समधल्या किचनचा सगळा ताबा शेफकडे असतो. मोठमोठ्या हॉटेल्समध्ये शेफना खूप मान असतो. हे कौशल्य विकसित करण्यासाठी तुम्ही कलनरी आर्टसशी संबंधित अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता.

स्वयंपाकाची आवड असणाऱ्यांना हे क्षेत्र खुणावतं. शेफ बनण्यासाठी तुमच्यात प्रयोगशीलता, कल्पकता असायला हवी. काहीतरी नवं करून बघण्याची, नवं शिकत राहण्याची तयारी असायला हवी. भारतासह जगभरातल्या खाद्यपदार्थांचं, स्वयंपाकाच्या पद्धतींचं ज्ञान मिळवणं गरजेचं आहे. लोकांच्या आवडीनिवडींनुसार चविष्ट पदार्थ बनवण्याचं तंत्र तुम्ही अवगत करून घ्यायला हवं. यासोबतच संवादकौशल्य, संशोधनाची तयारी, व्यवस्थापनकौशल्य या बाबीही महत्त्वाच्या आहेत.

## कोण होणार?

कोणत्याही शाखेतले विद्यार्थी कलनरी आर्टसकडे वळू शकतात. बारावीनंतर 'क्विजीन टेक्नॉलॉजी', 'हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी' किंवा 'हॉटेल मॅनेजमेंट' या विषयांमध्ये पदवी मिळवता येईल. यासोबत 'शेफ मॅनेजमेंट' या विषयात डिप्लोमा किंवा सर्टिफिकेट कोर्स करता येईल. पुरेशा अनुभवानंतर एक्झिक्युटिव्ह शेफ, सॉस शेफ, एक्सपिडिटर, कुक, कुक असिस्टंट म्हणून काम करू शकता. यासोबतच खाद्यपदार्थांशी संबंधित विविध कंपन्यांमध्येही संधी उपलब्ध असतात.



# उन्हाळ्यातला पेहराव

मुलांनो, आता उन्हाळा सुरू झाला आहे. तेव्हा या काळातील कपडे निवडताना काळजी घ्या. या उष्ण वातावरणात हलके आणि त्वचा श्वास घेऊ शकेल असे कपडे घालणे गरजेचे आहे. सूती किंवा लिनन कापड वापरले तर त्वचेला आराम दायक असते आणि ते घामही शोषून घेतात. म्हणूनच असे कपडे वापरा. कपड्यांचा रंग हलका असावा, कारण गडद रंग सूर्यप्रकाशात जास्त उष्णता शोषून घेतात. शर्ट आणि पँट्स किंवा शॉर्ट्स घालणे योग्य ठरेल. अशा कपड्यांमध्ये तुम्हाला आराम मिळेल. त्याचप्रमाणे बाहेर पडताना सनग्लासेस, हॅट किंवा कॅप वापरणेही गरजेचे आहे कारण या गोष्टी सूर्याच्या तीव्रतेपासून संरक्षण करतात.

## हे आहे गरजेचे

## ठिपके जुळवा



# एकसारखं टेन्शन येतंय?



छोट्या मित्रांनो, तुम्हाला कधीकधी ताणतणाव जाणवतो का? भीती वाटते का? असे होत असेल तर वेळीच आई-बाबांना सांगा कारण फार काळ या अवस्थेत राहिल्यास वाईट परिणाम बघायला मिळतात.

ताणतणावाच्या अवस्थेत शरीरात अचानक अ‍ॅड्रेनालाईन किंवा कॉर्टिसोल सारख्या ताण संप्रेरकांचा पूर येतो. परिणामी हृदयाचे ठोके वाढतात. रक्तदाब देखील वाढतो. म्हणजेच ताणतणाव केवळ हृदयावर आणि मनावरच नाही तर संपूर्ण शरीरावर परिणाम करतो. मात्र ताण उत्पन्न होण्याची परिस्थिती निवळल्यास तुम्हाला परत सामान्य वाटते. आधीसारखे बरे वाटू लागते. म्हणजेच आपले शरीर कमी प्रमाणात ताण सहन करण्यास तयार असते. परंतु ताण दीर्घकाळ किंवा दीर्घकालीन होतो तेव्हा मात्र वाईट परिणाम देणारा ठरतो, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

## असं का होतं?

याचे आपल्या शरीरावर अनेक वाईट परिणाम दिसू शकतात. जसे की, पोटात काहीतरी जाणवते. एक विचित्र अस्वस्थता किंवा वेदना जाणवू शकतात. तीव्र ताण बराच काळ राहिला तर हृदयाच्या धमन्यांमध्ये जळजळ देखील होऊ शकते. छाती भरुन आल्यासारखी वाटते. तणावाचा सामना करताना कोलेस्टेरॉलच्या पातळीवरही परिणाम होतो. म्हणूनच फार काळ तणावात राहू नका. तो टाळण्यासाठी कामाचे चांगले व्यवस्थापन करा. भरपूर मित्र बनवा आणि एकमेकांशी जोडलेले रहा. दररोज व्यायाम करायला विसरू नका. दररोज रात्री चांगली झोप घ्या. या सगळ्यामुळे तुम्ही फ्रेश आणि तणावमुक्त राहू शकाल.

## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) 'नोकिया' ही कोणत्या देशातली कंपनी आहे?
२) सूर्यमालेतला हिरवा ग्रह कोणता?
३) बुकर पुरस्कार मिळवणारी भारतातली पहिली महिला लेखिका कोण?
४) भारतीयांनी विकसित केलेला पहिला सुपर कॉम्प्युटर कोणता?
५) क्युबा या देशाचं चलन कोणतं?
६) 'उगवत्या सूर्याचा देश' असं कोणाला म्हटलं जातं?
७) पाण्याचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांना काय म्हणतात?
८) आयसीआरएचं पूर्णरुप काय?
९) जगातला सर्वात मोठा पक्षी कोणता?
१०) भारतातला सर्वात लहान केंद्रशासित प्रदेश कोणता?


उत्तरं : १) फिनलंड २) युरेनस ३) अरुंधती रॉय ४) परम ८००० ५) पेसो ६) जपान ७) हायड्रॉलॉजिस्ट ८) इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च ९) शहामृग १०) लक्षद्वीप

# तिखटपणा मोजायचाय?

तिखट, मसालेदार पदार्थांमध्ये आई मिरचीचा वापर करत असल्याचे तुम्ही बघत असाल. पण मिरचीचा तिखटपणा केवळ चवीनुसारच नाही तर एका वैज्ञानिक प्रमाणानुसार मोजला जातो हे तुम्हाला माहिती आहे का? चला तर मग, आज या 'स्कोव्हिल स्केल' बाबत जाणून घेऊ या.

हे स्केल एका युनिटमध्ये मिरचीचा तिखटपणा मोजते आणि मिरचीमध्ये कॅप्सेसिन नावाचा घटक किती असतो हे सांगते कारण या घटकाचमुळेच आपले तोंड पोळते. थोडक्यात स्कोव्हिल स्केल हे वैज्ञानिक स्केल मसालेदार अन्नाचा तिखटपणा मोजण्यासाठी वापरला जाते.

हे अमेरिकन फार्मासिस्ट विल्बर स्कोव्हिल यांनी १९१२ मध्ये विकसित केले. मिरचीचा तिखटपणा मोजण्यासाठी स्कोव्हिल ऑर्गनोलेप्टिक चाचणी केली जाते. यामध्ये, मिरचीचा अर्क पाण्यात मिसळला जातो आणि नंतर पॅनेलमध्ये बसलेली एक टीम किती प्रमाणात पाणी घालावे याची चाचणी करते




जेणेकरून त्या मिरचीचा तिखटपणा जाणवू नये. जितके जास्त पाणी लागेल तितकी मिरची तिखट समजली जाते.

आता काही प्रसिद्ध मिरच्यांचे स्कोव्हिल रेटिंग जाणून घेऊ या.

## माहिती असावे

* **बेल पेपर** – ही सर्वात सौम्य मिरची आहे आणि त्यात तिखटपणा अजिबात नाही.
* **जलापेनो** – ३,५००–८,००० एसएचयू (स्कोव्हिल हीट युनिट्स)
  ही मिरची भारतीय जेवणातही खूप लोकप्रिय आहे आणि तिचा तिखटपणा मध्यम असतो.
* हबानेरो – १००,०००–३५०,००० एसएचयू
  ही मिरची खूप तिखट असते आणि ती खाणे खूप आव्हानात्मक असू शकते.
* **कॅरोलिना रीपर** – १,४००,०००–२,२००,००० एसएचयू
  ही जगातील सर्वात तिखट मिरची मानली जाते.
* **पेपर एक्स** – ३,१८०,००० एसएचयू
  पेपर एक्स ही आतापर्यंतची सर्वात तिखट मिरची असल्याचे म्हटले जाते आणि तिखटपणाबद्दल गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये तिची नोंद झाली आहे.



# असा असतो चतुर



मित्रांनो, तुम्ही चतुर नावाच्या कीटकासोबत कधी खेळला आहात का? काही मुले त्याच्या शेपटीला दोरा बांधून अघोरी खेळही खेळतात. हे अगदी चुकीचे आहे. पण तुम्हाला या कीटकाबद्दल माहिती आहे का? नसेल तर हे नक्की वाचा.

मित्रांनो, चतुरला इंग्रजीत ड्रॅगन फ्लाय आणि हिंदीत व्याधपतंग असे म्हणतात. जगभरात त्याच्या हजारो जाती आहेत. बर्फाळ प्रदेश सोडला तर उष्ण आणि दाट प्रदेशात चतुरांचा वावर आढळतो. त्याचे शरीर तीन भागांमध्ये बनलेले असते. पहिल्या भागात दोन पाय असतात. पायांचा उपयोग आधार घेण्यासाठी तसेच धरून बसण्यासाठी होतो. चालण्यासाठी मात्र पायांचा उपयोग होत नाही. या कीटकाचा प्रत्येक पंख स्वतंत्रपणे हलू शकत असल्यामुळे उडण्याची क्षमता प्रचंड असते. म्हणजेच चतुर ५० ते ६० किमी. वेगाने उडू शकतो. तो जोरदार वाऱ्याचा सामनाही सहजपणे करु शकतो. तो हवेत घिरट्या घालू शकतो तसेच एकाच जागी बराच काळ उडतही राहू शकतो.

चतुराच्या संरचनेवर आधारितच विमान तयार करण्याचे तंत्र वैज्ञानिकांनी विकसित केले, असे काहीजण मानतात.

चतुर दिसायला अगदी सुंदर असतात. त्याचे डोळेही सुंदर असतात. डोळ्यांचे नीट निरीक्षण केले असता छोट्या-छोट्या आकारात हजारो लेन्सेस दिसतात. म्हणून त्याची नजर 'क्लीअरकट व्हिजन' असल्याचे आपण म्हणतो. चतुरांना डोकं कसंही, कुठेही वळवता येतं. त्यामुळे हव्या त्या कोनातून ते पाहू शकतात. चतुराला ३६० अंश कोनात दिसतं.

## भवताल

चतुरांचं आयुष्यही एक गूढ प्रवास आहे. मादी आपली अंडी बहुधा तळ्याच्या किंवा डबक्याच्या काठावर तसेच चिखलात घालते. काही जातीत अंडी घालताना नर आणि मादी एकत्र उडतात. एकावेळेस मादी शेकडो ते हजारो अंडी घालते. काही आठवड्यात अंड्यांमधून अळ्या बाहेर पडतात. या अळ्या पूर्णपणे पाण्याखालीच जगतात. त्या कधी कधी दोन-तीन वर्षांपर्यंत पाण्यातच वावरतात पण पाण्यातून बाहेर पडताच अवघे सहा-सात महिनेच ते जगतात. जलचर छोटे किडे आणि मासे हे या अळ्यांचे भोजन असते.

# शेअर करा गुगल सर्च




मुलांनो, गुगल हे जगातलं सर्वात लोकप्रिय सर्च इंजिन आहे. इंटरनेट सर्फिंगसाठी तुम्ही गुगल क्रोमचा वापर करता. त्यावरचे सर्च रिझल्ट्स आपल्याला शेअर करायचे असतात. यासाठी यूआरएल कॉपी करून पेस्ट करण्याचा एक पर्याय आहे. यासोबत 'लेट मी गुगल दॅट फॉर यू' हा ऑप्शनही निवडला जातो. मात्र आता गुगलवरचे सर्च रिझल्ट्स थेट शेअर करता येणार आहेत. यासाठी गुगलने शेअर बटण उपलब्ध करून दिलं आहे. यामुळे अभ्यासाशी किंवा प्रोजेक्टशी संबंधित सर्च रिझल्ट्स झटपट शेअर करता येतील.

## स्मार्ट टॉक

गुगल सर्च शेअर करण्यासाठी सर्वात आधी स्मार्टफोनमधलं गुगल अ‍ॅप ओपन करा. आता सर्च बारमध्ये जाऊन तुम्हाला हव्या असणाऱ्या माहितीसाठी सर्च द्या. यानंतर सर्च बारच्या उजव्या बाजूच्या शेअर आयकॉनवर टॅप करा. इथे रिझल्ट्स शेअर करण्याचे विविध पर्याय दिसतील. त्यापैकी एका पर्यायाची निवड करून तुमचे सर्च शेअर करता येतील. हा शेअरचा ऑप्शन सध्या फक्त अँड्रॉइडच्या बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे.

शेअर आयकॉनवर टॅप केल्यानंतर गुगल सर्च रिझल्ट्स शेअर करण्यासाठी एक लिंक उपलब्ध करून दिली जाईल. त्यात कॉपी फॉर क्लिपबोर्ड तसंच जीमेल, फेसबुक किंवा ड्रॉपबॉक्सच्या माध्यमातून शेअर करण्याचे पर्याय दिसतील. यापैकी एका पर्यायाची निवड तुम्ही करू शकता.

## धोका ओळखा

### अशी घ्या काळजी


उन्हाळ्यात फिरताना काही धोके होऊ शकतात. त्यापासून बचाव करण्यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवा जसे की, कडक उन्हात फिरल्याने अंग जळजळते. सूर्याच्या तीव्र किरणांमुळे जळजळ होऊ शकते.

त्यामुळे घराबाहेर पडताना सनस्क्रीन लावणे आणि शक्यतो छत्री घेणे आवश्यक आहे. उन्हात फिरताना थकवा, मळमळ आणि गोंधळलेपण जाणवले तर थोडा वेळ विश्रांती घ्या. गारव्याला झाडाच्या सावलीखाली बसा. या काळात कीटकदंशापासून दूर राहण्यासाठी कीटकदंश प्रतिबंधक क्रीम किंवा स्प्रेचा अवश्य वापर करा.



## माहिती आहे?

### असा तयार होतो माठ



उन्हाळ्यात आपण मातीच्या माठातील थंडगार पाणी पितो आणि तहान भागवतो. पण माठ तयार करण्याची प्रक्रिया तुम्ही जाणता का? मुलांनो, माठ तयार करण्यासाठी सर्वप्रथम गुळगुळीत आणि चिकट माती निवडली जाते. ती मऊ करण्यासाठी पाणी मिसळले जाते. नंतर चाकावर माती ठेवून हाताने किंवा साधनांचा वापर करून माठाचा आकार दिला जातो. माठाचा डोक्याचा भाग मोठा असतो. सजावटीसाठी त्यावर वेगवेगळे डिझाईन्स केली जातात. तयार झालेला माठाला थोडा वेळ उन्हात सुकवतात. नंतर त्यावर रंगकाम केले जाते. त्यामुळे तो सुंदर आणि टिकाऊ होतो.

## लक्षात घ्या

### नको टीव्हीचा अतिरेक



टीव्ही जास्त पाहण्याचे काही तोटे आहेत. जसे की, टीव्ही जास्त पाहिल्याने शरिराची क्रियाशीलता कमी होऊ शकते. त्यामुळे वजन वाढणे आणि शरीर कमजोर होते. टीव्ही खूप वेळ पाहिल्याने डोळ्यांना ताण पडत असल्यामुळे डोळे दुखणे, चुरचुर, आणि दृष्टी कमी होणे हे त्रास संभवतात. सतत टीव्ही पाहण्यामुळे मानसिक विकासावरही परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर बाहेर खेळायला किंवा अभ्यास करण्यास वेळ मिळत नाही. मुख्य म्हणजे टीव्ही जास्त पाहण्यामुळे आपली सर्जनशीलता आणि शिकण्याची आवड कमी होऊ शकते. म्हणूनच सुट्टीच्या काळात टीव्ही कमी बघा आणि भरपूर खेळा.







# हैदराबादचा सर्वात मोठा पराभव

## केकेआरने मिळवला दणदणीत विजय; हेड-अभिषेक-क्लासेन सगळे फेल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** कोलकाता नाईट रायडर्स संघाने ईडन गार्डन्सच्या मैदानावर पुन्हा एकदा सनरायझर्स हैदराबादला पराभवाचा मोठा धक्का दिला आहे. हैदराबादला केकेआरने ८० धावांनी सर्वात मोठा विजय मिळवला आहे. हैदराबादचा आयपीएल इतिहासातील हा सर्वात मोठा पराभव आहे. इतक्या मोठ्या धावसंख्येच्या फरकाने पहिल्यांदाच पराभूत झाला आहे. केकेआरने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघ अवघ्या १२० धावांवर १६.४ षटकांत सर्वबाद झाला.



कोलकाताचा चार सामन्यांमध्ये हा दुसरा विजय आहे. तर हैदराबादने सलग तिसरा सामना गमावत पराभवाची हॅटट्रिक साधली आहे. पुन्हा एकदा केकेआरने हैदराबादच्या सलामीवीरांना माघारी धाडलं आणि संघाच्या विजयाचा पाया रचला. हैदराबादची टॉप ऑर्डर कोसळल्यानंतर संघ पुन्हा सावरू शकला नाही आणि परिणामी त्यांना मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं.

केकेआरने दिलेल्या २०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघाची सुरूवात इतकी खराब झाली की संघ शेवटपर्यंत या धक्क्यांमधून सावरू शकला नाही. केकेआरकडून इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेल्या वैभव अरोराने पहिल्याच षटकात कहर केला. त्याच्या पहिल्या चेंडूवर हेडने चौकार मारला आणि पुढच्याच चेंडूवर त्याला झेलबाद करवत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. यानंतर हर्षित राणाने अभिषेक शर्माला २ धावांवर असताना झेलबाद केलं. तर इशान किशनही झेलबाद झाला.

नितीश कुमारने पुन्हा एकदा निराश केलं आणि तो १९ धावा करत बाद झाला. तर कामिंदु मेंडिस २७ धावा, हेनरिक क्लासेनने ३३ धावांची सर्वात मोठी खेळी केली पण तो संघाला शेवटपर्यंत थांबत विजयापर्यंत नेऊ शकला नाही. तर पॅट कमिन्स १४ धावा करत बाद झाला. केकेआरच्या गोलंदाजांनी हैदराबादच्या फलंदाजीवर आळा घातला. वैभव अरोरा आणि वरूण चक्रवर्ती यांनी ३-३ विकेट घेतले. तर आंद्र रसेलने २ विकेट तर हर्षित राणा आणि सुनील नरेनने १ विकेट घेतली.

तत्पूर्वी नाणेफेक गमावत केकेआरचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. केकेआरची सुरूवातही खराब झाली होती. क्विंटन डि कॉक आणि सुनील नरेन स्वस्तात बाद झाले होते. पण अजिंक्य रहाणे आणि अंगक्रिश रघुवंशी यांच्या भागीदारीने संघाचा डाव सावरला. अंजिक्य रहाणेने २७ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ३८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तर अंगक्रिश रघुवंशीने ३२ चेंडूत ५ चौकार आणि २ षटकारांसह ५० धावांची खेळी केली.

## स्पोर्ट्स मॅनियाचा शेवट गोड; एआयएफएफ सब- ज्युनियर लीग



**पुणे :** स्पोर्ट्स मॅनिया मैदानावर एआयएफएफ सब-ज्युनियर लीग २०२४-२५ च्या शेवटच्या गटवार सामन्यात गुरुवारी स्पोर्ट्स मॅनियाने एसएसई बीएफसी सॉकर स्कूल्स, मुंबईविरुद्ध ३-० असा सर्वोत्तम विजय मिळवला. शेवटच्या सामन्यात विजयाची आवश्यकता असतानाच गटातील आणखी एक संघ असलेल्या डिसूझा एफए टीम विजयापासून वंचित राहिली तरच स्पोर्ट्स मॅनियाला गटात दुसऱ्या स्थानासह बाद फेरी गाठण्याची संधी होती. स्पोर्ट्स मॅनियाने त्यांचे ध्येय पूर्ण केले. हितांश खत्रीचे (३' आणि ११') दोन गोल आणि कार्तिक जोशीच्या (६२') एका गोलसह त्यांनी ३-० असा सफाईदार विजय मिळवला. या विजयामुळे स्पोर्ट्स मॅनियाने डेसूझा एफ.ए. (१९ गुण) पेक्षा २० गुण (१० सामने) पुढे राहिले. मुंबई सिटी (२६ गुण) गटात अव्वल स्थानावर होती. दुसऱ्या सामन्यात मुंबई सिटी आणि डिसूझा एफए यांच्यातील सामना १-१ असा बरोबरीत सुटला. त्यामुळे त्यांना प्रत्येकी एका गुणावर समाधान मानावे लागले. स्पोर्ट्स मॅनियाने दुसरे स्थान मिळवून प्ले-ऑफ फेरीमध्ये दिमाखात स्थान मिळवले आहे. पात्रता फेरीत त्यांची गाठ एफसी मंगलोर आणि चेन्नईयिन एफसीशी पडेल.

## मोहसीन बनले आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांना आशियाई क्रिकेट परिषदेचे नवे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. नक्वी हे श्रीलंका क्रिकेटचे अध्यक्ष शम्मी सिल्वा यांची जागा घेतील. नक्वी हे २ वर्षांसाठी या पदावर राहतील. गुरुवारी एसीसीची ऑनलाइन वार्षिक बैठक झाली. त्यानंतर नेतृत्व बदलाची घोषणा करण्यात आली. यावर्षी, टी-२० आशिया कप देखील सप्टेंबरमध्ये होणार आहे.

गुरुवारी झालेल्या बैठकीनंतर एसीसीने अधिकृत निवेदन प्रसिद्ध केले, ज्यामध्ये म्हटले आहे की, श्रीलंकेला हरवून पाकिस्तानने एसीसीचे अध्यक्षपद स्वीकारले आहे. पाकिस्तान आता आशियामध्ये क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी काम करेल. पाकिस्तानसोबत आशियामध्ये क्रिकेटला एका नवीन दिशेने नेण्याचा प्रयत्न असेल.



एसीसी अध्यक्ष म्हणून मोहसिन नक्वी यांच्यासमोर पहिले मोठे आव्हान यावर्षीचा पुरुषांचा आशिया कप असेल. ही स्पर्धा सप्टेंबरमध्ये भारतात होणार होती. तथापि, आता भारत आणि पाकिस्तानमधील राजकीय संबंधांमुळे ही स्पर्धा तटस्थ ठिकाणी खेळवली जाईल. ही स्पर्धा कोणत्या देशात आयोजित करायची हे नक्वी ठरवतील. ज्यामध्ये भारत आणि पाकिस्तान व्यतिरिक्त आणखी ४ संघ सहभागी होतील. ही स्पर्धा युएईमध्ये होऊ शकते, परंतु श्रीलंका देखील यजमानपदाच्या शर्यतीत आहे.

## राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राचा दणदणीत विजय, पुरुष व महिला संघ उपांत्य फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघांनी आपल्या विजयी लयीत कायम राहात ५७व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. रेल्वे आणि कोल्हापूरच्या पुरुष संघांनीही प्रभावी कामगिरी करत उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आहे.

**महाराष्ट्र पुरुष संघाची दमदार खेळी :** पुरी येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत पुरुषांच्या सामन्यात महाराष्ट्राने पश्चिम बंगालचा ३१-२४ असा पराभव केला. मध्यंतरानंतरच्या डावात पश्चिम बंगालने १६-१० अशी जोरदार लढत दिली होती. मात्र मध्यंतराची २१-८ अशी निर्णायक आघाडी महाराष्ट्राला विजय मिळवून देऊन गेली. यात महाराष्ट्राच्या पियुष घोलम याने आपल्या धारदार आक्रमणात ६ गडी बाद केले. शुभम थोरातने २.३० मि. संरक्षण व नरेंद्र कातकडेने १.५० व १.१० मि. संरक्षणाची खेळी केली. कोलकत्ताच्या सुमन बर्मन (१.५० मि. संरक्षण व २ गुण) याची अष्टपैलू खेळी व सुमन डेबनाढ (१० गुण) याची आक्रमणाची खेळी अपुरी पडली.



### महिला गटात महाराष्ट्राची विजयी घोडदौड

- महिला गटात उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्रने कोल्हापूरवर २०-१४ असा एक डाव राखून सहा गुणांनी दणदणीत विजय मिळवला. प्रियंका इंगळेने कोल्हापूरचे आक्रमण खिळखिळीत करत तब्बल ५.१८ मिनिटे संरक्षण केले व आक्रमणात चार गुण वसूल करून विजय निश्चित केला. पायल पवार (२.२२ मि. संरक्षण ) व संध्या सुरवसे (नाबाद १.२० मि. संरक्षण) यांनीही दिलेली साथ विजयात भर घालणारी ठरली. कोल्हापूरच्या श्रावणी पाटीलची (१.४५ मि. संरक्षण व २ गुण) खेळी फुकट गेली.

यापूर्वी झालेल्या सामन्यात महाराष्ट्रने महाराष्ट्र पोलीस संघाचा २८-१४ असा एक डाव राखून १४ गुणाने दणदणीत विजय मिळविला. यात सुयश गरगटे (नाबाद २.३० मि. संरक्षण व ६ गुण ) व प्रतीक वाईकर (१.१० मि. संरक्षण व ६ गुण ) यांनी अष्टपैलू कामगिरी करत विजय सोपा केला. महाराष्ट्र पोलीसकडून मनोज घोटेकर (१.०० मि. ४ गुण ) याचा अष्टपैलू खेळ एकाकी होता.

## पुण्यात गोल्फची राष्ट्रीय ऑक्सफर्ड प्रीमियर लीग

**पुणे :** येत्या ६ एप्रिल ला पुण्यात होणाऱ्या गोल्फच्या राष्ट्रीय ऑक्सफर्ड प्रीमियर लीगचे उद्घाटन होणार आहे. ही गोल्फ खेळाची देशातील सर्वात महत्त्वपूर्ण आणि नावाजलेली अशी स्पर्धा संकलित जाते. ही स्पर्धा ६



ते १३ एप्रिल दरम्यान पुण्यात पार पडणार आहे तर एकूण १६ संघ आणि १८० ते २५० खेळाडू या स्पर्धेत सहभागी होतील. या स्पर्धेचा पारितोषिक वितरन समारंभ १३ एप्रिल २०२५ रोजी पुण्यातिल प्रसिद्ध अशा ऑक्सफर्ड गोल्फ रिसॉर्ट आणि क्लब येथे पार पडणार असल्याची माहिती गोल्फ इंडस्ट्री असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष व ऑक्सफर्ड ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष अनिरुद्ध सेवलेकर यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले. पुढे ते म्हणाले की ,अतिशय नावाजलेल्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय ऑक्सफर्ड प्रिमीअर लीगला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे .आज देशभरातील विविध संघ सहभागी होत आहेत .पुण्यातील ऑक्सफर्ड गोल्फ क्लब येथे भव्य अशा ऑक्सफर्ड गोल्फ लीग २०२५ ची घोषणा करण्यात आली .त्यामुळे यावर्षीच्या ऑक्सफोर्ड गोल्फ लीग मध्ये पुणेकराना अतिशय चुरशीचे गोल्फ सामने बघायला मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय लीग च्या सामन्यासाठी नोंदणीला अनेक गोल्फ खेळाडू आणि संघानी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे .व सर्व यजमान संघाचा नुकताच स्वागत समारंभ पार पडला. या प्रिमियर लीगचे उद्घाटन गोल्फ इंडस्ट्री आसोसिएशन चे अध्यक्ष व ऑक्सफर्ड गोल्फ कोर्सचे संस्थापक अनिरुद्ध सेवलेकर यांच्या हस्ते पार पडणार आहे. या वेळी गोल्फ इंडस्ट्री असोसिएशन चे अध्यक्ष व ऑक्सफर्ड ग्रुप चे अनिरुद्ध सेवलेकर,ऑक्सफर्ड गोल्फ रिसॉर्ट चे रोहन सेवलेकर,एस गोल्फिंग चे आदित्य मालपणी ,ऑक्सफर्ड रिसॉर्ट चे व्यवस्थापक कौशिल वोरा पत्रकार परिषदेस उपस्थित होते. या लीगमध्ये तब्बल बारापेक्षा जास्त संघ सहभागी झाले आहेत .आजपर्यंत ईगल फोर्सेस ,बिनधास्त बॉईज ,सुलतान स्विंग्स ,ब्लिस्ट्रिंग बर्ड्स ,झिंगर्स,ग्रीन गॅडीटर्स,सुझलोन ग्रीन्स,रोरिंग टायगर्स, पुना लायन्स,सुब्बन सनरायजर्स ,द लीगशी क्लब ,बर्डी स्कॉड यासारखे मातब्बर संघ सहभागी झाले आहेत .त्यामुळे यावर्षीच्या ऑक्सफर्ड गोल्फ लीग च्या स्पर्धा अतिशय चुरशीच्या आणि रंगतदार होणार असल्याचे आयोजक रोहन सेवलेकर यांनी सांगितले आहे .

## बिली जीन किंग कप २०२५ टेनिस स्पर्धेसाठी भारतीय महिला संघाची सुहाना सफर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बिली जीन किंग कप २०२५ आशिया ओशनिया गट १ टेनिस स्पर्धेत सहभागी होणाऱ्या भारतीय महिला संघाला देशातील अग्रगण्य मसाल्यांचे उत्पादक सुहाना मसाले यांचे मुख्य प्रायोजकत्व लाभले आहे. हि स्पर्धा श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील टेनिस संकुलात ८ ते १२ एप्रिल २०२५ या कालावधीत रंगणार आहे.

माजी राष्ट्रीय मानांकित टेनिस पटू व सुहाना समूहाचे संचालक विशाल चोरडिया म्हणाले की, भारतीय महिला संघाला प्रायोजित करताना आम्हाला आनंद, अभिमान आणि सन्मान वाटत आहे. या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करून भारतीय महिला संघ जागतिक गट प्ले ऑफ साठी पात्र ठरेल असा मला विश्वास वाटतो. दरम्यान याचवेळी बिली जीन किंग कप २०२५ स्पर्धेसाठी भारतीय महिला संघाच्या नव्या किटचे अनावरण करण्यात आले.



बिली जीन किंग कप २०२५ स्पर्धेसाठी माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू पुण्याची राधिका तुळपुळे- कानिटकर हिची भारतीय महिला संघाच्या प्रशिक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राऊंड रॉबिन पद्धतीने खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत भारतीय संघासमोर न्यूझीलंड, चायनीज ईपई, कोरिया रिपब्लिक, थायलंड आणि हाँग काँग चायना यांचे आव्हान असणार असून स्पर्धेतील अव्वल दोन संघ यावर्षी नोव्हेंबर मध्ये होणाऱ्या प्ले ऑफ साठी पात्र ठरणार आहेत.

### भारतीय संघ पुढीलप्रमाणे:

- खेळाडू - अंकिता रैना, प्रार्थना ठोंबरे, सहजा यमलापल्ली, श्रीवल्ली रश्मिका भामीदीप्ती, वैदेही चौधरी, माया राजेश्वरन रेवती (राखीव)
- कर्णधार - विशाल उप्पल
- प्रशिक्षक - राधिका तुळपुळे - कानिटकर
- फिजिओस - ऋतुजा कुलकर्णी आणि अपूर्वा कुलकर्णी

## क्रिकेट स्पर्धेत ऑल स्टार्स क्रिकेट अकादमी संघाची विजयाची हॅट्रिक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट क्रिकेट अकादमी करंडक १५ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत ऑल स्टार्स क्रिकेट अकादमी संघाने सलग तिसरा विजय मिळवला.

चिखली येथील सिल्व्हर क्रिकेट क्लब क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत आदी गर्ग(४-२९) याने केलेल्या शिस्तबद्ध गोलंदाजीच्या जोरावर वेदिक फिट क्रिकेट अकादमी संघाने बीअ स्पोर्ट क्रिकेट अकादमी अ संघाचा ४० धावांनी पराभव केला.





दुसऱ्या लढतीत आदिराज कुर्लेकर(४-५) याने केलेल्या अचूक गोलंदाजीसह भाव्या ओसवाल(नाबाद ६९) च्या जोरावर ऑल स्टार्स क्रिकेट अकादमी संघाने क्रिकबेसिक क्रिकेट अकादमी संघाचा ८ गडी राखून पराभव करत विजयी मालिका कायम ठेवली.

## आयपीएलमध्ये बंदी असलेला क्रिकेटपटू होणार इंग्लंडचा टी-२० कर्णधार; बटलरच्या जागा घेणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** फेब्रुवारी-मार्चमध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत जॉस बटलरच्या नेतृत्वात खेळलेल्या इंग्लंड संघाची अत्यंत खराब कामगिरी झाली होती. त्या कामगिरीनंतर बटलरने इंग्लंडच्या वनडे आणि टी२० संघाचे कर्णधारपद सोडण्याचा मोठा निर्णय घेतला होता. त्यामुळे इंग्लंडच्या वनडे आणि टी२० संघासाठी कर्णधारपदाची जागा रिकामी झाली आहे. त्यामुळे आता या पदावर कोणाची नियुक्ती होणार याची चर्चा आहे, अशात दोन नावे चर्चेत आहेत.

टेलिग्राफने दिलेल्या रिपोर्ट्सनुसार युवा फलंदाज हॅरी ब्रुक इंग्लंडचा टी२० कर्णधार बनण्याची दाट शक्यता आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्ड त्याची या महत्त्वाच्या जबाबदारीसाठी विचार करत असल्याचे समजत आहे.



ब्रुक इंग्लंडचा तिन्ही क्रिकेट प्रकारातील प्रमुख खेळाडूंपैकी एक आहे. तो गेल्या काही वर्षापासून इंग्लंडचा प्रमुख फलंदाज ठरला आहे. तथापि, ब्रुक चॅम्पियन्स ट्रॉफी आणि त्याआधी झालेल्या भारत दौऱ्यातील वनडे आणि टी२० मालिकेत फारशी चांगली कामगिरी करू शकला नव्हता. पण एकूणच त्याची गेल्या काही काळातील कामगिरी चांगली राहिली आहे. त्यामुळे तो इंग्लंडच्या टी२० संघाचे कर्णधारपद मिळवण्यासाठी आघाडीवर आहे.

### पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धा

## डेक्कन इलेव्हन, बोपोडी एफसीची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात केशव माधव प्रतिष्ठान इलेव्हन, डेक्कन इलेव्हन, बोपोडी एलएफए एफसी आणि सिटी एफसी पुणे या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

कात्रज येथील भारती विद्यापीठ मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या व्दितीय श्रेणी गटाच्या झालेल्या सामन्यामध्ये ऑल्विन जोसेफ याने केलेल्या दोन गोलांच्या जोरावर केशव माधव प्रतिष्ठान इलेव्हनने अशोका फुटबॉल क्लबचा २-१ असा पराभव केला. डेक्कन इलेव्हन ड संघाने राहुल एफसी संघाचा ४-१ असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये डेकक्कन संघाच्या बलराज एस. याने दोन गोल तर, अवधुत जी. आणि संकेत पी. यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. रोहन सुनर याने १० मिनिटाला केलेल्या गोलामुळे बोपोडी एलएफए एफसी संघाने व्होबा एफसी संघाचा १-० असा पराभव केला.



सिटी एफसी पुणे संघाने पुना सोशल स्पोर्टस् क्लबचा ५-१ असा सहज पराभव केला. सिटी संघाकडून ललित पाटील याने दोन गोल केले. यांसह क्रिस निरापल्ले, राघवेंद्र शानभोगुए आणि श्लोक मोरे यांनी प्रत्येकी एकेक गोल केला.

#रा